## प्रकरण ४

## बरीदशाही इमादशाही आणि कुतुबशाही

### बऱ्हाडच्या इमादशाही घराण्याचा इतिहास

### फत्तेउल्ला इमावउलूसुल्क

या घराण्यातील प्रसिद्धी पावलेला पहिला पुरुष हा विजयनगरच्या हिंदू काफरांचा वंशज होता. हा लहान असताना (चइमनीच्या) विजयनगरबरोबर झालेल्या युद्धात कैद केला गेला. वऱ्हाडचा सुभेदार आणि प्रमुख सेनापती खानजद्दान बाच्या संरक्षक दलात त्याची भरती झाली. तो जसजसा मोठा होत गेला तसतसे त्याच्या अंगचे गुण आणि धारिष्ट ही प्रकर्षाने प्रकट होऊ लागली. खानजहानचे त्याच्या गुर्णाकडे लक्ष गेले आणि त्याची त्याच्यावर इतकी मर्जी बसली की त्याने फत्तेळलाची नियुक्ती उच्चाधिकारावर फेली. खानजहानच्या मृत्यूनंतर तो बहमनींच्या महमदाबाद विदर येथील दरबारी दाखल झाला. महमदशहा बहमनीच्या कारकिर्दीत ख्वाजा महमूद गावानच्या दरबारातील प्रतिष्ठेमुळे त्याला इमाद उलमुल्क ही पदवी देण्यात आली. त्यानंतर त्याची नेमणूक वन्हाडच्या फौजेच्या सेनापतीच्या अधिकारपदावर करण्यात आली.

फतेउला याच्या मृत्यूनंतर त्याचा मोठा मुलगा अलाउद्दीन हा राज्या- धिकारावर आला. बहमनी घराण्याच्या इतर अमिरांचा कित्ता त्याने गिरविला आणि स्वतःला त्याने सुलतान म्हणून जाहीर केले. त्यावेळी त्याने आहाउद्दीन इमादशहा ही पदवी घेतली आणि आपले शाही निवासस्थान गाबील येथे स्थापन केले. अमीर बरीद याच्या छळाला कंटाळून महमूदशहा बहमनी याने जेव्हा पलायन केले तेव्हा महमूदशहाला सिंहासनावर पुन्हा बसविण्याच्या उद्देशाने अलाउद्दीन इमादशहाने वन्हाडचे सर्व सैन्य घेऊन बिदरकडे कूच केले. बहमनी घराण्याचे पुनरुत्थापन होईल या भीतीने युरहाण निजामशहा बहरी हा अमीर बरीच्या मदतीला धावून गेला. यापूर्वी सांगण्यात आल्याप्रमाणे लढाई अगदी ऐन रंगात आली असताना महमूद-शहाने आपल्या उपकारकत्यजिवळून पळ काढला आणि आपल्याला पुन्हा अमीर बरीद याच्या बंधनात जखडून घेतले. हिजरी ९२३) हिजरी ९२३ या वर्षी अमीर बरीद याने विदरहून इ. स. १५१६ कूच केले आणि प्रथम माहूरचा किल्ला जिंकून घेतला.

त्यानंतर त्याने रामगीरवर हल्ला चढविला भाणि किल्ल्यावर घसरा करून तो काबीज केला. किल्ल्याचा किल्लेदार खुदाबंदतान हबशी याला त्याने ठार केले. या आक्रमणाची बातमी समजताच अल्लाउद्दीन इमादशहाने खुदावंदन्तानाच्या कुटुं बियांना मदत करण्याच्या मिषाने आपल्या फौजेन्ची जमवाजमव करण्यास सुरुवात केली. इमादशहाबरोबर युद्ध टाळावे या हेतूने अमीर बरीद याने माहर आणि रामगीर या दोन किल्ल्यांवर खुदार्यदखानाच्या मुलांच्या नेमणुका केल्या आणि त्यांनी अल्लाउद्दीन इमादशहाचे मांडलिक म्हणून राहावे असा सल्ला त्याने त्यांना दिला. अल्लाउद्दीन इमादशहा कूच करीत फिल्ल्यांजवळ आला अणि त्याने दगाफटका करून दोन्ही किल्ल्यांवर आपला कबजा केला. खुदाबंदस्गानाचे मुखो बुरहाण निजामशहाकडे आधयाकरता पळून गेले. इकडे अल्लाउद्दीन इमादशहा याने किल्ल्यांवर आपल्या तर्फेचे किल्लेदार आणि शिबंदी यांच्या नेमणुका केल्या.

अल्लाउद्दीन इमादशहाने जबरीने वरील किल्ल्यांबर कबजा केल्यामुळे आणि बहाद बळकाविल्यामुळे निजामशहाच्या दरबारात अतिशय चीड आणि असंतोष निर्माण झाला. परिणामी अहमदनगर आणि वन्हाड या राज्यामध्ये वारंवार उडाया झाल्या. या लड़यात इमादशहाची इतकी ससेहोलपट झाली की त्याला आपली राजधानी गावील इकडे पळून जावे लागले. यापूर्वी अल्लाउद्दीनचा विवाह इस्माईल आदिलशहा याच्या मुलीबरोबर झाला होता. त्यामुळे त्या दोघांमध्ये मैत्रीचे इतसंबंध निर्माण झाले होते. परंतु या सुमारास इस्माईल आदिलशहा हा विजयनगरच्या राजा- बरोबर युद्धात गुंतला असल्याकारणाने त्याला आपला दोस्त आणि जावई अल्लाउद्दीन याला मदत करणे शक्य नव्हते. या परिस्थितीचा फायदा घेऊन बुरहाण निजामशहाने अल्लाउद्दीन इमादशहाकडून माहूर आणि रामगीर हे दोन

किल्ले हिसकावून घेतले.अलाउद्दीन इमादशहा याने इ. स. १९२७ खानदेशचा सुलतान मिरान महमदखान याजबरोबर संगनमत करून बुरहाण निजामशहाचा सूड घेण्यासाठी त्याच्यावर चाल केली. दोहो बाजूस घनघोर युद्ध झाले आणि बुरहाण निजामशहाला विजय- श्रीने माळ घातली. त्याच्या ताब्यात शत्रूचे सर्व हत्ती आणि तोफखाना ही आली. अल्लाउद्दीन आणि महमदखान यांनी आपापल्या राजधान्यांकडे काढता पाय घेतला. अलाउद्दीन आणि महमदखान यांनी प्रथम इस्माइल आदिलशहाकडे मदतीची याचना केली होती. वर झालेल्या युद्धात महमदखानाने आपले सर्व हत्ती आणि तोफखाना गमाविली होती. त्याचे गुजराथचा बहादूरशहा याजबरोबर नाते होते. त्याजकडे त्याने मदतीसाठी याचना केली. बहादूरशहाची आपल्या राज्याचा विस्तार व्हावा हीच एकमेव इच्छा होती. आपला हा बेत प्रत्यक्षात आणण्यासाठी ही एक चांगली संघी आहे असा त्याने विचार केला. त्याने त्याप्रमाणे आपल्याबरोबर बरीच मोठी फौज घेऊन दक्षिणेच्या दिशेने कूच केले. परंतु अलाउद्दीन याला गुजराथच्या मुल्तानाच्या खन्याखुच्या बेताचा लगोलग सुगावा लागला. त्याने गाबील येथे बहादूरशहाच्या नावे श्रुत्वा वाचला आणि त्याचे बन्हाडबरील सार्वभौमत्व मान्य केले. त्याच वेळी खानदेशाचा मिरान महमदखान याने अहमदनगरच्या राज्यावर बहादूरशहाने ताबडतोब चास्तून जावे असा त्याच्या पाठीशी घौशा घेतला आणि अहमदनगरच्या निजामशाही घराण्यावर बहादूरशहाने सक्तीने शरणागती लादावी असा त्याला आग्रह केछा. अलाउद्दीन आणि मिरान महमद यांच्या तोंडपुजेपणाचा बहादूरशहाला अंतर्यामी अतिशय आनंद झाला आणि त्याने दौलताबादमार्ग अहमदनगरकडे कूच केले, पूर्वी कथन केल्याप्रमाणे तेथे त्याने आपल्या नावाची नाणी पाडली आणि साबनौमसत्ताधीश म्हणून आपल्या नावाने द्वाही फिरविली. यानंतर उपरिनिर्दिष्ट सुलतान आपापल्या राजधान्यांकडे परत फिरले. थोड्याच कालावधीनंतर आलाउद्दीन इमादशहा मरण पाचला. त्याच्या नंतर त्याचा मोठा मुलगा सुख्तानपदावर आला.

### दर्या इमादशहा

गादीवर आल्यानंतर काही काळ उलटल्यावर दयाँ इमादशहा याने आपली मुलगी बिबी दौलत हिचे बुरहाण निजामशहाशी उभ लावले. दर्या इमादशहाने आपल्या मृत्यूपर्यंत दक्षिणेमधील सर्व सुलतानांबरोबर अत्यंत सलोख्याचे संबंध ठेवून राज्यकारभार केला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा अल्पवयी मुलगा सुलतानपदावर आला.

### बुरहाण इमादशहा

दर्या इमादशहाचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा मुलगा बुरहाण इमादशहा हा गादीवर आला. तो बयाने पोरगेलासा होता, त्याचा मंत्री तुफालखान दकनी द्वा राजप्रतिनिधी म्हणून राज्यकारभार पाहू लागला. बुरहाण इमादशहा हा वयात येऊन आपल्या राज्याचा अधिकार पाहाण्यायोग्य होण्याचे अगोदरच तुफाढखानाने खानः देशाचा सुलतान आणि निजामशाही दरवार यांच्या मदतीने वन्हाडचे राज्य बळकावले. सरतेशेवटी त्याने गादीचा खरा वारस बुरहाण इमादशहा याला लोखंडी बेच्या घालून नरनाळयाच्या किल्ल्यात बंदिवासात ठेवले आणि स्वतःला राज्यभिषेक करून घेतला. (तो स्वतःला मुलतान म्हणवून घेऊ लागला.)

### तुफालखान

तुफालखान हा अतिशय साहसी होता. योजलेले बेत पूर्णत्वाला नेण्यासाठी ज्या उदात्त गुणवत्तेची आवश्यकता असते ती त्याच्या अंगी प्रकर्षाने एकवटलेली होती. ही गुणवत्ता म्हणजे पहाडालाही छाजबील असे साइस आणि पूर्णत्वास पोहोचलेले युक्तीचापल्य. त्याने बन्हाडची गादी बळकाविल्यानंतर त्याच्या सामध्र्यांत इसकी झपाय्याने बाढ होत गेली की विजापूर आणि अहमदनगरच्या सुलतानांना तुफाल- खानाचा नाश केल्याखेरीज गत्यंतर नाही असे वाटू लागले, त्यांनी आपल्या फौजा एकवटून त्याच्यावर चाल केली. दोन्ही सुलतानांना तोंड देणे तुफालखानाच्या कुबतीपलीकडचे होते. म्हणून त्याने अली आदिलशहा आणि त्याचा वजीर यांच्याशी संधान बांधले. आदिलशहाने युद्ध थांबवावे म्हणून त्याने आदिलशहाकडे मौल्यवान हिरे-माणकांचा नजराणा भेट म्हणून पाठविला. मुर्तजा निजामशहाच्या हे संगनमत जेव्हा दृष्टोत्पत्तीस आले तेव्हा त्याने अहमदनगरकडे माधार घेतली. परंतु हिजरी हिजरी ९८०) ९८० या वर्षी

बुरहाण इमादशहाची नरनाळा किल्ल्याच्या इ. स. १५६८) बंदीवासातून मुक्तता करण्याच्या इरायाने तुफालखान विरुद्ध मुर्तजा निजामशहाने पुन्हा चढाई केली.

या आक्रमणाचा मात्र तुफालखानाने घसका घेतला आणि मदत मागण्यासाठी आपल्या वकिलाला त्याने गोवळकोब्याचा इब्राहीम कुतुबशहाकडे रवाना केले. कुतुबशहाकडून मदत आल्यावर त्याने अहमदनगरचा वजीर [३] (४९३) चेगीजस्तान याच्यावर हल्ला चढविला. परंतु तुफालखानाचा पूर्णपणे पराभव झाला. त्याचा सक्त पाठलाग करण्यात आला. पाठलागात त्याची खूप हानी झाली. अखेर त्याला नरनाळ्याच्या किलधात कोढण्यात आले. त्याच्या मुलाने गाविलगडच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. नरनाळ्याचा किल्ला एका उंच डोंगरावर असून अतिशय मजबूत होता. सहजासहजी त्याचा पाडाव होणे कठीण होते. हे ध्यानात घेऊन मुर्तजा निजामशहाने तात्पुरता त्या किल्ल्याला वेडा दिला आणि अखेर अहमदनगरला परत फिरण्याचे ठरविले. परंतु किल्ल्यावरील शिबंदीपैकी पुष्कळांना फितविण्यात चेगीजखानाला यश आले. त्यांच्यापैकी काहीजण किल्ल्यावरून निसटून त्याला येऊन मिळाले. त्यांना भरपूर बक्षिशी देण्यात आली. इकडे किल्ल्यावर रसद आणि दाणागोव्याची तूट पडली आणि त्यामुळे किल्ल्यावरील अनेकांनी पळून आलेल्यांचे अनुकरण केले. सरतेशेवटी किल्ल्यावर तोफा चालविणारे फक्त बारा गोलंदाज शिळक राहिले. किल्ल्यावरील बंदोबस्ताची उत्तम प्रकारे माहिती पळून आलेल्या सैनिकांकडून चेंगीजखानाने मिळविली. अतिशय मोठ्या प्रयत्नाने त्याने एक तोफ किल्ल्यावर चढविण्यात यश मिळविले. या तोफेच्या भडिमाराने किल्ल्याचा एक बुरुज उद्ध्वस्त करून टाकण्यात आला. त्यामुळे पडलेल्या सिडाराजवळ एका रात्री एक अधिकारी २८ सैनिक आणि एक बिगुलवाला यांना घेऊन पोहोचला. त्यांनी तटबंदी पार केली आणि त्याचवेळी बिगुलवाल्याला बिगुल वाजविण्याचा हुकूम देण्यात आला. तुफालखानापाथी आता फारच थोडी माणसे शिलक होती. त्याला बाटले की किल्ल्यावर शत्रूकडील बऱ्याच माणसांनी प्रवेश मिळविला आहे. या समजुतीने त्याने किल्ल्याचे रक्षण करण्याचा कसलाही प्रयत्न न करता किल्ल्यालगतच्या डोंगरात पळ काढला. दुसऱ्या दिवशी मुर्तजा निजामशहाने किल्ल्यावरील ताब्यात घेता येण्याजोग्या सर्व सामुग्रीवर आपला कबजा केला आणि आपल्या सैनिकांना फिला आणि शहर उटण्याची मुभा दिली. तुफालखानाच्या पाठलागावर सय्यद हुसेन अत्राबादी याखाः पाठविण्यात आले होते. तिसऱ्या दिवशी त्याने तुफालखानाला गाठले आणि त्याला केंद करून मुर्तजा निजामशहाच्या छावणीत आणले, त्यानंतर काही [३] (४९४) काळाने गाविलगडचा किल्ला मुर्तजा निजामशहाच्या स्वाधीन झाला. तुफाल्तानाचा मुलगा समशेरउलमुल्क याला फेद करण्यात आले. कैदेत असलेल्या बुरहाण इमादशहाला बऱ्हाडच्या गादीवर बसविण्याचे एवजी मुर्तजा निजामशहाने त्याची रवानगी तुफालखान आणि त्याचा मुलगा समशेरउल्मुल्क यांच्याबरोबर निजामशाही राज्यातील एका किल्ल्यावर केली. तेथे त्यांना बंदिस्त करण्यात आले. असे म्हणतात की त्या ठिकाणी काही कालावधीनंतर निजामशहाच्या आज्ञेने या तिघांना गळा दाबून ठार मारण्यात आले. काहीजणांच्या मते तुफालबान आदिकरून सर्वांची ४० कुंटुंबीय मंडळी होती. ही सर्वजण एका रात्री किल्ल्यावरील रक्षकांनी त्यांचा करपणे छळ केल्यामुळे मरण पावली. त्यांचे हालहाल करण्याचे कारण म्हणजे त्यांच्या निर्वाहासाठी मिळणारी रक्कम रक्षकांना लुबाडून घ्यावयाची इच्छा निर्माण झाली. परंतु त्या दुर्दैवी कैद्यांनी या गोष्टीला मान्यता देऊनही त्या रक्षकांचे समाधान झाले नाही. त्यांनी त्या सर्व कैद्यांना एका रात्री छोव्याशा तळघरात कोंडले, त्या रात्री भयंकर उष्मा होत होता. आस कोंडल्यामुळे दिवस उजाडावयाचे आतच ते सर्व कैदी सुत्युमुखी पडले. अशा त-हेने इमादशाही घराण्याचा आणि वऱ्हाडची गादी बळकाविणाऱ्या तुफाल- खानाचा अस्त झाला,

## बिदरच्या वरीदशाही घराण्याचा इतिहास

### कासीम बरीद

बरीदशाही घराण्याची अहमदाबाद बिदर या राजधानीच्या ठिकाणी स्थापना झाल्यानंतर आज तागायत त्या घराण्यातील सात पुरुष सुलतानपदावर आले,

कासीम बरीद तुक याला ख्वाजा शहाबुद्दीन अली येजदो याने बिदर येथे आणले आणि जॉर्जियन गुलाम म्हणून त्याला सुलतान महमूदशहा लष्करी बहमनी याला विकले. महमूदशहाने आपल्याजवळील जॉर्जियन सेवकांमध्ये त्याची भरती केली. महमूहाहाच्या कारकिर्दीत पैठण आणि चाकण यामधील प्रदेशात मराठा बंडखोरांनी पुंडाई माजविली होती. तिचा मोड करण्यासाठी कासीम बरीद याला पाठविण्यात आले. या कामगिरीत आपल्या शौर्याने कासीम बरीद नावारूपाला आला. एका ठिकाणी झालेल्या चकमकीत कासीम बरीद याने विशेष शौर्य गाजवून जय मिळविला आणि साबाजी मराठा याला ठार मारले. सुलतानाने साबाजीच्या मुलीबरोबर कासीम बरीदचा मुलगा अमीर बरीद बयाचा त्याने केलेल्या सेवाचाकरोचे बक्षीस म्हणून विवाह लावून दिला. साबाजीच्या ताब्यातील मुलूख देखील त्याच्याकडे छावून देण्यात [३]:(४९६) आला. साबाजीच्या चाकरीत असलेले ४०० च्या वर मराठे शिपाई कासीम बरीच्या चाकरीत शिरले, त्यांच्यापैकी पुष्कळ जणांची मने त्याने मुसख्मान धर्म स्वीकारण्या- बहुत बळविली. कासीम बरीदच्या चाकरीत शिरलेल्या या मराठा शिपायांबद्दल अमीर वरीच्या मनात अतिशय भापुलकीची भावना होती. मुलाच्या लमामुळे निर्माण झालेले जे नवीन नाते होते त्यामुळे कासीम बरोदचे त्याच्या जहागिरीवरील वचस्व अतिशय वाढले. त्याचा परिणाम असा झाला की, सुलतान महमूदशहा बहमनीच्या कारकिर्दीत इतर भमिरांप्रमाणेच त्याच्याही मनात आपल्याला राजकीय सत्ता प्राप्त व्हावी अशी इच्छा उत्पन्न झाली. भादिलशहा, निजामशहा आणि इमादशहा यांच्या सळपावरून त्याने औसा, कन्धार आणि उदगीर हे किले बळकाविले. त्याने बहमनी सुळतानाकडे अहमदाबाद बिदर हे शहर आणि बिदरचा किला ठेवून स्वतःच्या नावे खुत्वा वाचला आणि नाणी पाडली. आपल्या जहागिरीवर त्याने एकंदर १२ वर्षे हिजरी ९१० रे महमूदयाहा बहमनीच्या कारकिर्दीतच स्वतंत्रपणे राज्य चालविले. इ. स. १५०४) कासीम बरीदना मृत्यू हिजरी ९१० या वर्षी झाला.

### अमीर बरीद

आपल्या बापाच्या मृत्यूनंतर अमीर बरीद सुलतान पदावर आला. याच्या राजवटीत महमूदशहा बहमनी कालवश झाला. बहमनी घराण्यातील शेवटचा सुलतान कलीमठाला शहा बहमनी हा बिदरहून अहमदनगरकडे पळून गेला, याच सुमारास इस्माईल आदिलशहाने विदर जिंकून घेतले पण ते त्याने अमीर बरीद याच्या पुन्हा स्वाधीन केले. ज्यावेळी अलाउद्दीन इमादशहा आणि खानदेशाचा मुलतान मिरान महमदखान यांच्या चिथावणीवरून गुजराथच्या बहादूरशहाने [३] (४९७) दक्षिणेवर आक्रमण केले, त्यावेळी इस्माईल आदिलशहाने अमीर बरीद याला विजापूर येथे बोलावू पाठविले. अमीर बरीदकडे त्याने ४००० परदेशी घोडदळाचे अधिपत्य दिले. या घोडदळातील घोडेस्वारांनी इमामांचे अनुयायित्व दाखविणारी १२ कोनी शिरलाणे परिधान केली होती. यापूर्वीच सांगण्यात आल्याप्रमाणे हे घोडदळ बुरहाण निजामशहाच्या सहाय्यार्थ पाठविण्यात आले. अमीर बरीद याने बहादूरशहाबरोबर झालेल्या लढाईत असामान्य शौर्य गाजविले. अखेर यानंतर काही वर्षांनी बुरहाण निजामशहाच्या सहाय्यार्थ कूच करून जात असताना अमीर बरीद एकाएकी आजारी पढला आणि त्याला दौलताबाद येथे मरण नाले. त्याचा भाऊ ख्वाजा जहान याने अमीर बरोदचे शव अहमदाबाद बिदर येथे आणले. बिदर येथे त्याचे दफन करण्यात आले. अमीर बरीद याची एकंदर कारकीर्द ४५ वर्षे इ. स. १५२९ } एवढी झाली.

**अली बरीदशहा**

बरीदशाही घराण्यामध्ये स्वतःला सुल्तान म्हणवून घेणारा पहिला पुरुष म्हणजे भली बरीदशहा. कारण जरी त्याचा आजा कासीम बरीद याने राजचिन्हे धारण केली होती तरी तो स्वतःखा सुलतान म्हणवून घेत नसे. अली बरीदशहा गादी- वर आल्यानंतर जेव्हा बुरहाण निजामशहाने आपला वजीरशहा ताहिर याला बरीदशहाचे अभिनंदन करण्यासाठी पाठविले तेव्हा अली बरीददाहाने परिणामांची क्षिती न बाळगता शद्दा ताहिरचा धर्मपंथ आणि त्याची मते यावर कडाडून हाड़ा चढचिला. यावेळी अलीचरौद याने बोलण्याच्या ओघात शहा ताहिरला जे टोमणे मारले त्यामुळे शहा ताहिरची मनःस्थिती संतप्त झाली आणि तो अली बरीदशहाच्या दरबारातून चालता झाला. अहमदनगर येथे परत आल्यावर त्याने आपल्याला मिळालेल्या अपमानास्पद वागणुकीची हकीकत बुराहाण निजामशहाच्या कानावर घातली आणि बिदरवर सैन्यासहवर्तमान चाळून जाण्यासाठी त्याने बुरहाण निजामशहाला उयुक्त केले. अली बरीदशहाने कल्याणीचा किला इस्माईल भादिलशहाच्या ताब्यात दिला आणि त्याची मदत मागितली. इतके जरी झाले तरी बुरहाण निजामशहाने इतक्या झपाठ्याने कूच केले की त्याच्या फौजा नजिक आल्याबरोबर औसा, कन्धार आणि उदगीर हे किल्ले त्याच्या स्वाधीन झाले. त्याने बिदरच्या राज्याचा बहुतेक सर्व मुलूख पादाक्रान्त केला. अली बरीदशहाच्या ताब्यात सालीना ४००,००० होन उत्पन्न येईल एवढा मुलूख जेमतेम राहिला.

यावर्षी मुर्तजा निजामशहा याने बिदरख्या इ. स. १५७९) ताब्यातील उर्वरित मुलुखावर आक्रमण केले आणि खुद्द बिदरच्या राजधानीला वेढा दिला. अली बरीदी परिस्थिती अतिशय शोचनीय झाली आणि त्याने मदतीसाठी अली आदिलशहाकडे आपला वकील पाठविला. भली भादिलशहाने अली बरीदकढील दोन गुलामांची मागणी केली भाणि ते आपल्याकडे पाठविल्यास आपण मदत करू असे कळविले. अली बरीदशहाने या गोष्टीला संमती दिली, अली आदिलशहाकडून २००० घोडेस्वार महमदाबाद बिदरचा वेढा उठविण्या साठी म्हणून अली बरीदच्या मदतीसाठी कूच करून गेले. अली बरीदशहाच्या मदतीला आदिळशाही फौजा येत नाहेत याची मुर्तजा निजामशहाला खबर कळली. त्याचवेळी आपला भाऊ बुरहाण निजामशहा याने अहमदनगर येथे बंडाचा झेंडा उभारल्याचेही त्याला कळले. तेव्हा त्याने अहमदनगरकडे माघार घेतली. फिइथाचा बेढा चालू ठेवण्याकरता त्याने मिर्जा यादगार याला भाणि त्याच्या मदतीसाठी म्हणून गोवळकोब्याकडून अहमदनगरच्या फौजेला येऊन मिळालेल्या कुतुबशाही फौजेला पाठीमागे ठेवले. परंतु विजापूरच्या फौजा बिदरपासून काही मैल अंतराबर चालून आल्या नाही तोच मिर्जा यादगार याने माघार घेतली. यानंतर अली बरीद- शहाने बर उाहेखिलेल्या दोन गुलामांना त्यांच्या इच्छेविरुद्ध विजापूरकरांच्या स्वाधीन केले. एका धन्याकडून दुसन्या धन्याच्या ताबेदारीत जावे लागल्यामुळे झाडेछा अपमान त्या तरुण गुलामांना अत्यंत नसा झाला. यापूर्वीच सांगितल्याप्रमाणे या दोन गुलामांना जेव्हा विजापूर येथे आणण्यात आले तेव्हा त्यातील एकाने अली आदिलशहाला यमसदनास पाठविले. यानंतर काही काळाने अली बरीदशहा मरण पावला. त्याची कारकीर्द एकंदर २५ बर्षे झाली. इ. स. १५६२) त्याच्यानंतर त्याचा मोठा मुलगा मुलतानपदावर आला, ३५६८

**इब्राहीम बरीदशहा**

इब्राहीम बरीदशहाने एकंदर सात वर्षे राज्य केले आणि नंतर तो मरण पावला. कासीम बरीदशहा दुसरा इब्राहीम बरीदशहाच्या मृत्यूनंतर त्याचा धाकटा भाऊ कासीम बरीदशहा दुसरा हा गादीवर बसला त्याने इ. स. १५७२ तीन वर्षे राज्य केले आणि नैसर्गिकरित्या त्याचा मृत्यू झाला.

कासीम बरीदशद्दा दुसरा याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा गादीवर आला. हा लहान असून त्याचे नाव मिर्जा अली बरीद असे होते. त्याचा एक नातलग अमीर बरीद याने काही कालावधीनंतर बिदरचे राज्य बळकाविले आणि मिर्जा अली बरीद याला बिदरमधून भागानगरला काडून लाबले, त्यानंतर त्याने स्वतःला राज्याभिषेक करून घेतला आणि अमीर बरीद ही पदवी धारण केली.

## गोवळकोंड्याची कुत्बशाही

## [ सन १५१२-१६८७ ]

### गोवळकोंड्याची कुत्बूशाही प्रस्ताव, (१५१२-१६८७) —

गुलबर्गा येथे बहामनी राज्याची स्थापना झाल्यावर त्याचा विस्तार हळूदळू पूर्वेकडे होत चालला. त्या बाजूस वरंगळचे हिंदु राज्य होतें, तें सन १४२३ सालीं बहामनी राजा अहंमदशहा वल्ली ह्यानें जिंकिलें. वरंगळच्या राज्याच्या पूर्वबाजूस ओढचा प्रांताचें हिंदु राज्य होतें. आरंभी ह्या राज्याची बहामनी राजांस फारशी माहिती नव्हती. तेथे समुद्रकांठ असून जमीन फार सुपीक होती. महाराष्ट्र देश व ओढ्या प्रांत ह्यांजमध्ये एक पर्वताची रांग असून, तिचे माथ्यावर निबिड अरण्यें होतीं. त्या अरण्यांत राहणारे रानटी लोक हिंदु व मुसलमान ह्या दोघांसही फारसे माहीत नव्हते. सन १४७७ सालीं बहामनी राजांनी उत्तरेस थेट राजमहेंद्री जवळील समुद्रकांठापर्यंत व दक्षिणेस कृष्णानदीपर्यंत प्रवेश केला. हा दक्षिणचा प्रदेश त्यांनीं नरसिंहराय नांवाच्या हिंदु राजापासून जिंकून घेतला. त्या प्रदेशांत पाळेगार वगैरे पुष्कळ लहान लहान स्वतंत्र राजे होते; आणि त्यांजवर विजयनगर वगैरे आस- पासच्या राजांचा थोडाबहुत ताबा होता. तरी मुसलमानांचा अंमल कृष्णेच्या पलीकडे गेला नव्हता. महंमूदशहा बहामनीनें कांची किंवा कांचीवरं ह्या शहरावर सन १४७९ साली स्वारी केली, तरी त्यामुळे त्याच्या राज्यांत विशेष भर पडली नाहीं. बहामनी राज्याचा पूर्वेकडील मुलूख गोवळ- कोंब्याच्या सुभ्याखालीं मोडत असे. हा प्रांत विस्तृत व चांगल्या उत्पन्नाचा होता. प्राचीन काळच्या हिंदु राजांनीं ह्या प्रदेशांत पुष्कळ कालवे वगैरे बांधून शेतीसाठीं पाण्याची सोय चांगली केली होती; आणि पुढें वरंगळच्या आंध्र राजांनीं व इतर राजकर्त्यांनी पूर्वीचीं कामें दुरुस्त ठेविलीं होतीं. ह्या सुपीक प्रांतावर वजीर महंमद गवान ह्यानें कुलीकुत्बू-उलमुल्कू ह्या नांवाचा सुभेदार नेमिला.

### कुली कुत्बूशहा, (सन १५१२-४३) —

कुली हा इराणांतील एका प्रमुख कुळांत जन्मला होता. लहानपणापासून तो मोठा हुशार व चलाख असे. तो इराणांतून हिंदुस्थानांत आला, तेव्हां त्यास बहामनी सुलतान महंमदशहा ह्यानें आश्रय दिला. एका प्रसंगी त्यानें शहाचा बचाव केल्यामुळे त्याजवर शहाची मर्जी बसली. बहामनी राज्याचे इतर सर्व सुभेदार स्वतंत्र होईपर्यंत, त्यानें आपली ताबेदारी उत्तम प्रकारें बजाविली. कासीम बेरीदचा अंमल त्यास सहन न होऊन, सन १५१२ सालीं गोवळकोंडा येथे शहा ही पदवी घेऊन तो स्वतंत्रतेनें राज्यकारभार करू लागला. हें पडकें शहर हल्ली हैदराबादचे पश्चिमेस ६ मैल आहे.

कुली हा मोठा पराक्रमी पुरुष होता. त्यानें पुष्कळ वर्षे शहाणपणानें राज्य करून, आपल्या मुलखाचा विस्तार केला. गोवळकोंडा हें प्रथम एक लहानसें खेडें होतें, तें त्यानें मजबूत बांधून लष्करी ठाणें केलें. पूर्व- तैलंगण प्रांत त्यानें हळूहळू जिंकून, आपल्या राज्याची सीमा समुद्रास मिळविली. । एवढ्या प्रदेशांत ६०/७० किल्ले त्यानें हस्तगत केले, आणि सर्व प्रांतांत मुसलमानी धर्म चालू केला. त्यामुळे सर्व हिंदु राजे एकत्र होऊन मुसल- मानांस मागें हटविण्याची पराकाष्ठा करूं लागले, पण त्यांत त्यांस यश आलें ) नाहीं. कमामेतचा राजा सीतापति, कंडापिलीचा राजा रामचंद्र देव, व ओढ्या प्रांतांतील विडियाद्रि व हरिश्चंद्र, हे राजे कुलीबरोबर लढण्यांत प्रमुख होते. विजयनगरचा राजा कृष्णराय व त्याचा जांवई शिवराय ह्यांचाही कुलीनें पराभव केला. त्याचप्रमाणें बेरीदशहा व आदिलशहा ह्यांच्याशीं त्यानें अनेक झगडे केले. सन १५३४ त त्यानें गोवळकोंड्यास वेढा घातला असतां, त्याच्या तोंडावर एक जबरदस्त जखम लागून तो अगदीं कुरूप झाला. त्यानें आपल्या कारकीर्दीची शेवटचीं कांहीं वर्षे राज्यकारभारांत घालविलीं. गोवळकोंड्यास एक भव्य व शोभिवंत मशीद बांधण्याचें काम त्यानें चालविलें. त्याचा मुलगा जमशीद ह्यानें बंड केलें, म्हणून त्यास कुलीनें अटकेंत ठेविलें होतें. एके दिवशीं कुली हा वरील मशिदीची देखरेख करण्यासाठीं गेला असतां, शहाजादा जमशीद ह्याच्या शिकवणी- वरून शहरचा कोतवाल मीर महंमद हमदानी ह्यानें जंबिया खुपसून सुलतान कुली कुत्बशहा ह्याचा प्राण घेतला. त्या वेळीं त्याचे वय नव्वद वर्षांचें होतें. त्यानें साठ वर्षांतून १६ वर्षे बहामनी शहाच्या वतीनें व ४४ वर्षे स्वतंत्र

रीतीनें कारभार केला. त्याचा वडील मुलगा कुत्बुद्दीन ह्याचे डोळे काढून जमशीदनें त्यास अंधारकोठडींत टाकिलें आणि स्वतः कुत्बूशाहीचें तख्त बळकाविलें.

**जमशीद कुत्वशहा, (सन १५४३-१५५० ) –**

जमशीदचा कारभार फलद्रूप झाला नाहीं. विजापुरवर स्वारी करण्यासाठीं त्यानें बुऱ्हाण निजामशहास मदत केली. पण विजापुरचा सेनापति आसदखान ह्यानें त्याचा सडकून पराभव केला. नंतर तो इतरांच्या भानगडींत विशेष पडला नाहीं. लहानमोठे पुष्कळ हिंदु राजे त्यानें आपल्या ताच्याखालीं आणिले, शेवटीं शेवटीं तो एकसारखा नानाप्रकारच्या विलासांत निमग्न राहूं लागला आणि कांहीं भयंकर दुखणें येऊन सन १५५० त मरण पावला. सैफ्- उल- मुल्कू व जगदेवराव ह्या नांवांचे दोन शूर सरदार त्याचे मदतगार असत. जमशीदच्या मरणानंतर त्याचा सात वर्षांचा मुलगा सुभान कुली ह्यास गादीवर बसवून, सैफूखानानें कारभार चालविला; पण त्याचा अंमल सर्वोस दुःसह होऊन, जमशीदचा धाकटा भाऊ इब्राहीम विजयनगरच्या राम- रायाकडे जाऊन राहिला होता, त्यास दरवारच्या मंडळीनें बोलावून आणून- तख्तावर बसविलें.

**इब्राहीम कुत्बूशहा, (सन १५५०-१५८०) –**

ह्या राजाची कारकीर्द ऐतिहासिक दृष्टया स्मरणीय आहे. कारण, ह्या कारकीर्दीत तालिकोटच्या लढाईनें विजयनगरच्या बलाज्य राज्याचा व त्याबरोबरच हिंदूंच्या स्वातंत्र्याचा संपूर्ण नाश होऊन, मुसलमानांचा अंमल दक्षिणेंत चालू झाला. दुसरें कारण असें कीं, ह्या राजानें आपल्या मुलखावर अंमल करितांना प्रजेच्या सुखाकडे विशेष लक्ष पोंचविलें.

तख्तावर बसतांच हा चौकस रीतीनें सर्व कारभार स्वतः पाहूं लागला. सर्वोवारच्या राजांनीं त्यास अभिनंदनपर पत्रे पाठविलीं. विशेषतः हुसेन निजामशहाचा व ह्याचा चांगला स्नेह जमला. इब्राहीमचा पुष्कळ काळ- पर्यंत विजयनगरच्या रामरायानें सांभाळ केला असल्यामुळे, रामरायाचे त्याजवर उपकार झाले होते. रामरायाचा व विजापुरच्या आदिलशहाचा स्नेह होता. त्या वेळीं आसपासच्या सर्व राजांचा एकमेकांशीं स्नेहभाव असल्या- मुळें विनाकारण एकानें दुसऱ्यावर शस्त्र धरिल्यास इतर राजे त्याचा निषेध करीत. असें एक उदाहरण ह्या वेळीं घडलें. निजामशहाशीं सख्य करून इब्राहीमनें बेरीदशाही बुडविण्याचा यत्न चालविला. त्या वेळीं विजयनगरच्या राजानें पुढील पत्र इब्राहिमास लिहिलें. 'विजापुर व अहंमदनगर येथील राजे हे आज पुष्कळ दिवस एकमेकांशीं झगडत आहेत, हें आपणांस ठाऊक आहेच. ह्या झगड्यांत दोघांची बरोबरी इतकी दिसून आली आहे कीं, एकसारखे लढत असतां कोणासही कांहीं फायदा झाला नाहीं. परंतु हल्ली आम्हांस असें कळलें आहे कीं, आपले वडील ह्या तंट्यापासून अगदीं अलिप्त राहिले असून, आपण विजापुरच्या राजाविरुद्ध निजामशहास मदत करण्यास तयार झालां आहां. इब्राहीम आदिलशहा हे आमचे दोस्त असून त्यांनी आपणांस कोणत्याही तऱ्हेनें दुखविलें नाहीं. आपली व आमची दोस्तीही फार दिवस चालत आली असल्यामुळें, आपणांपुढे ह्या गोष्टी मांडणें आम्हांस युक्त वाटतें. परापहरण करण्यासाठीं आपण जो कट केला आहे तो सोडून द्यावा, असें आमचें मागणें आहे. आपण आपलें सैन्य परत बोलावून दोहों पक्षांशीं सारखा स्नेह ठेवावा, म्हणजे त्या उभयतांमध्यें सलोखा होऊन हे फार दिवस चाललेलें युद्ध संपेल '.

अशा प्रकारचे पत्रव्यवहार सोळाव्या शतकांत हिंदुस्थानांतील राजे एक- मेकांशीं करीत असत. वरील पत्राचा उपयोग होऊन इब्राहीम कुत्वाहा नें रामरायाची भेट घेऊन सवाँची एकी करून दिली. पुढें ऐनप्रसंगीं राम- रायास इब्राहीम कुत्वाहानें मदत करून त्याच्या भावांनी केलेलें बंड मोडिलें.

ह्या कारकीर्दीत मराठ्यांचा उत्कर्ष पुष्कळ झाला असें दिसतें. इब्राहीम कुत्बूशहास राज्यपद मिळवून देण्याच्या कामीं जगदेवराव नामक सरदार फार उपयोगी पडला होता. त्याचे उपकार स्मरून शहानें त्यास आपला दिवाण केलें. त्याच्या हाताखालीं रायराव नांवाचा दुसरा एक हुशार सरदार होता. ह्या दोघांच्या वर्चस्वामुळे सर्व दरबारांत व लष्करांत

मराठ्यांचा भरणा पुष्कळ झाला. है मुसलमान सरदारांस न रुचून, त्यांनी जगदेवरावा- विरुद्ध पुष्कळ तक्रारी शहाकडे केल्या. शहानें कांहीं दिवस तिकडे काना- डोळा केला. पण अखेरीस त्यानें रायरावास ठार मारिलें, तेव्हां जगदेवराव आपली बचाव करून गोवळकोंड्याडून निघाला, तो सर्व प्रांत उजाड पाडीत व-हाडांत आला. त्यास कांहीं काळपर्यंत बुऱ्हाण निजामशहानें आश्रय दिला. पण त्यासही तो डोईजड झाला. सर्व मुलूख हस्तगत करून मुसलमानांस पादाक्रांत करण्याची जी इच्छा पुढे मराठ्यांस झाली, तिचीं पूर्वचिन्हें ह्या वेळेपासून दिसू लागलीं होतीं. बऱ्हाडच्या इमादशहास कांहीं त्रास न देतां जगदेवराव पुनः कुत्बूशहाचे मुलखांत आला. त्याजबरोबर पुष्कळ दक्षिणी पायदळ आणि आरबी, इराणी व हबशी फौज होती. कुत्बशहानें मुस्तफाखानास जगदेवरावावर पाठविलें. युद्ध होऊन जगदेवाचा भाऊ व्यंकटराव पडला, आणि पुष्कळ लोक जखमी होऊन त्याचा पराभव झाला. नंतर जगदेवराव विजापुरच्या राजाकडे गेला. हुसेन निजामशहा व इब्राहीम कुत्बशहा ह्यांनीं विजापुरच्या मुलखावर स्वारी केली असतां, विजापुरच्या राजानें रामरायाचे साहाय्य मागितलें. त्या वेळीं रामरायाचा भाऊ व्यंकटाद्रि व जगदेवराव हे एक झाले, त्यांनीं कुत्बशहा व निजामशहा ह्यांच्या फौजेस जर्जर करून सोडिलें, जगदेवानें तर देशांतील नाईक लोकांच्या मदतीनें कुत्बशहाचे तैलंगणांतील बहुतेक किल्ले काचीज केले. जगदेवाची कुत्वाहास इतकी धास्ती पडली, की त्याचा पाडाव करण्याचा नाद सोडून देण्याविषयीं त्यानें आपला सरदार मुस्तफाखान ह्यास हुकूम पाठविला, आणि इरयुक्तीनें जगदेवाशीं तह करण्यास सांगितलें, जगदेवानें गणपुरा व पानगस हे दोन किल्ले आपल्या ताव्यांत घेऊन मोठ्या शिताफीनें सर्व राजांचे तंटे मिटवून युद्ध बंद केलें. जगदेवरावाचे पुढे काय झालें, तें कळत नाहीं. त्यास नाईक लोकांची चांगली मदत होती.

सन १५६७ त कुत्बशहानें पटापूर व राजकुंडी येथील राजा सीतापति व राजमहेंद्रीचा राजा विदियाद्रि ह्यांस जिंकिलें, ह्या कामीं रिफतखान नामक मुसलमान सरदार कुरब्राह । नें योजिला. ओढ्या प्रांतांतील वेलपराजा व चंदुरबारचे नरसिंह व सुरसिंह, ह्या राजांस जिंकून त्यांपासून खंडणी घेण्याचें रिफतखानानें ठरविलें. कंडूदेवपल्ली येथे वैजनाथदेव नांवाचा हिंदु राजा होता. त्याचा पराभव होऊन तो खंडणी देण्यास कबूल झाला. अशा अनेक हकीकतींवरून हिंदु राजांचा कसकसा नाश होत गेला हे स्पष्ट कळून येईल. पुढे सर्व मुसलमान राजांचीं आपापसांत युद्धे सुरू झाली. विजापुरच्या सैन्यांत पुष्कळ मराठे सरदार असतं, आणि ते हरहमेश कुल्वशाहीच्या मुलखास उपद्रव देत. परंतु इब्राहीमशहाच्या चांगल्या शिस्तीमुळे इतर मुसलमानी राजांचें त्याजपुढें कांहीं चाललें नाहीं. पुनः हिंदु राजांवर कुल्लू- शहानें शस्त्र धरिलें. कारण विजयनगरचे अवशेष म्हणून जे कित्येक सरदार राहिले होते, ते शहास वेळेवर खंडणी पोंचवीत नसत. पण मुसलमानी फौजेपुढे कोणाचाच टिकाव लागला नाहीं. इब्राहीम कुत्बूशहाच्या लढाया विशेषकरून विजापुर, मराठे व दक्षिणदेशचे हिंदु राजे ह्यांजबरोबर झाल्या.

ह्या कारकीर्दीच्या अखेरीस मुराररराव नामक एक ब्राह्मण कुत्बूशहाचा दिवाण सर्व राज्यांत अग्रगण्य झाला होता. ह्या मुराररावानें दक्षिणेंतील हिंदूंचीं देवस्थानें फोडून गोवळकोंड्यास लूट आणिली असें म्हणतात. ही गोष्ट शहास पसंत पडली नाहीं. पुढें शहाची प्रकृति बिघडली, आणि तो सन १५८० त आपल्या वयाच्या ५१ वे वर्षों मरण पावला. त्यास एकंदर ३० मुलें झाली, त्यांतून ६ मुलगे व १३ मुली त्याच्या मरणसमयीं जिवंत होत्या.

इब्राहीम कुल्बूशहास लटाईंत कधीही अपजय आला नाहीं. मोहिमेवर असतांना सुद्धां तो कायदे करण्यासंबंधानें विद्वानांशीं संभाषण करी. त्याच्या राज्यांत सर्वोकृष्ट बंदोबस्त होता. गोवळकोंड्याहून कोणत्याही दिशेस एखाद्या दुर्बल बाईनेही सोन्याचें भांडे डोकीवर घेऊन जावें. प्रसिद्ध तैलंग चोरांवर तर त्यानें विलक्षण वचक बसविला. त्याच्या राज्यविस्तारांत कासीमकोंडा, राजमहेंद्री, कोंडबीड हे प्रदेश मुख्य होते. त्यानें अनेक सुंदर व भव्य इमारती बांधिल्या, गोवळकोंड्याची तटबंदी, भिक्षागृहें, इब्राहीमपत्तनचा तलाव, हुसेनसागर तलाव, बडवळ येथील बांध आणि पुष्कळ मशिदी व पाठशाळा इब्राहीमच्या कारकीर्दीत तयार होऊन त्याच्या राज्याची कीर्ति चहूंकडे पसरली. गोवळकोंड्यास व्यापाराची भरभराट होऊन अरबस्तान, इराण, तुर्कस्तान वगैरे अनेक देशांतील व्यापारी इकडील माल खरेदी करून बाहेर नेत. तसेंच परदेशांतील पाहिजे ती चीज गोवळकोंड्यास मिळे. ह्या कारकीर्दीत प्रजेची दाद जितकी लागत असे, तितकी लवकर दुसऱ्या कोणत्याही मुसलमानी राजांच्या कारकीर्दीत दुसऱ्या कोठें लागत नसे. न्यायान्यायाच्या कामीं

शहा अत्यंत दक्ष असे. अधिकारमदानें धुंद न होतां परमेश्वरानें हवालीं केलेल्या लक्षावधि लोकांच्या हिताकडे तो चांगलें लक्ष पुरवी, अन्यायाचरण करीत नसे.

**महंमद कुली कुत्रशहा, (सन १५८० - १६११ ) –**

महंमद हा इब्राहीमचा तिसरा मुलगा. प्रथमारंभींच हिंदु राजांबरोबर त्यास लढाई चालवावी लागली. विजयनगरच्या वंशजांनी आतां पेनकोंब्यास जाऊन आपल्या राज्याची स्थापना केली होती. तें राज्य बुडविण्याचे पुष्कळ यत्न महंमद कुलीनें केले. पण एकंदरींत त्यास विशेष यश आलें नाहीं. विजापुरच्या राजाचें महंमदाच्या बहिणीशीं मोठ्या थाटानें लग्न होऊन, ह्या दोघां मुसलमानी राजांचे आजवर एकमेकांशीं असलेले वैर मिटलें.

अलीकडे गोवळकोंड्याची वस्ती फार दाट होऊन हवा खराब झाली होती, आणि शहरास पाण्याचा पुरवठा नव्हता. तेथून पांच कोसांवर मुशी नदीच्या कांठीं एक स्थळ पाहून सन १५८९ त महंमदशहानें एका नवीन शहराची स्थापना केली. ह्या राजाची भागावती नामक एक आवडती बायको होती. तिच्या स्मरणार्थ ह्या शहरास त्यानें भागानगरी असें नांव दिलें. महमदाचा पुत्र हैदर ह्याच्या नांवावरून त्याच शहरास पुढें हैदराबाद असें नांव पडलें. आरंभींच सरळ व रुंद रस्ते आंखून नंतर महंमदशहानें तेथे सुरेख घरें बांधलीं. रस्त्यांच्या दुतर्फा झाडांच्या रांगा लाविल्या. गोवळकोंड्याचे वर नदीस बांध घालून नळानें भागानगरांत पाणी आणून खेळविलें, तेव्हांपासून त्या शहरी पाण्याचा पुरवठा उत्तम झाला तो अद्यापि तसाच चालत आहे. पुष्कळ भव्य इमारतींनीं तें शहर शोभिवंत दिसूं लागलें. जुम्मा मशीद, चारमिनार, खेरीज पुष्कळ वाडे, दवाखाने, हमामखाने, पाठशाळा व भिक्षागृहें हीं त्याच्याच वेळीं ह्या नवीन शहरी बांधली गेली, तीं आजतागाईत चांगल्या स्थितींत आहेत. दवाखाने व इमामखाने चालण्यासाठीं शहानें मोठमोठ्या नेमणुका करून दिल्या. शहाचा कित्ता दरबारच्या लोकांनींही उचलिला. त्यास बागबगीच्यांची पुष्कळ आवड होती; आणि सर्वांनीं चढाओढीनें पुष्कळ उपवनें तयार केलीं. वस्ती वाढल्यामुळे शहराच्या जागेस किंमतही भारी पडूं लागली. एकंदरींत महंमदशहाची कारकीर्द चांगली झाली. हिंदूंशीं कित्येक युद्धे झालीं, पण स्वतः होऊन शहानें कधीं कोणाची कुरापत काढिली नाहीं. राजधानींत राहून लोकसुखाची वृद्धि करण्यांत त्यानें आपला कालक्षेप केला. सर्व राज्यांत शेतकी- करितां त्यानें पाण्याची सोय केली. राजधानींतच काय, पण सर्व राज्यांत मशिदी, बाडे वगैरे इमारती इतक्या तयार झाल्या की, दक्षिणेंतील कोणत्याही मुसलमानी राजाच्या कारकीर्दीत तशा झाल्या नाहींत.

**महंमद कुली कुत्रशहा, (सन १५८० - १६११ ) –**

महंमद हा इब्राहीमचा तिसरा मुलगा. प्रथमारंभींच हिंदु राजांबरोबर त्यास लढाई चालवावी लागली. विजयनगरच्या वंशजांनी आतां पेनकोंब्यास जाऊन आपल्या राज्याची स्थापना केली होती. तें राज्य बुडविण्याचे पुष्कळ यत्न महंमद कुलीनें केले. पण एकंदरींत त्यास विशेष यश आलें नाहीं. विजापुरच्या राजाचें महंमदाच्या बहिणीशीं मोठ्या थाटानें लग्न होऊन, ह्या दोघां मुसलमानी राजांचे आजवर एकमेकांशीं असलेले वैर मिटलें.

अलीकडे गोवळकोंड्याची वस्ती फार दाट होऊन हवा खराब झाली होती, आणि शहरास पाण्याचा पुरवठा नव्हता. तेथून पांच कोसांवर मुशी नदीच्या कांठीं एक स्थळ पाहून सन १५८९ त महंमदशहानें एका नवीन शहराची स्थापना केली. ह्या राजाची भागावती नामक एक आवडती बायको होती. तिच्या स्मरणार्थ ह्या शहरास त्यानें भागानगरी असें नांव दिलें. महमदाचा पुत्र हैदर ह्याच्या नांवावरून त्याच शहरास पुढें हैदराबाद असें नांव पडलें. आरंभींच सरळ व रुंद रस्ते आंखून नंतर महंमदशहानें तेथे सुरेख घरें बांधलीं. रस्त्यांच्या दुतर्फा झाडांच्या रांगा लाविल्या. गोवळकोंड्याचे वर नदीस बांध घालून नळानें भागानगरांत पाणी आणून खेळविलें, तेव्हांपासून त्या शहरी पाण्याचा पुरवठा उत्तम झाला तो अद्यापि तसाच चालत आहे. पुष्कळ भव्य इमारतींनीं तें शहर शोभिवंत दिसूं लागलें. जुम्मा मशीद, चारमिनार, खेरीज पुष्कळ वाडे, दवाखाने, हमामखाने, पाठशाळा व भिक्षागृहें हीं त्याच्याच वेळीं ह्या नवीन शहरी बांधली गेली, तीं आजतागाईत चांगल्या स्थितींत आहेत. दवाखाने व इमामखाने चालण्यासाठीं शहानें मोठमोठ्या नेमणुका करून दिल्या. शहाचा कित्ता दरबारच्या लोकांनींही उचलिला. त्यास बागबगीच्यांची पुष्कळ आवड होती; आणि सर्वांनीं चढाओढीनें

पुष्कळ उपवनें तयार केलीं. वस्ती वाढल्यामुळे शहराच्या जागेस किंमतही भारी पडूं लागली. एकंदरींत महंमदशहाची कारकीर्द चांगली झाली. हिंदूंशीं कित्येक युद्धे झालीं, पण स्वतः होऊन शहानें कधीं कोणाची कुरापत काढिली नाहीं. राजधानींत राहून लोकसुखाची वृद्धि करण्यांत त्यानें आपला कालक्षेप केला. सर्व राज्यांत शेतकी- करितां त्यानें पाण्याची सोय केली. राजधानींतच काय, पण सर्व राज्यांत मशिदी, बाडे वगैरे इमारती इतक्या तयार झाल्या की, दक्षिणेंतील कोणत्याही मुसलमानी राजाच्या कारकीर्दीत तशा झाल्या नाहींत.

ह्या कारकीर्दीत अनेक हिंदु राजे व सरदार ह्यांजबरोबर महंमद कुलीची फौज लढत होती. पण कृष्णानदीच्या पलीकडे महंमदशहाचा अंमल फारसा गेला नाहीं. इराणच्या शहाकडचा एक वकील भागानगरास राहात असे; आणि इकडचा वकील इराणांत राहात असे. सन १६०७ ह्या वर्षी शहरांत मोठा दंगा झाला, त्यास परदेशी व दक्षिणी लोकांचे भांडण कारण होतें. सन १६११ त महंमदशहा एकाएकीं आजारी पडून मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ४९ वर्षांचे असून त्यानें ३४ वर्षे राज्य केलें. त्याच्या कारकीर्दीत एकंदर ७८ लाख होन लोकोपयोगी कामांकडे खर्च झाले. दरसाल ६० हजार होनांचा भिकाऱ्यांस धर्म होत असे.

**अब्दुल्ला हुसेन कुल्लूशहा, (सन १६११-१६५८) —**

हा महंमद कुली कुरबूशहाचा पुत्र. त्यानेंही पुष्कळ दिवस शांततेनें राज्य केलें. जहांगीरचा पुत्र शहाजहान ह्यानें अहंमदनगरचें राज्य बुडविलें आणि विजापूरच्या शहापासून खंडणी घेण्याचा ठराव केला. तेव्हांच अब्दुल्ला कुल्लूगहानेंही त्यास खंडणी देण्याचें कबूल केल्यामुळे शहाजहानशीं त्याचा स्नेह कायम राहिला. अब्दुल्लाचा मुख्य वजीर मीरजुम्ला हा होता. त्याची प्रख्याति सर्व दक्षिणेंत झाली होती. राज्यकारभार हांकण्यांत तरबेज म्हणून जे मुत्सद्दी हिंदुस्थानांत नामांकित झाले, त्यांत मीरजुम्ला ह्याचें नांव प्रसिद्ध आहे. औरंगजेब सन १६५३ त दक्षिणचा सुभेदार झाला, तेव्हांपासून मीर जुम्लानें स्याजशीं स्नेह संपादिला. ह्याचें मूळचें नांव महंमद सय्यद, इराणचा राहणारों, सन १६३० त स्वदेश सोडून तो गोवळकोंड्यास येऊन हिऱ्यांचा व्यापार करूं लागला आणि आपल्या हुशारीनें त्यानें तेथे प्रधानपद व मीरजुम्ला किताब मिळविला. त्याचा मुलगा महंमद अमीन वाईट चालीचा होता. मीरजुम्ला तैलंगणांत गेला असतां कुत्वशहास राग येण्याजोगें कृत्य अमीननें केल्यावरून शहानें त्यास कैद केलें. स्वारीहून परत आल्यावर मीरजुम्लानें आपल्या मुलास सोडविण्याविषयीं पुष्कळ खटपट केली, पण ती व्यर्थ गेली. तेव्हां मीरजुम्ला कुत्वाहास सोडून औरंगजेबास जाऊन मिळाला. औरंगजेब तरी पहिल्यापासून मसलती असून परराज्यांत शिरकाव करण्यास टपला होता. मीरजुम्ला ह्याच्या मुलास सोडण्याबद्दल औरंगजेबानें शहाजहानाचा हुकूम आणून कुस्बूशहास पाठविला. या गोष्टीनें आपल्या स्वातंत्र्यावर घाला आला असे पाहून, कुत्वाहास अधिकच क्रोध आला. त्यानें अहंमद अमीन ह्याची कैद अधिक सक्तीची करून मीरजुम्लाची सर्व मालमत्ता हिरावून घेतली. त्यावरून शहाजहाननें कुत्बूशहाशीं युद्ध करण्याचा हुकूम औरंगजेबास पाठविला. त्याप्रमाणें

औरंगजेबानें गोवळकोंड्यावर स्वारी केली, तेव्हां शहा अब्दुल्ला मोगलांस शरण गेला, आणि मीरजुम्लाची मालमत्ता परत देऊन व त्याच्या मुलास मोकळे करून, मोगलांस सालिना एक कोट रुपये खंडणी देण्याचे त्यास कबूल करावें लागलें, ह्या वेळेपासून कुन्बूशहा मोगलांचा ताबेदार झाला. त्यानें मरेपर्यंत मोगलांस नियमानें खंडणी दिली. त्यास सोडून मीरजुम्ला मोगलांच्या चाकरीस राहिला; आणि औरंगजेबानें राज्यप्राप्तीविषयीं जे पुढें विश्वासघाताचे अनेक उद्योग केले, त्यांत त्यास ह्या मीरजुम्लाचीच मुख्यतः मदत होती. औरंगजेबास दिल्लीपद प्राप्त झालें. त्याच वर्षी अब्दुल्ला कुल्ब्राहा मरण पावला, मीरजुम्ला किताबाचे पुष्कळ अधिकारी इतिहासांत नमूद आहेत.

**अबू हसन कुत्रशहा, (सल १६५८-१६८७) —**

हा अब्दुल्लाचा जांवई त्याच्या पश्चात् गोवळकोंड्याच्या तख्तावर बसला. हा आळशी व विलासी होता. तरी राज्य चांगलें चालवून रयतेस सुख देण्याच्या कामीं तो नेहमीं तत्पर असे, त्यामुळे त्याजवर लोकांची प्रीति होती. त्यानें मदनपंत नामक एका ब्राह्मणास आपली वजिरी दिली. मदनपंतानें महसुलाचा व इतर बावतींचा बंदोबस्त फार चांगला

ठेविला. शहाचा त्याजवर पूर्ण विश्वास असे. त्याच्याविरुद्ध मुसलमानांनीं केलेल्या कागाळ्या शहा ऐकत नसे. त्या मंडळींत शहाचा सेनापति सामील होता. त्यास मदनपंताचे दरबारांतलें बजन सहन होईना. इकडे सन १६८३ त औरंगजेबाने दक्षिणेवर स्वारी केली. त्या वेळीं छत्रपति संभाजी भोसले ह्याजबरोबर कुत्बूशहानें परस्परांच्या बचावाचा एक तह केला. त्याजवरून औरंगजेबास राग येऊन, त्यानें आपला मुलगा मुअज्जम व खानजहान ह्यांजबरोबर गोवळकोंड्यावर फौज पाठविली. ही फौज आली, तेव्हां सेनापति इब्राहीमखान विश्वासघात करून मोगलांस जाऊन मिळाला. त्या वेळीं शहरांत जी गडबड झाली तींत मदनपंत मारला गेला. अबू हसनने दोन कोट रुपये खंडणी व पुष्कळ द्रव्य देऊन मोगलांशीं तह केला (सन १८८६). पण हा तह फार दिवस टिकला नाहीं. विजापुरचे राज्य रसातळास गेल्यावर औरंगजेब हा जिसुदुराज साधूच्या कबरेचे दर्शन घेण्यासाठीं म्हणून कलबुग्र्यास जाण्यास निघाला. बिचारा अबू हसन औरंगजेबाची मजी प्रसन्न करण्यासाठीं नाना तऱ्हा करीत होता, नजीक आल्यावर औरंगजेबानं कुत्बशहास कळविलें कीं, तुम्हीं ब्राह्मण दिवाण नेमिला, परधर्मी संभाजी राजाशीं दोस्ती केली, आणि स्वतः बदफैली वर्तन सुरू ठेविलें, म्हणून आम्ही तुम्हांशी लढाई करणार.'

कुत्बशहाचे कामदार औरंगजेबानें फितूर केले; आणि गोवळकोंड्यास वेढा घातला. सात महिने कुन्बूशहानें टिकाव धरिला. पुढें सन १६८७ त औरंगजेबानें अबू हसनास पदच्युत करून दौलताबादच्या किल्ल्यावर ठेविलें आणि त्याचें सर्व राज्य खालसा करून आपल्या राज्यास जोडिलें, अबू हसनासाठीं त्याची प्रजा फार हळहळली. त्याच्या सैन्याच्या व शौर्याच्या शेंकडों गोष्टी लोकांच्या तोंडीं अद्यापि ध्या प्रांतीं ऐकू येतात. त्यास कवितेचा मोठा नाद होता. तो तानाशहा नांवानें प्रसिद्ध आहे.

येणेंप्रमाणें कुत्बशाही घराण्याची समाप्ति झाली. ह्या घराण्यानें इ. सन १५१२ पासून सन १६८७ पर्यंत, फक्त सहा सुलतानांनीं, १७५ वर्षे गोवळकोंड्यास राज्य केलें. त्यांनी बांधिलेल्या इमारती व केलेलीं इतर सार्वजनिक कामें अजून मागें राहिलीं आहेत, तीं त्यांच्या वैभवाची साक्ष देतात. बहामनी राज्य किंवा त्याच्या शाखा ह्यांजमध्यें जे एकंदर राज्यकर्ते झाले, त्यांत कुःशाही घराण्यांतील राजे सर्व चांगले व रयतेच्या सुखाची काळजी बाळगणारे असे होते, तसेंच प्रत्येकानें पुष्कळ दिवस राज्यपद भोगिलें. दंगेधोपे, मारामाऱ्या व खून हे त्यांच्या वेळेस फारसे झाले नाहींत. सहा पिड्यांपर्यंत एकसारखे एका घराण्यांतील सहा पुरुष चांगले कर्तृत्ववान् व पुष्कळ वर्षे राज्य करणारे निघाले, हें कुत्बशाहीचे उदाहरण इतिहासांत स्मरणीय आहे.

येथे बहामनी राज्य व त्याच्या शाखा ह्यांचा इतिहास संपला. महाराष्ट्रांत कोठेही गेलें तरी ह्या राज्याच्या खुणा अद्यापि दृष्टीस पडतात. मुसलमानांस इमारतींची आवड विशेष; तिचे परिणाम ठिकठिकाणीं दिसून येतात. विजापुरच्या इमारती प्रत्येकानें एकवार तरी पाहण्यालायक आहेत. त्या बांधणारांचें कसब पाहून मोठमोठे पाश्चात्य शिल्पकलाविज्ञ थक्क होतात. अहंमदनगर, गोंवळकोंडा व कलबुर्गा येथेही प्रेक्षणीय इमारती आहेत. महाराष्ट्रांतील मुसलमानांची बहुतेक लोकसंख्या बहामनी राज्याच्या अमदानींतली असून, त्या वेळचीं अनेक घराणीं ठिकठिकाणीं हयात आहेत. हिंदूंचीं मात्र पुरातन व पिढीजाद घराणीं फारच थोडीं राहिलीं आहेत. ह्या काळांत हिंदुधर्माची व समाजाची अवनतीच होत होती.

बहामनी राज्यें जरी मुसलमानी होतीं, तरी त्यांत कांहीं बाबतींत हिंदूचेंच वजन विशेष होतें. उत्तरेंत जसा देवालयांचा व हिंदु चालीरीतींचा विध्वंस झाला, तसा दक्षिणेंत होऊं शकला नाहीं. उलट पक्षीं हिंदूंच्याच तंत्रानें येथे त्यांस वागावें लागलें. ही स्वराज्याची इच्छा दक्षिणेंत विशेष प्रबल असल्यामुळें मुसलमानी चढाईस अटकाव करण्याच्या हेतूनें विजयनगरास, बहामनी राज्याच्या समकालीन असें एक नवीन हिंदु राज्य स्थापन झालें. ह्या विजयनगरचा इतिहास बहामनी राज्याच्या इतिहासाशी संलग्न आहे. ह्या कारणास्तव, हिंदुस्थानच्या इतर भागांतील मुसलमानी राज्यांचे इतिहास देण्यापूर्वी, विजयनगरचाच इतिहास प्रथम पुढील प्रकरणीं दिला पाहिजे.

**प्रकरण ५**

## खानदेशातील फारुखी

### मलिकराजा किंवा राजा अहमद फारुकी याची कारकीर्द (१३७०-१३९९)

खानदेशातील फारुकी घराण्याची स्थापना मलिकराजा याने इ. स. १३८२ यावर्षी केली. ह्या प्रदेशास खानाचा देश असे नाव पडले. फारुकी राजघराण्याचे नाव हे मात्र दुसरा खलिफा 'उमर अल फारुक' याच्या नावावरून रूढ झालेले दिसून येते. फिरोजशहा तुघलकाच्या कारकीर्दीत सुलतानशाहीच्या विघटनाची चिन्हे दिसू लागली होती. त्यांच्याच नजरेसमोर सिंध, आँध, खानदेश, गुजरात, माळवा इत्यादी स्वतंत्र राज्ये उदयास आली.

### खानदेशात फारुकी राजवटीची स्थापना (इ. स. १३८२)

खानदेशात फारुकी राजाने स्थापन केलेल्या राजवटीचा आरंभ कसा झाला ह्या विषयी विविध स्वरूपाची माहिती उपलब्ध आहे. फेरिस्ताच्या वृत्तांतानुसार मलिकराजाचे पूर्वज हे दिल्ली दरबारात अल्लाउद्दीन खिलजी व मुहंमद तुघलकाच्या कारकीर्दीत मानाचे स्थान प्राप्त केलेले सरदार होते. मलिकराजा तरुण असताना त्याने दिल्ली दरबारात सुलतानाकडे जाऊन त्याच्या सैन्यात नोकरी स्वीकारली. सुलतानास शिकारीचा फार मोठा नाद होता. मलिकराजा नेहमीच सुलतानाबरोबर शिकारीस जात असे. एके दिवशी दरबारातील सरदारांचे लक्ष त्याच्यावर गेले आणि राजाचा खरा निष्ठावंत सेवक म्हणून त्यास समजले व सुलतानाबरोबर शिकारीवर असताना फिरोजशहा सुलतानाने त्यास खोलमखास' किंवा सुलतानाचा संरक्षक म्हणून नेमले. जेव्हा जेव्हा सुलतान शिकारीवर जाई त्यावेळी तो मलिक राजास बरोबर घेत असे. ह्यानंतर फेरिस्ता याने सुलतानाच्या उदारपणाचा आणि मलिकराजास खानदेशाच्या जहागिरीचा प्रदेश कसा मिळाला याचा वृत्तांत खालीलप्रमाणे दिलेला आहे. "सुलतानाने जेव्हा गुजरात प्रदेशात शिकारीची मोहीम काढली, तेव्हा एके दिवशी सुलतान आपल्या छावणीपासून १३ ते १४ कोस लांब अंतरावरील जंगलमय प्रदेशात गेला. त्याच्याबरोबर इतर त्याचे सेवक मात्र कंटाळून परत छावणीकडे माघारी फिरले, सुलतान आणि मलिक राजा मात्र शिकारीसाठी हिंडतच होते. शेवटी सुल्तान थकून पाण्यासाठी व अन्नासाठी व्याकूळ झाला व त्याने मलिक यास काहीतरी मिळेल काय म्हणून विचारले. तेव्हा अशा प्रसंगी मलिक राजाने फिरोजखान तुघलकास गार पाणी आणून त्याची प्रासंगिक तहान व भूक भागविली. त्यामुळे फिरोजखान अत्यंत खूष होऊन त्यास बढती देण्याचे त्याने ठरविले. फिरोजखान दिल्लीत परतल्यावर त्याने मोठा दरबार भरविला. आणि त्यावेळी मलिक राजास दोन हजाराची मनसब देऊन त्यास थाळनेर व कुरंडा हे प्रदेश जहागिरीचे प्रदेश म्हणून देण्यात आले.

हाजी उद डबीर याने झाफर उल वालिह या ग्रंथात राजा अहमद यास दिल्लीचा सुलतान फिरोझशहा याजकडून खानदेशातील जहागिरीचा प्रदेश कसा मिळाला यासंबंधी खालीलप्रमाणे तपशील दिलेला आढळतो. जेव्हा अल्लाउद्दीन बहमन शहा हा दख्खनचा सुलतान म्हणून राज्य करीत होता. (इ. स. १३४६-४७) त्यावेळी असिर येथील सुलतानाचा आजोबा मुहम्मद हा होता. अल्लाउद्दीन आणि मुहम्मद दोन्ही चांगले मित्र होते. त्यांच्यातील मैत्रीच्या संबंधामुळेच बहमनशहा याने मुहम्मद यास स्वतःची बहीण दिली. आणि त्याच्याशी वैवाहिक संबंध जुळविले. तसेच त्यानंतर मुहम्मद यास वझिर म्हणून नेमले आणि त्यास 'ख्वाजा जहान' नावाची उपाधी दिली. मुहम्मद यास अहमद नावाचा मुलगा झाला. अल्लाउद्दीन बहमनशहा नंतर त्याच्या मुलानेही ख्वाजा जहान यास त्याच्या मृत्यूपर्यंत वझिर म्हणून ठेवले होते. त्याच्यानंतर त्याने त्याचा मुलगा अहमद यास मंत्री नेमले. परंतु लवकरच दोघांत जमेनासे झाले आणि त्यामुळे अहंमद याने मंत्रिपदाचा त्याग केला आणि तो दौलताबाद येथे आला. दौलताबाद येथे अनेक सुफी संत राहात होते. त्यात इमाम उ-सालेकिन, शेख- गुल अरिफीन, मिनार-उन-तारिका, मदर उल हकिकत, झियासुद दुनिया वाददिन, मौलाना अलअलिम अलअमिल उर ख्वानी, शाह शैनुद्दीन इत्यादी सुफी संत होते. अहमदशाह शैनुद्दीन यांच्या जवळ गेल्यावर त्या संताने त्यास 'या राजा अहमद' म्हणून स्वागत केले. सुफी संताच्या मुखातून उद्गारलेला 'राजा' शब्द अहमदच्या भाग्याच्या उदयास कारणीभूत ठरेल या आशेने तो दिल्ली येथे गेला. त्यावेळी दिल्लीच्या तख्तावर मुहम्मदशहा बिन

फिरोझशहा हा सुलतान म्हणून राज्य करीत होता. त्याच्या पदरी अहमद काही दिवस साधा सेवक म्हणून राहिला. एके दिवशी सुलतान शिकारीवर गेला असताना त्याच्याबरोबर सैनिक म्हणून अहमदही गेला. शिकारीच्या वेळी बराच काळ भटकत भटकत शिकार करताना सुलतानास तहान लागली व तो पाण्याने व्याकुळ झाला. त्यावेळी, अहमद याने त्यास गार पाणी देऊन त्याची तहान क्षमविली, त्यावर मुक्तान खूष झाला. आणि त्याने अहमद यास तुला काय हवं म्हणून विचारले असता अहमदाने उत्तर दिले की व्यास थाळनेर आणि करऑद (करवंद) खेडे हवे. त्याप्रमाणे सुलतानाने मोठ्या खुषीने अहमद यास गाव बक्षिस दिले. त्यानंतर अहमद याने सुलतानाची परवानगी घेतली आणि तो खानदेशाकडे येण्यास निघाला. ही घटना इ. स. १३८१-८२ या वर्षाची असल्याचे वरील लेखक सांगतो.

**मलिक राजाची खानदेशातील जहागिरी**

इ. स. १३८१ च्या सुमारास मलिकराजा हा दिल्लीहून खानदेशात आला व त्याने थाळनेर व कुरंडा हया जहागिरीच्या प्रदेशाचा ताबा मिळविला. हया प्रदेशात त्यावेळी लहान मोठे अनेक राजे होते. मलिक राजाच्या जहागिरीच्या प्रदेशाच्या पूर्वेकडील भागास राजपूत राजाच्या ताब्यात असलेले वाघळीचे राज्य होते. कासारबारी व पितोळखोरेच्या जवळच लागून यादवांचे मांडलिक राजे निकुंभ यांची सत्ता होती. त्याच्या पूर्वेस मात्र आसिरगड येथे आसाअहिरांचे राज्य होते. थाळनेरच्या दक्षिणेस सोनगीर येथे राजपूत राजांचे राज्य होते आणि मलिक राजाच्या जहागिरीच्या दक्षिणेस मात्र माळरानाचे बागलाणच्या प्रदेशावर राठोड राजाची सत्ता होती. खानदेशातील हा सर्व प्रदेश बहमनी सत्तेच्या स्थापनेनंतरही तुघलकांच्या साम्राज्यात मोडत होता.

**मलिकराजाची बागलाणचा राजा बहिर्जी विरुद्ध मोहीम व विजय**

खानदेशात बारारावळ राजपूत जमातींनी आपापले स्थान बळकट केले होते. मलिकराजा जेव्हा खानदेशात आला तेव्हा त्यास राजपूत राजांशी सामना देणे व त्यांच्याशी संघर्ष करणे अटळ होते. त्यापैकी त्याने प्रथम बागलाणवर चालून जाण्याचे ठरविले. इ. स. १६७० मध्ये मलिकराजाने दिल्ली सुलतानाच्या आदेशानुसार बहिर्जीकडून वार्षिक खंडणी वसूल करण्याची मागणी केली.

पहिल्या मोहिमेत त्यास बागलाणच्या राजाकडून पाच मोठे हत्ती व दहा लहान हत्ती, शिवाय मौल्यवान रत्ने आणि माणिक मिळाले. बागलाणच्या प्रदेशावरील विजय त्याने आनंदाने साजरा केला आणि हत्तींना सोन्याच्या अलंकारांनी सजवून त्यांची मिरवणूक काढली. त्याने अनेक उंटांना रेशमी वस्त्रांनी सजविले होते. बागलाणच्या मोहिमेतील संपत्तीपैकी काही मौल्यवान रत्ने त्याने दिल्लीच्या सुलतानाकडे पाठविली.

**बहमनी राजकारणात हस्तक्षेप**

मलिक राजा हा मुत्सद्दी राज्यकर्ता होता. स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचे ध्येय व महत्त्वाकांक्षा साकार करण्यासाठी त्याने बहमनी राज्याच्या अंतर्गत राजकारणात सक्रिय भाग घेतला होता. त्याने सुलतान महम्मद शाह बहमनीविरोधी बंड करणाऱ्या बहमनखान माझंदरानी ह्यास पाठिंबा दिला होता. त्याने दख्खनमधील सरदारांनी फिरोज तुघलकांच्या विरोधी केलेल्या बंडात सहभाग घेतला नव्हता. याउलट नवीनच स्थापन झालेल्या बहमनी राज्यास त्याचा मात्र विरोध होता. त्यासाठी त्याचे बहमनीच्या अंतर्गत राजकारणातील गटबाजी डावपेचाकडे नेहमी लक्ष ठेवले होते. तेव्हा मात्र त्यास त्याने नुसता पाठिंबा दर्शविला नाही तर त्या बंडात तो त्याच्या बाजूने सामील झाला. परंतु बंडखोरांचा सर्वस्वी पराभव झाल्यामुळे ते गुजरातकडे पळाले तर मलिकराजाने थाळनेर येथे वास्तव्य केले. मलिकराजाच्या कामगिरीवर फिरोज तुघलक बेहोश खूष झाला. गुजरातच्या राज्यपालाने जे काम यापूर्वीच करावयास हवे होते ते कार्य मलिकराजाने पूर्ण केले. त्यामुळे फिरोजशहाने मलिकराजास 'सिपाहसालार' ही पदवी दिली आणि त्यास तीन हजार घोडदळाचा सेनानीचा दर्जा दिला. लवकरच मलिकराजाने १२ हजार घोडदळाचे सैन्य उभारले आणि गोंडवना आणि गुरा मुंडला जाज नुग्गुर इ. ठिकाणच्या राजांकडून खंडणी वसूल केली आणि त्यांच्याशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

१) त्याने माळवा व गुजरातमधील तुघलकाच्या राज्यपालांशी मैत्रीचे संबंध ठेवले होते. जेव्हा फिरोझ तुघलक हा वयोवृद्ध झाला, निष्क्रिय झाला तेव्हा मलिकराजाने त्यास पाठवावयाची खंडणी बंद केली आणि १३८२ पासून खानदेशातील त्याचे राज्य त्याने हे स्वतंत्र राज्य म्हणून घोषित केले. आणि खानदेशात फारुकी राजांची सत्ता प्रस्थापित झाली.

**दैवी कृपेचा प्रसाद म्हणून लाभलेली राजसत्ता**

फारुकी राजा मलिक अहमद ह्यास खानदेशचे राज्य हे दैवीकृपा प्रसाद म्हणून मिळाले असाही एक समज त्याकाळी रूढ असल्याचे दिसते. हाजी-उद-दबीर, हसनखान इतिहासकार म्हणतो की, जेव्हा सुलतान अल्लाउद्दीन बहमनीशहा हा बहमनी राज्याच्या गादीवर आला त्याने त्याच्या बहिणीचा विवाह महम्मदाशी लावून त्यास वझिर पद दिले. आणि महम्मदास 'ख्वाजा जहान' हा किताब दिला. त्यानंतर महम्मदास अहमद नावाचा मुलगा झाला. ख्वाजा जहानच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अहमद हा वझीर बनला. परंतु दरबारातील सरदार व अहमद ह्यांच्यात बेबनाव वाढला. त्यामुळे त्यास कंटाळून अहमदाने पदत्याग केला आणि तो दौलताबाद येथे येऊन राहिला. दौलताबाद येथे त्याकाळी इमाम उस सलेखीन, शाह मैनुद्दीन ह्यासारखे सुफी संतांचे वास्तव्य होते. अहमदाने दौलताबाद येथे आल्यावर वरील संतांचे दर्शन व आशीर्वाद घेतला. जेव्हा अहमद हा शाह शैनुद्दीनाच्या जवळ आला तेव्हा त्या संताने राजा अहमद म्हणून त्याचे स्वागत केले. त्यादिवसापासून अहमदाने त्या संतांच्या मुखातून निघालेल्या 'राजा' हा शब्द शुभ मानून आणि ते शब्द विधि संकेताचे द्योतक समजून ही उपाधी त्याने आपल्या नावास लावली. त्याचबरोबर त्याच्या ठिकाणी आशेचा किरण निर्माण झाला आणि त्यानंतर अहमद हा दिल्लीला आपले भाग्य अजमावण्यासाठी गेला आणि फिरोजशहा तुघलकाच्या दरबारात तो सेवेत हजर झाला. एके दिवशी सुलतान शिकारीवर गेला असताना बऱ्याच दूरवर गेल्यावर व तहान-भूकेने तो व्याकूळ झाला असताना त्यास मलिक अहमदाने गार पाणी आणून त्याची तहान शांत केली. त्यावर फिरोज तुघलक खूष झाला व त्याने अहमदास काय हवे म्हणून विचारले तेव्हा त्याने थाळनेर व करोंडाचा प्रदेश त्यास द्यावा म्हणून विनंती केली. त्यानुसार सुल्तानाने त्यास १३८१ मध्ये ते प्रदेश जहागिरी म्हणून बक्षिस दिले.

**नंदुरबार व सुलतानपूरवरील स्वारी (१३९४-९५)**

मलिकराजाने त्यानंतर त्याचे लक्ष सुलतानपूर व नंदुरबार प्रदेशाकडे वळवून त्या प्रदेशांवर हल्ले चढविले. त्या प्रदेशातील कसदार जमिनीचे त्यास आकर्षण होते. परंतु त्याचा हा प्रयत्न मात्र सफल होऊ शकला नाही. गुजरातच्या मुझफ्फरशहाने स्वतंत्र राजा म्हणून घोषित केल्यावर त्याच्या राज्यात अंतर्गत बंडाळीला ऊत येऊ लागला होता. गुजरातच्या शहाचे धोरण हिंदूविरोधी असल्यामुळे हिंदू जनता त्यास कंटाळलेली होती. सुलतानपूर व नंदुरबार प्रदेश हे गुजरातच्या शहाच्या ताब्यात होते. परंतु त्या राज्यातील बंडाळी व अस्थिरतेचा फायदा घेऊन मलिक राजाने तेथील प्रदेशावर आक्रमण केले होते. तसेच ह्यावेळी माळव्याचा सुलतान दिलावर खान घोरी ह्याने सत्ता मिळविल्यावर मलिक राजाशी संधान बांधले आणि त्याच्याशी मैत्री संपादित केली. त्याच्या मैत्रीचे रूपांतर शेवटी त्यांच्यात वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्यात झाले. त्यानुसार मलिक नासिर ह्या मलिक राजाच्या मुलास दिलावरखानाने त्याची मुलगी दिली आणि माळवा व खानदेश प्रदेशामध्ये वैवाहिक आणि रक्तसंबंधाचे नाते निर्माण केले.

**गुजरातच्या प्रदेशावर आक्रमण :-**

मलिक राजाने दिलावरखानाशी असलेल्या संबंधाचा फायदा घेतला आणि त्याची मदत घेऊन त्याच्या जोरावर त्याने सुलतानपूर व नंदुरबार ह्या प्रदेशांवर हल्ले केले. मलिक राजाच्या आक्रमणाची बातमी गुजरातच्या शहास लागल्याबरोबर त्याने सुलतानपूर व नंदुरबारच्या दिशेने आगेकूच केले आणि खानदेशच्या राजाचे आक्रमण थोपविण्यासाठी तो ससैन्य निघाला. त्यावेळी मलिक राजास माळव्याच्या सुलतानाची वेळेवर मदत मिळू शकली नव्हती. आपल्या सैन्याचा निभाव गुजरातच्या शहाच्या सैन्यापुढे लागणे अवघड असल्याचे मलिक राजाने ओळखले आणि तो सैन्यासह थाळनेरच्या दिशेने माघारी निघाला. त्यानंतर त्याने धाळनेरच्या किल्ल्याचा संरक्षणासाठी आश्रय घेतला असता गुजरातच्या शहाने त्या किल्ल्यास वेढा दिला आणि मलिक राजास जेरीस आणले. तेव्हा मलिक राजाने मोठ्या हुशारीने

व कुशलतेने गुजरातच्या मुजफ्फरशहाशी तहाची बोलणी सुरू केली. तेव्हा खानदेशच्या राजाने लहान लहान हिंदू राजांचा बिमोड करण्यास मदत करण्याचे आश्वासन दिल्यावर मुजफ्फरशहाने शांततेच्या तहास संमती दर्शविली.

**आसा अहिरशी संबंध**

आसाअहिर हा हिंदू राजा संपत्तीवान आणि लष्करीदृष्ट्या सामर्थशाली होता. तरीही त्याने मलिक राजाचे प्रभुत्व स्वीकारल्याचे दिसून येते. तसेच अहिर राजाने मलिक राजास दुसऱ्या अनेक स्वरूपाची मदतही केली होती. त्यास आसाच्या राजाकडून अनेक मौल्यवान वस्तू भेट म्हणून मिळत असत. मलिक राजा जिवंत असेपर्यंत त्याच्या कारकीर्दीत अहिर राजाच्या सामर्थ्याची आणि समृद्धतेची बातमी दिल्लीच्या फिरोजशहा तुघलकास लागली होती आणि त्याने मलिकराजास आसाच्या सत्तेवर नियंत्रण ठेवून त्यास त्याच्या आधिपत्याखाली आणण्याविषयीचा आदेश दिला होता. परंतु आसाअहिर हा मलिक राजाशी फारच निष्ठापूर्वक राहून मांडलिक राजाप्रमाणे त्याच्या आज्ञेप्रमाणे राज्य करीत होता. जरी मलिक राजाने असिरचा गड जिंकण्याचा प्रयत्न केला असता आणि लष्कराच्या जोरावर तो जरी ते साध्य करू शकला असता तरीही मलिक राजावर आसा राजाने केलेल्या उपकारामुळे साध्य करण्यात असमर्थ ठरला असता यात शंका नाही.

**मलिकराजाचे शेती उत्तेजनात्मक धोरण**

मलिक राजाच्या कारकीर्दीपूर्वी खानदेशातील शेतीची वाईट अवस्था होती कारण खानदेश हा प्रदेश वारंवार पडणाऱ्या दुष्काळाची शिकार बनला होता. अखंडितरीत्या येण्याऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे असंख्य शेतकरी आणि जनता मृत्युमुखी पडून अत्यल्प असणाऱ्या ह्या लोकसंख्येच्या प्रदेशात दोन किंवा तीन हजारापर्यंत कोळी व भिल जमातीचे लोक जिवंत राहून कसेबसे जीवन जगत होते. खानदेशातील समृद्ध म्हणून समजला जाणारा प्रदेश म्हणजे आसिरगड जवळचा भाग होय. आसा भागाचा प्रमुख श्रीमंत, सुखी अहिर हा होता. त्याची पत्नी धर्मसहिष्णू आणि परोपकारी वृत्तीची होती. आसाजवळ गोंडवन आणि खानदेश भागात अनेक धनधान्याने भरलेली गोदामे होती. तिने तिच्या पतीस गोर-गरिबांना धान्याचे वाटप करण्यास सांगून त्यांचे दुःख दूर करण्यास नेहमीच प्रयत्न केले. दुष्काळाच्या काळात लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून आसाने आसिरगडाचा जुना तट पाडून नवीन तट उभारण्यास सुरुवात केली होती. अपंग आणि शारीरिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्या लोकांना श्रम करता येत नसल्यामुळे त्यांना विनामूल्य धान्य देऊ केले होते.

मलिकराजाच्या कारकीर्दीत खानदेशात दुष्काळाचे सावट पसरले. हा दुष्काळ 'दुर्गा देवीचा दुष्काळ' म्हणून समजला जातो. हा दुष्काळ म्हणजे मलिकराजासमोर एक आव्हानच होते. परंतु मलिक राजाने दुष्काळावर मात करण्यासाठी प्रशासकीय कौशल्याने " दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांनी विहिरी खोदाव्या म्हणून त्यांना उत्तेजन आणि सरकारी मदत दिली आणि शेतीच्या उत्पादनास प्रोत्साहन दिले. त्यामुळे त्याच्या कारकीर्दीत खानदेशात कापसाचे पीक विपुल प्रमाणावर निघू लागले आणि पुढील काळात कापूस उत्पादन खानदेशातील रोकड रकमेचे पीक म्हणून समजण्यात आले. फारुकी राजाने विहिरी व पाणी पुरवठ्यास उत्तेजन दिल्यामुळे ह्या राज्यातील जमीन मध्ययुगात बागायती जमीन बनली आणि नदी आणि नाल्यावरील पाण्याचे प्रवाह अडवून त्यावर बंधारा बांधून त्याचे पाणी शेतीला पुरवण्यात येऊ लागले. त्यामुळे त्याकाळी खानदेश 'बागायती प्रदेश' म्हणून ओळखला जाऊ लागला. २८ एप्रिल १३९९ रोजी फारुकी घराण्याचा संस्थापक मलिक राजा अहमद याचा मृत्यू झाला आणि त्याने एकूण २९ वर्षे राज्यकारभार केला. त्याच्या मृत्यूनंतर त्यास थाळनेर येथील राजधानीच्या शहरी पुरण्यात आले.

**मलिक, राजाचे इतिहासातील स्थान**

**फारुकींच्या स्वतंत्र राज्याचा संस्थापक**

मलिकराजा एक सामान्य चाकर होता. चाकरापासून मालकापर्यंत त्याने जो बहुमान मिळवला त्यावरून त्याच्या ठिकाणी अनेक सद्‌गुण असावेत यात शंकाच नाही. एक आदर्श सेवक, परिश्रमी चिकाटीखोर व्यक्ती म्हणून त्याचा उल्लेख करता येईल. मलिकराजाची गणना अनेक राज्यसंस्थापकांमध्ये होत असली तरी त्याची तुलना फक्त बहमनी राज्याचा संस्थापक हसन गंगू याच्याशीच करता येईल. हसन गंगूने दुर्बळ केंद्रीय सत्तेचा फायदा जसा घेतला त्याप्रमाणे मलिकराजाने फायदा न घेता स्वतःच्या कर्तबगारीवर व सेवानिष्ठेच्या बळावर त्याने स्वतंत्र राज्याची स्थापना केली. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात त्याचे नाव खानदेशातील फारुकी घराण्याच्या सत्तेची कोनशिला बसविणारा राजा म्हणून अजरामर राहील.

**लोककल्याणकारी प्रशासक**

मलिकराजाच्या अंगी लोककल्याणकारी प्रशासकाचे गुण असल्याचे दिसून येतात. त्याने नवीन राज्याची स्थापना केल्यावर राज्यातील जनतेला दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीस तोंड देता यावे म्हणून त्यांना शेतीसाठी पाणी पुरवठा होण्यासाठी सोयी उपलब्ध करून दिल्या.

विशेषतः शेतकऱ्यांना नदी, नाल्याच्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी करून दिल्यामुळे त्याच्या कारकीर्दीत खानदेशातील सर्व जमीन बागायती जमीन झाली असल्याचे पुरावे सापडतात.

दुष्काळाच्या तडाख्यातून जनतेला वाचविण्यासाठी त्याने आसाअहिरच्या प्रमुखाशी मैत्रीचे संबंध ठेवून त्याच्याकडून जी मदत मिळाली ती सर्व जनतेच्या हितासाठी खर्च केली. दुष्काळाचे संकट एक आव्हान समजून मलिकराजाने मोठ्या धाडसाने आणि प्रशासकीय कौशल्याने त्यास तोंड दिले. त्याच्या धाडसी गुंणामुळे त्याला खानदेशातील इतर राजपूत राजांवर व इतर सत्ताधीशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करता आले आणि त्याची सत्ता खानदेशात दृढ करता आली आणि शेतीचे उत्पादन वाढविण्याकडे लक्ष पुरविता आले. फेरिस्त्याच्या मते मलिक राजाच्या राज्यातील प्रजा दुगदिवीचा दुष्काळाच्या संकटात सापडली असता त्या लहान राज्यातील जनतेला दुष्काळाच्या तडाख्यातून वाचविण्याचे कार्य मलिकराजास त्याच्या अंगी असलेल्या प्रशासकीय कुशलतेमुळे करता आले होते. शेतीच्या विकासासाठी मलिक राजाने केलेले प्रयत्न आणि अमलात आणलेल्या उपाययोजना ह्या संबंधी उद्‌गार काढताना अब्दुल फजल म्हणतो: "मलिकराजाच्या कार्यक्षम व दक्षतापूर्वक व्यवस्थापनेमुळे त्यास ओसाड प्रदेशाप्रमाणे बनलेल्या प्रदेशात मुबलक खानदेशातील फारुकी राजवटीची स्थापना आणि मलिक राजा अहमद याची कारकीर्द / ३२ लोकवस्ती वसविता आली आणि तेथील पडिक जमीन लागवडीखाली आणता आली.

**मुत्सद्दी राज्यकर्ता**

· मलिक राजा हा उत्तम प्रशासक होता. तसेच तो एक मुत्सद्दी राज्यकर्ताही होता. स्वतंत्र राज्याची स्थापना केल्यावर व राज्यात सुव्यवस्था निर्माण केल्यानंतर त्याच्या राज्याच्या शेजारी राजांपासून संरक्षण व्हावे म्हणून त्याने मोठी काळजी घेतली होती. त्याने मोठ्या कुशल राजनीतीचा उपयोग करून राज्यसंरक्षणासाठी आणि दख्खनच्या राजकारणात सत्ता समतोल राखता यावी म्हणून मलिकराजाने माळव्याचा राजांशी वैवाहिक संबंध प्रस्थापित केले होते आणि त्यांच्या मैत्रीचा उपयोग दुसऱ्या सत्ताधीशांच्या विरोधी करून घेतला. त्याने सुलतान दिलावरखान घोरीच्या वारसदाराशी व मुलाशी स्वतःच्या मुलीचा विवाह लावून दिला. तसेच त्या दोन घराण्यांतील रक्तसंबंध अधिकच मजबूत व्हावेत म्हणून त्याने दिलावर खानाच्या मुलीचा विवाह नासिरखान या त्याच्या मुलाशी लावून तिला आपली सून म्हणून घरात आणली. अशाप्रकारे वैवाहिक संबंधाद्वारे खानदेशचे राज्य हे उत्तरेकडील माळवा व गुजरात राज्ये आणि दख्खनमधील बहमनी राज्ये यांच्यातील ('buffer state) दुवा म्हणून राहू शकले. डॉ. राधेशाम म्हणतात, मलिकराजाने मॅकियाव्हलीची जी राजनीती आचरणात आणली त्यामुळे सुरुवातीस त्याच्या मुत्सद्दीगिरीमुळे त्याच्या राज्यास फायदा झाला परंतु शेवटी मात्र ती राजनीती त्याच्या विनाशास कारणीभूत झाली.

मलिक राजा हा महत्त्वाकांक्षी व धाडसी राजा होता. त्याच्या लष्करी गुणांमुळे त्यास खानदेशातील राजपूत राजांचा व इतर त्याच्या शत्रूचा पाडाव करता आला आणि त्याची सत्ता रूढ करता आली. त्याने स्वतंत्र राज्याची निर्मिती स्वतःच्या शौर्यशाली गुणांमुळे निर्माण केली. तसेच त्याच्या संरक्षणासाठी त्याने शेजारच्या राज्यकर्त्यांशी जे वैवाहिक संबंध निर्माण केले त्यामुळे त्याच्या ठिकाणी असलेल्या धाडसी व साहसी गुणांमुळे त्याच्या जीवनातील स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचे स्वप्न साकार करता आले.

**कला व संस्कृतीस उत्तेजन**

मलिकराजा केवळ लष्करी सेनानीच नव्हता, तर कलावंतांना आणि विद्वान राजमुत्सद्दी व्यक्तींना राजाश्रय देणारा राजा होता. त्याच्या राज्यात हुशार आणि मुत्सद्दी राजकारणी माणसांना शेजारील राज्याशी तहनामे अथवा शांतता निर्माण करण्यासाठी पाठविले जाई आणि त्याच्या बुद्धिमत्तेचा व मुत्सद्देगिरीचा उपयोग करून घेतला जात असे. त्याचे उर्वरित आयुष्य त्याने शेती आणि कलेच्या विकासासाठी घालविलेले दिसते.

**सुफी संतांचा आश्रयदाता**

मलिक राजा हा सुफी संप्रदायाचा अनुयायी होता. त्याने दौलताबाद येथील सैनुद्दीन संतांचे शिष्यत्व पत्करले होते. दौलताबाद येथे जाऊन त्याने शेख मैनुद्दीन ह्या संताचा आशीर्वाद घेतला आणि त्याच्या मनातील राजा होण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी संताच्या आशीर्वादाने त्याचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढविला. मलिकराजाचा मुलगा सिरखान यानेही सुफी संताचे शिष्यत्व स्वीकारले होते. त्यानंतरचे होऊन गेलेले फारुकी रामेही सुफी संप्रदायाचे अनुयायी बनल्याचे दिसून येते.

**मलिकराजाची उपाधी**

गलिकराजास राजा अहमद असेही म्हणतात. फेरिस्ताने त्यास मलिक राजा असे आले आहे. इ. स. १५९० च्या फारुकी राजांच्या शिलालेखातील अरबी तपशिलात त्यास, "मलिक थान राजा मलिक" असे म्हटले आहे. संस्कृत भाषेतील वृत्तांतात मात्र त्याला 'बभूव रामा मलिकाभिधानः' असे संबोधिले आहे. यावरून त्याच्या कामगिरीचे महत्त्व लक्षात येते.

**नसीरखान फारुकी**

मलिक नसीर याच्या कारकिर्दीत या घराण्याची सत्ता अमर्याद वाढली. मलिक नसीरखान याने देखील राजसत्तेची निदर्शक अशी चिन्हे धारण केली. त्याच्या कारकिर्दीत विद्वान मंडळींना ठिकठिकाणाहून पाचारण करण्यात आले आणि वाङमयाच्या विकासाला उत्तेजन देण्यात आले. मलिक नसीर याला गुजराथेच्या मुख्तानाकडून खान ही पची मिळाली. आपला बाप मलिक राजा फारुकी हा जेव्हा मृत्युवश झाला तेव्हा त्याची इच्छा शाहीछत्र आणि चामर धारण करण्याची होती हे जाणून त्याने आपल्या नावे जाहीररित्या खुत्वा वाचला जागा असा हुकूम दिला. त्याने भासाभहीर याकडून नसीरचा किल्ला जिंकून घेतला.

असीरचा किला मूळ ज्यांच्या कबजात होता त्या घराण्यासंबंधीची माहिती अतिशय उद्‌बोधक असल्यामुळे ती मी या ठिकाणी संपूर्णपणे देत आहे. खानदेशातल्या एक ऊंच डोंगरमाथ्यावर एक मेंढपाळ राहात असे. त्याच्याजवळ गुरेढोरे आदिकरून अमाप संपत्ती होती. खरे सांगायच तर खानदेशा मधल्या एका प्रमुख जमीनदारांपैकी तो होता. त्याच्या वाडवडिलांच्या ताब्यात ही जहागीर जवळजवळ ७०० वर्षे चालत आलेली होती. त्यांच्या ताब्यात गुराढोरांचे जे कळप होते त्यांचे जंगलात मुळसुळाट असणाच्या दरोडेखोरांच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्यासाठी त्यांनी फार पूर्वी असीरच्या टेकडीभोवती एक कोट बांधला होता. आपल्या बापाची जहागिरी आसाला मिळाली. अतिशय काटकसरी असल्यामुळे त्याच्या जवळील गुरांच्या कळपांची संख्या ५ हजार म्हशी, ५ हजार गाई, २० हजार मेंढ्या आणि १ हजार घोण्यांइतकी झाली. त्याशिवाय त्याने आपल्या स्वतःच्या संरक्षणासाठी आणि शेतीच्या सर्व कामाला उपयोगात आणता येतील असे

१ हजार अनुचर बाळगले. ज्या ज्या वेळी गोंडवन आणि खानदेश येथील शेतक-यांवर संकटे भाली तेव्हा तेव्हा त्यांनी आसाकडे मदतीसाठी धाव घेतली आाणि आसा किंवा ज्याला भासा गवळी म्हणूनही ओळखत त्याने या संकटांचा परिहार केला. आसाअहीर याच्याजवळील संपत्तीत आणि सामभ्यांत जरी अमर्याद वाड झाली तरीदेखील त्याला आसाअहीरा किंवा गवळी हे नाव कायमचे चिकटले. मलिक राजा हा थाळनेर येथे येण्यापूर्वी काही काळ अगोदर खानदेश आणि गोंडवन या जिल्हयांत भीषण असा दुष्काळ पडला, या दुष्काळाच्या परिणामातून कोळी अथवा भिल्ल जमातीचे जेमतेम दोन-तीन हजारांवर लोक देखील सहीसलामत निसटू शकले नाहीत. यावेळी गोंडवन आणि खानदेश येथे आसाच्या ताब्यात अनेक धान्यांची कोठारे होती. धान्य विकण्यासाठी आसाच्या अधिकाऱ्यांनी ती खुली केली. आसाची बायको ही अत्यंत उदार स्वभावाची होती. तिने आसाची प्रार्थना केली की, " तुम्ही गरीबगुरीबांकडून द्रब्य न घेता त्यांना हे धान्य नेण्याची परवानगी या आणि अशा त-हेने इहलोकात चांगले नाव संपादन करा, आणि परलोकात मोक्षसाधना करा (किंवा अमरत्व प्राप्त करून घ्या)." दुष्काळ पीडितांना मदत व्हावी म्हणून आसाने शहराच्या जुन्या भिती पाहून टाकल्या आणि शहराभोवती मजबूत दगडाच्या एका किल्ल्याची उभारणी केली. या कामामुळे त्याला अनेक मजुरांना चाकरीवर घेता आले. ज्यांना शारीरिक कष्ट करता येणे शक्य नव्हते अशा वृद्ध आणि अपंग माणसांना त्याने धान्य वाटले. या दगडी बांधकामाला आसाबहीर असे नाव पडले आणि पुढे त्याचा अपभ्रंश असीर असा झाला,

मलिक राजा याने खानदेश प्रांतावर आपली सत्ता स्थापन केल्यावर तेथील जमीनदारांमध्ये पहिल्या प्रथम आसाने त्याच्याशी निष्ठा व्यक्त केली. याचे कारण आसा हा शांत प्रवृत्तीचा आणि अति-महत्त्वाकांक्षा नसलेला असा होता. मलिक राजाला आपल्या जागी स्थिरस्थावर होण्यासाठी ज्या ज्या काही वस्तूंची गरज लागली त्या त्या सर्व त्याने मलिक राजाला भेट म्हणून दिल्या. काही काळानंतर मलिक राजाच्या मनात असा विचार आला की असीरचा किल्ला हा अतिशय मजबूत आणि आपल्या राज्यांच्या मध्यभागी वसलेला आहे. असा किला जर एखाद्या महत्त्वाकांक्षी अधिका न्याच्या ताब्यात गेला तर आपल्या राज्याच्या सरकारची पढी खिळखिळी करण्यास आणि ती हादरवून टाकण्यास अशा व्यक्तीला सहज शक्य होईल, परंतु मलिक राजावर आसाचे इतके उपकार होते की, जबरदस्तीने असीरचा किला त्याच्या हातातून हिसकावून घेणे हे मलिक राजाला प्रशस्त वाटले नाही. ३३६.३८ ज्यावेळी मलिक नसिर याने राज्यकारभार हाती घेतला त्यावेळी आसाकडून त्याला अनेक प्रकारे वैयक्तिक मदतीचा लाभ झाला. मलिक नसिरला अशी खात्री पटली की आपल्या शांतताप्रिय स्वभावामुळे आसा त्याच्यावर इला करण्यासाठी आपल्याला कोणतेही निमित्त देणार नाही. तरी देखील नसीर याने असार बळकाविण्याचा भाणि तेथे नापली राजधानी करण्याचा निश्चय केला. आपला बेत सिद्धिस नेण्यासाठी म्हणून त्याने पुढील योजना आन्त्रली. त्याने आसाला पुढील मजकुराचे पत्र पाठविले, बागलाण आणि अंतर येथील राजांनी मोठ्या फौजा जमा केल्या आहेत. त्यानी आपले वडील मलिक राजा यांजवरोवर जसे संबंध ठेवले होते तसे आपल्याबरोबर ठेवलेले नाहीत. खेढल्याच्या राजानेही त्याला धमकी दिली आहे. थाळनेरचा किडा आपल्या वडिलांनी आपल्या मृत्युसमयी प्रकट केलेल्या इच्छेनुसार आपला भाऊ मलिक इफ्तिकार याच्या ताब्यात आहे. लालिंगचा आपल्या ताब्यातील किल्ला शत्रूच्या मुलखाच्या इतक्या नजीक आहे की, तो कोणतेच संरक्षण आपल्याला देऊ शकणार नाही. म्हणून माझी आपल्याला अशी विनंती आहे की माझ्या जनान्याच्या मंडळींना आपण असीर किल्ल्यात आभार यावा. भासाने या गोष्टीला खुषीने आपली संमती दिली. मलिक नसीर याचा जनाना येईल त्यांना राहण्यासाठी मुखसोयींनी बोग्य अशा खोल्या तयार ठेवण्याची आणि त्यांच्याकडे पूर्णपणे लक्ष देण्याची त्याने आज्ञा केली. पहिल्या दिवशी स्त्रीयांनी भरलेल्या पुष्कळ डोल्या ३३३.७ किडपामध्ये आल्या. या स्त्रियांना आसाची बायको आणि मुली भेटण्यासाठी गेल्या. दुसऱ्या दिवशी खबर आली की, मलिक नसिर साची बायको, आई आणि इतर जनाना यांना घेऊन २०० बोल्या येत आहेत. ही बातमी कळल्यावर त्यांचे स्वागत करण्यासाठी आसाने किल्याचे दरवाजे खोलण्याचा हुकूम दिला. त्यांना भेटण्यासाठी म्हणून आपल्या सर्व मुलांसह आसा आपल्या अंतःपुरापासून बऱ्याच अंतरापर्यंत गेला. परंतु जेव्हा त्याने या डोल्यांत त्रियांच्या ऐवजी सशस्त्र शिपाई भरलेले बधितले तेव्हा त्याच्या आधर्याला परावार उरला नाही. ह्या शिपायांनी डोल्यांमधून पटापट उड्या मारल्या आणि आसाला त्याच्या सर्व कुटुंबियांसहित ठार मारले. त्याच्या घराण्यातील एकहीं पुरुष मनुष्य त्यांनी शिक्षक ठेवला नाही. (सर्व लहान सहान मुलांची देखील त्यांनी

कत्तल केली.) किल्यातील रहिवाशांना या घटनेचा इतका भयंकर धका बसला की, ज्या ठिकाणी अशी कुर कत्तल झाली तेथून पळून ते आपल्या कुटुंबियांसहित बाहेर निघून गेले. मलिक नसिर ह्यावेळी लालिंगच्या किल्ल्यात होता. भापला बेत सिद्धीस गेल्याचे जेव्हा त्याला कळले तेव्हा तो असीर येथे आला, आणि त्याने किश्याची मजबूत डागडुजी करण्यास प्रारंभ केला. परंतु ते काहीही असले तरी फारुकी घराण्यातील कोणत्याही व्यक्तीला आसाच्या संपत्तीचा उपभोग घेता आला नाही, ही घटना पुराव्यानिशी सिद्ध झाली आहे. असीरचा किल्ला पडला त्यावेळी जो संपत्ती च जडजवाहीर मलिक नसीरच्या ताब्यात आले ते सर्व पुढे अकबर बादशहा २०० वर्षांनंतर दक्षिणेत चाल करून आला आणि असीरचा किल्ला त्याने ताब्यात घेतला तेव्हा त्याच्या हाती पडले,

फारुको घराण्याचा हितकर्ता आणि गुरुस्थानी असलेला सिद्धपुरुष दौलताबादचा शेख जैनुहिन याला ही बातमी कळली. तेव्हा काफरांच्या विरुद्ध मिळालेल्या यशाबद्दल मलीक नसीरचे अभिनंदन करण्यासाठी त्याने खानदेशाकडे कूच केले. शेखला भेटण्यासाठी म्हणून मलीक नसीर आपल्या कुटुंबियांसहित पुढे कूच करून गेला आणि त्याने तापी नदीच्या पचिम किनाऱ्यावर आपला तळ दिला. शेख जेनुद्दिन आपल्या अनेक शिष्यांना घेऊन तेथे पोहोचला आणि त्याने आपले तंबू नदीच्या पूर्व किनाच्यावर ठोकले. मलीक नसीर नदीपार करून गेला आणि त्याने शेखची आपल्याबरोबर असीरला परतण्यासाठी म्हणून खूप मनधरणी केली, आपल्याला तापी नदी पार करण्याची परवानगी नाही असे सांगून शेखने नसीरची विनंती नाकारली. काही काळ मलीक नसीर आणि शेना हे आपापल्या छावण्यांत मुकाम करून राहिले. त्यानंतर शेखने आपली तेथून जाण्याची इच्छा प्रकट केली. शेखने खानदेशाच्या प्रांतात एखाया जहागिरीचा स्वीकार करावा अशी मलीक नसीरने त्याला अतिशय गळ बातली. त्यावर शेख्रने उत्तर दिले की, आमच्यासारख्या विरक्तांना जहागिरीची काय गरज आहे ? परंतु मलीक नसीर याने नदीच्या पूर्व किना-यावर एक शहर बांधाये आणि त्याला शेखच्या नावावरून जनाबाद असे नाव द्यावे, आणि पश्चिम किनाऱ्यावर नसीर ज्या ठिकाणी तक देऊन होता त्या ठिकाणी दुसरे शहर बांधून त्या शहराला दौलताबादचा प्रसिद्ध शेख बुरहाण उद्दीन ३३६. याच्या नावावरून गुन्हाणपूर असे नाव याने एवढी मात्र विनंती त्याने मलीक नसीरला केली. मलीक नसीर याने बुन्हाणपूर येथे आपली राजधानी बसवावी अशी शिफारस शेखने केली. याप्रमाणे दोन्ही शहरे बांधण्यात आली. त्यापैकी बुन्हाणपूर हे नंतर फारुकी घराण्याच्या राज धानीचे शहर बनले.

एक अतिशय जुनी परंतु अतिशय सत्य अशी म्हण आहे ती अशी की, एका गोधडीत दहा दखेशी राहतील परंतु दोन सुछतानांना सामावण्यास एखादे मोठे राज्यही लहान आहे. खानदेशाच्या बाबतीत अगदी असेच घडले, कारण जेव्हा मलीक नसीर बाने असीरवर ताबा मिळविला तेव्हा त्याची कुटिल दृष्टी आपल्या भावाच्या थाळनेर येथील जहागिरीवर पडली. थाळनेरचा ताबा घेण्यासाठी त्याने माळव्याच्या [४] (१९२) मुलतानाला आपल्याला मदत देण्यास उद्युक्त केले. हा हेतू मनात घरून हिजरी ८२० हिजरी ८२०। या वर्षी मठीक नसीर याने थाळनेरच्या दिशेने कूच केले आणि इ. स. १४१७) आपला मेव्हणा माळव्याचा सुलतान होशंगशहा यांची मदत मिळवीली.  मलीक इफ्तिकार याला आपला भाऊ सैन्यासह येताना पाहून आश्चयांचा धक्का बसला. त्याने मलीक नसीरकडे निषेध प्रगट केला, भाणि गुजराथचा सुलतान अहमदशहा याच्याकडून मदत मिळविण्यासाठी त्याला लिहिले, परंतु त्याचा हा प्रयत्न व्यर्थ गेला. सुलतान होशंग याचा मुलगा आणि मलीक नसीर याचा पुतण्या गिजनी- खान हा ५ हजार घोडेस्वार घेऊन मलीक नसीरच्या मदतीसाठी आला. त्यांच्या संयुक्त कारवाईला यश येऊन चोच्याच कालावधीत थाळनेरचा किला पडला. मलोफ इफ्तिकार हा कैद झाला. त्याला असीरच्या किलपावर पाठविण्यात आहे. थाळनेरचा किल्ला अशा त-हेने जिंकल्यावर खानदेश आणि माळवा यांच्या फौजात असा ठराव झाला की दोन्ही फौजांनी कूच करावे आणि माळव्याच्या मुळतानाच्या नावे सुलतान- पूरचा कबजा घ्यावा. ह्या हेतूने दोन्ही फौजांनी त्वरेने कूच केले आणि मुलतानपूरच्या किलपाला बेडा दिला. ही बातमी कळल्यावर गुजराथच्या अहमदशहाने आपले सर्व सैन्य घेऊन दक्षिणेकडे कूच केले. मलोक महमूद तुर्क याच्याबरोबर बन्याचशा तुकड्या देऊन त्याला त्याने भाषाडीवर पुढे रवाना केले, गुजराथच्या सैन्याच्या हालचालीची बातमी कळताच गिजनीखान याने मांइकडे पळ काढला, आणि मलीक नसीर याने थाळनेरकडे माघार घेतली. मलीक महमूद तुर्क याने थाळनेरखा सक्त वेढा दिला. दरम्यान अहमदशहा सुलतानपूर येथे येऊन

पोहोचला. माळल्याच्या राजपुत्राने ऐनवेळी दगा देऊन पळ काढल्यामुळे थाळनेर येथे मलीक नसीरची अतिशय विपन्न अवस्था झाली. त्याने अहमदशहाच्या काही वजीरांकडे शत्रसंधीची बोलणी सुरू केली. ही बोलणी यशस्वी झाली. गुजराथच्या सुलतानाने मलोक नसीरने पाठविलेला [४] (२९३) नजराणा स्वीकारला एवढेच नव्हे तर मोबदल्यात त्याने मलीक नसीरला पांढरे छत आणि गुलाबी चामर ही बहाल केळी, व त्याचा खान ही पदवी देऊन सन्मान केला, तान ही पदवी त्यानंतर मलीक नसीर मरेपर्यंत लावीत असे. यानंतर काही वर्षांनी दक्षिणेच्या अहमदशहा बहमनीला आपल्या मुलाच्या विवाहाच्या निमित्ताने सन्माननीय सोयरिकी घटवून आणावी असे वाटले. म्हणून त्याने आपल्यातर्फे नसीरखानाकडे वकील पाठविले आणि आपला मुलगा राजपुत्र अलाउद्दीन याच्यासाठी नसीरखानाच्या मुलीची मागणी केली. अशा त-हेचा संबंध जुळून आल्यास आपल्या सामयति भर पडेल असे नसीरखान याला वाटले. त्याने अहमदशहा बहमनीच्या विनंतीचा ताबडतोब स्वीकार केला. बुन्हाणपूरहून अहमदाबाद विदर येथे न्हानदेशाच्या राजकन्येला अहमदशहा बहमनीच्या वकिलांनी अतिशय मानसन्मानाने पोहोचविले.

हिजरी ८३३ या वर्षी जलवारा जिल्ह्याचा राजा, इ. स. १४२९ राजा कान्दा हा गुजराथच्या सामर्थ्यांपुढे पराभव पावून पळाला आणि अमीर येथे पोहोचला. तेथे त्याने नसीरस्नानाला काही हत्ती भाणि इतर मौल्यवान वस्तू भेट म्हणून दिल्या. आपला प्रदेश मिळवून देण्यास नसीरखानाने मदत करावी अशी त्याने नसीरखानापाशी याचना केली. यावर नसीर- खानाने उत्तर दिले की, "गुजराथच्या सामर्थ्याला टकर देता येईल एवढी ताकद माझ्यापाशी नाही. परंतु तू जर दक्षिणेच्या सुलतानाकडे मदतीसाठी विनंती केलीस तर कदाचित तो तुझ्या कार्यात तुझ्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करील. याबाबत दक्षिणेच्या मुळतानाखा देण्यासाठी एक खलिता देण्याचे नसीरखानाने राजा कान्हा याला आवासन दिले, नसीरखानाच्या सांगण्यावरून अहमदशहा बहमनीने एक छोटासा सेनाविभाग राजा कान्हाला जापछा प्रदेश जिंकून घेण्यासाठी मदतौदाखड दिला. सैन्याची ही तुकडी नंदुरबार येथे पोहोचल्यावर त्यातील सैनिकांनी नंदुरबार जिल्ह्यात लुटालुट केली. या सैन्याचा प्रतिकार करण्यासाठी आपल्या सैन्याची एक पलटण पाठविण्याचा गुजराथच्या मुलतानाने हुकूम केला. परिणामी दोन्ही फौजांत उढाई झाली. या लढाईत दक्षिणी फौजांचा पूर्णपणे पराभव झाला भाणि त्यांच्यापैकी अनेकजण ठार मारले गेले, या लडाईचा परिणाम साहजिकच दक्षिणेच्या सुलतानाचा गुजराथच्या सुलतानाबरोबर संघर्ष निर्माण होण्यात झाला. कारण आपल्या पराजयामुळे झालेली मानहानी आणि सामर्थ्याला लागणारा काळिमा बुद्धन काउला जावा असे अहमदशहा बहमनीला वाटले. म्हणून त्याने वरील हेतू, मनात घरून राजपुत्र अलाउद्दीन याच्या हाताखाली मोठे सैन्य देऊन ही कामगिरी पार पाडण्यासाठी त्याला पाठविले. हे सैन्य दौडताबाद येथे पोहोचल्यावर राजा कान्हा आणि नसीरखान त्याला येऊन मिळाले, आणि सर्वांनी मिळून गुजराथेच्या दिशेने चाल केली. दोन्ही फौजा समोरासमोर आल्या आणि झालेल्या लढाईत ३६०० पुन्हा एकदा दक्षिणेच्या फौजांचा पराभव झाडा. राजा कान्हा याला उडाईतून पळून जाऊन खानदेशाच्या डोंगराळ मुलखाचा आश्रय घेणे प्राप्त झाले.

हिजरी ८४० यावर्षी नसीरखानाच्या मुलीने आपला नवरा अल्लाउद्दीन शहा याजकडून आपल्याला वाईट वागणूक मिळत असल्याची हकीकत पत्र लिहून आपल्या बापाला कळविली. परिणामी नसारखानाने आपल्या जावयाबरोबरचे सर्व स्नेहसंबंध तोडून टाकले. हिजरी ८४१ यावर्षी गुजराथच्या मुलतानाच्या चिथावणीवरून त्याने बहमनींच्या मुलखावर स्वारी हिजरी ८४१। केली. प्रथम त्याने वन्हाडावर आक्रमण केले, बहमनींच्या कारभारा- इ. स. १४३७ वर असंतुष्ट असलेल्या अनेक दक्षिणी अधिकाऱ्यांनी त्याला पाठिंबा दिला. त्याच्या जोरावर नसीरखानाने जाहीररित्या खुत्बा नापल्या नावाने वाचला. नंतर त्याने नरनाळयाच्या किल्याला वेढा दिला. परंतु अल्लाउद्दीन शहाने मोठे सैन्य देऊन मलीकउत्तुज्जार याची त्याचा प्रतिकार करण्यासाठी रवानगी केली. त्याच्यापुढे टिकाव न लागल्यामुळे मलीक नसीर आणि त्याला सामील झालेले दक्षिणी अधिकारी यांना पलायन करणे भाग पडले. मलीकउत्तुज्जार याने त्यांचा गुन्हाणपूरपर्यंत पाठलाग केला, आणि ते शहर त्याने लुटन साफ उद्ध्वस्त केले. नसीरखानाने यानंतर लालिंगच्या किल्ल्याचा आश्रय घेतला, आणि गुजराथ आणि माळवा यांच्या सुलतानांकडे मदत पाठविण्यासाठी त्यांना विनंती केली. त्यांच्याकडून मठीक नसीरला मदत पोहोचण्याचे अगोदरच त्याच्यावर हल्ला करण्याचे मलीकउत्तुज्जार थाने ठरविले. त्याने झपाटयाने लालिंगच्या दिशेने कूच केले आणि निवडक अशा तीन हजार तिरंदाजाच्या तुकडीसह तो

लालिग येथे येऊन पोहोचला. नसीरखानापाशी फक्त २ हजार सैनिक होते. तरी त्याने मलीकउत्तुज्जारवर हल्ला चढविला, युद्धाची एकच रणधुमाळी माजली, नसीरखानाला माघार घेणे भाग पडले. मोठ्या कष्टाने तो कसाबसा किल्पात येऊन पोहोचला. या लढाईत त्याने जवळजवळ २० इत्ती आणि आपले सर्व रणसाहित्य गमावले,या गंडांतराचा नसीरतानाच्या मनावरअतिशय विपरित असा परिणाम झाला आणि त्यानंतर थोड्याच दिवसांनी तारीख २० हिजरी ८४१ या दिवशी १९ इ. स. १४३७ एकंदर ४० वर्षांच्या कारकिर्दीनंतर तो मरण पावला. नसीरखानाच्या मुलाने थाळनेर येथे नसीरखानाचा बाप मलिकराजा याचे ज्या ठिकाणी दफन केले होते त्याच्या जवळच नसीरखानाचे दफन केले.

**मिरान आदिलखान फारुकी**

नसीरखानाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा मिरान आदिखखान हा जिल्हज ८ गादीवर आला. त्याने माळवा आणि गुजराथ या देशांच्या हिजरी ८४४ मुलतानांना आपल्याला ताबडतोब मदत पाठविण्याबद्दल अतिशय एप्रिल २८ तातडीची पत्रे लिहिली. त्याप्रमाणे गुजराथचे सैन्य थोब्याच अवधीत इ. स. १४४१ सुख्तानपुर येथे पोहोचले. या सैन्याने मलीकउत्तुज्जार याला लालिंगचा वेढा उठविण्यास नाणि दक्षिणेकडे माधार घेण्यास भाग पाडले. या घटने नंतर मिरान आदिडखानाने एकंदर तीन बर्षे राज्य केले. शुक्रवार ८ जिल्हज, हिजरी ८४४ या वर्षी बुन्डाणपूर शहरामध्ये तो ठार मारला गेला. ३३६०११८ त्याला कसा मृत्यू भाला यासंबंधीची समाधानकारक हकीकत मिळविणे मला शक्य झाले नाही. म्हणून या विषयावर मी अधिक माहिती देऊ शकत नाही. थाळनेर येथे नापल्या बापाच्या कबरी शेजारीच त्याची (मिरान आदिउखान ) कवर आहे.

**मिरान मुवारकखान फारुकी**

मिरान आदिछखानाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा मिरान मुबारक हा १२ } गादीवर आला. त्याच्या कारकिर्दीविषयी आपल्याला उपलब्ध असलेली जी माहिती आहे ती अशी त्याने एकंदर १७ वर्षे राज्य केले. या कालावधीत त्याने कोणत्याही परकीय सत्तविरुद्ध आक्रमण करण्याची योजना हाती घेतली नाही अथवा स्वतःवर रज्जब हिजरी ८६१ म १७ इ. स. १४५७ आपल्या शेजारील देशाचा सुलतानांचा वैरभावही ओढवून घेतला नाही. हिजरी ८६१ या वर्षी तो मरण पावला. थाळनेर येथे त्याचे दफन करण्यात आले.

**आदिलखान फारुकी पहिला**

**मिरान घुनी ऊर्फ आदिलखान फारुकी पहिला**

मिरान मुबारकखान याच्या मृत्यूनंतर त्याचा मोठा मुलगा आदिलखान हा गादीवर आला. यापूर्वीच्या खानदेशाच्या कोणत्याही मुलतानाच्या कारकिर्दीत खानदेशाला जेबडे वैभव प्राप्त झाले नव्हते त्याच्या अनेक पटीने आदिलखानाच्या कारकिर्दीत खानदेशची भरभराट झाली. आपल्या शेजारच्या राजांना आदिलखानाने खंडणी देण्यास भाग पाडले, आणि गोंडवन आणि गडमंडला येथील राजांना त्याच्याशी निष्ठा व्यक्त करण्यावाचून दुसरा उपाय उरला नाही. त्याच्या कारकिर्दीत राज्यातले रस्ते कोळी किंवा मिल्छ जमातीच्या दरोडेखोरांच्या होणान्या त्रासापासून मुक्त झाले, आणि खानदेशातील निरनिराळ्या शहरांतील रहिवाश्यांच्या मुखी जीवनाचाही कधी भंग झाला नाही. शादिलखानाने असीरचा किल्ला आणखी तटबंदी उभारून अधिक मजबूत केला आणि किल्पाच्या बाहेरच्या बाजूला अधिक मजबूत तटबंदी उभारली. या तटबंदीला महीगर असे नाव पडले. त्याने बुन्हाणपूरचा बालेकिलाही बांधून काढला आणि बुन्हाणपूरच्या शहरात अनेक भव्य प्रासादांबी उभारणी केली. आदिलखानाचा सत्ता इतकी अमर्याद वाढली की परिणामी त्याने शहा-ई-झारखंड (जंगलचा राजा) असा किताब धारण केला. त्याच्या पूर्वजांनी गुजराथच्या मुलतानाला संडणी देण्यात कधीही खेद पाडला नव्हता. आदिलखानाने मात्र आपल्या सत्तेच्या मदाने धुंद होऊन गुजराथच्या मुलतानाला वार्षिक संदणी देण्याची प्रथा मोडली, भाणि "गुजराथच्या सुलतानाचा ताबा आम्ही ओळखित नाही आणि त्याच्याशी निष्ठा बाळगण्यास आम्ही बांधील नाही" असे जाहीर केले. या जाहीर निवेदनाची खबर गुजराथचा सुलतान महमूदशहा

बेगाडा [४] (९९९) बाला कळल्याबरोबर त्याने लगोलग आपल्या सैन्याला खानदेशात चाल करून जाण्यास आाणि भादिलखानाने इतक्या काळपर्यंत थकविलेल्या वार्षिक संदणीची बाकी बसूल केल्याखेरीज खानदेशातून परत न फिरण्याचा हुकूम दिला.

हिजरी ९०४ या प्रमाणे हिजरी ९०४ यावर्षी गुजराथचे सैन्य इ. स. १४९८ खानदेशात घुसले. खानदेशाच्या सैन्यानेही या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी चाल केली. दोन्ही फौजांत लबाई होऊन खानदेशाच्या फौजा मोठ्या मेटाकुटीने थाळनेर आणि असोर येथपर्यंत माघार घेत आल्या, त्यांनी त्या किलपांचा आश्रय घेतला. गुजराथच्या फौजांनी दोन्ही ठिकाणांना वेढा दिला. महमूदशहाच्या अमर्याद सामभ्यर्याबरोबर ठक्कर देणे आदिलखानाच्या कुयतीबाहेर गेले. स्वतःचा जीव बचावण्यासाठी आणि आपले सरकार शाबूत राहावे म्हणून आदिबखानाडा गुजराथची सर्व थकबाकी चुकती करणे भाग पडले. त्यानंतरच गुजराथच्या फौजा आपल्या देशाकडे परत फिरल्या. या घटनेनंतर ५ वर्षांनी शुक्रबार हिजरी ९०९ या वर्षी आदिलखान मरण पावला. त्याने एकंदर ४६ वर्षे राज्य केले. मृत्युसमयी त्याने प्रकट केलेल्या खास इच्छेवरून त्याचे बुन्हाणपूर येथील दौलत राजवाच्याजवळ दफन करण्यात आले.

**दाऊदखान फारुकी**

आदिलखान मेल्यानंतर त्याच्या जागी त्याचा धाकटा भाऊ दाऊद हा सुलतान पदावर भाला. याचे कारण मिरान आदिलखान याला मुलगा नव्हता. त्याला राज्याभिषेक झाल्यानंतर उगेच हुसेन अली आणि यार अली या दोषा मोगल बंधूचे वर्चस्व अतिशय बाढले आणि दाऊदखानाच्या भोवती त्यांनी जणूकाही आपल्या बचस्वाची मोहिनी टाकली. परिणामी दाऊदखानाने हुसेन अली याला भापला मुख्य वजीर नेमले, आणि त्याला हिसामउद्दीन ही पदद्दी हिजरी ९०९ दिली. दिसामउद्दीन याच्या चिथावणीवरून हिजरी ९०९ मा इ. स १५०३ वर्षाच्या शेवटच्या महिन्यात दाऊदखानाने अहमदनगर राज्याच्या सरहद्दोवरील काही शहरांवर हाडा करण्याचा आपला उद्देश जाहीर केला. दाऊदखाना- कडून अशा त-हेची काहीतरी कारवाई होईल याची अहमद निजामशहा चहरी याची अटकळ होती. त्याने आपले सन्य घेऊन खानदेशाच्या प्रातर्तावर  चाल केली. दाऊदखानाने माघार घेऊन अमीरच्या किययाचा नाथय घेतला, आणि माळव्याचा सुलतान नसीर उद्दीन याच्याकडे मदत मागण्यासाठी आपल्या वकिलाची माळव्याला रवानगी केलो. माळव्याच्या मुलतानाने दाऊदखान हा आपला शेजारी आहे आणि आपला नातेवाईकही आहे हे उक्षात घेऊन त्याच्या मदतीसाठी आपला एक अधिकारी येकबालखान बाला सैन्य देऊन पाठविले, माळव्याच्या मुळतानाबरोबर संघर्ष ओढवून घेण्याची निजामदाहा बही याचो इच्छा नसल्यामुळे त्याने अहमदनगर- कडे माघार घेतली. तरीदेखील येकबालखान हा आगेकूच करीत राहिला आणि तो बुन्हाणप्रला येऊन पोहोचला. तेथे त्याने मुलतान नसीरउद्दीन याच्या नावे खुत्वा वाचला जाईल अशी दाऊदखानावर सक्ती केली. त्यानंतर त्याने दाऊदखानाकडून दोन हत्ती आणि इतर अनेक किरकोळ मौल्यवान जिनसा खंडणी म्हणून वसूल केल्या आणि तो मांडू येथे परत फिरला. यानंतर काही वर्षांनी बुधवार हिजरी ९१६ हिजरी ९०६ या वर्षी एकंदर ८ बर्षे राज्यकारभार केल्यानंतर दाऊदखान मरण ऑगस्ट ६ इ. स. १५१० पावला. त्याच्या मृत्यूनंतर मलीक हिसामऊद्दीन आणि दरबारातील इतर अधिकारी यांनी दाऊदखानाचा मुलगा गिजनीखान याला सिंहासनावर बसविले. परंतु यानंतर २ दिवसांनी दिसामउद्दीन याने तरुण बादशहाला विषप्रयोग करविला.

**आजम हुमायून**

**आदिलखान फारुकी दुसरा ऊर्फ आजम हुमायून**

गिजनी खानाच्या सुत्यूनंतर खानदेशात राजघराण्यापैकी कोणीही पुरुष- मनुष्य हयात नव्हता. त्यावेळी फारुकी घराण्यातील एक राजपुत्र आलमखान हाअहमदनगर येथे वास्तव्य करून होता. खानदेशाच्या सरदारांनी अहमद निजामशहायाच्याकडे आपले प्रतिनिधी मडळ पाठविले आणि खानदेशाच्या मुलतान पदावरबालमखान याला बसविण्याची आपल्याला परवानगी देण्यात यावी अशी त्यांनी निजामशहाला विनंती केली. यावर निजामशहा बहरी आणि वन्हाडचा मुलतान इमाद उल्मुल्क यांची संयुक्त बैठक भरली. या बैठकीत त्यांनी आडमखान याला खानदेशाचा

मुलतान म्हणून मान्यता देण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी असीर किल्ल्याचा किल्लेदार मलीकलारून नावाचा खानदेशाचा अधिकारी होता. त्याने नब्या सुलतानाची सत्ता मान्य करण्याचे नाकारले. यावेळी शादिछ म्हणजे हसनचा मुलगा आणि गुजराथच्या मुळतानाच्या मुलीपासून झालेला नसीरखानाचा नातू. हा थाळनेर येथे राहात होता. त्याने महमूदशद्दाकडे आपल्या आईच्या सांगण्यावरून एक अर्जी दाखल केली. महमूदशद्दाने आपल्या पूर्वजांची गादी मिळविण्याचे कामी आपल्याला मदत करावी अशी विनंती आदिलने या अजात केली. या एकंदर बढा- मोदींचा परिणाम खानदेशाच्या राज्यात यादवी युद्ध सुरू होण्यात होणार आहे, हे महमूदशद्दाने जाणले, आणि आपला नातू जादिलखान याच्या वतीने खानदेशाच्या अंतर्गत बंडाळीत हस्तक्षेप करण्याचा निश्वय केला. या हेतूने त्याने स्वतः खानदेशावर चाल केली. महमूदशहा स्वतः चाल करून येत आहे हे बघितल्यावर हिसामउद्दीन धाचरला आणि त्याने अहमदनगर आणि वन्हाडच्या सुलतानांना आलमखानाला पाठिंबा देण्याबद्दल लिहून कळविले. या दोन्ही सुलतानांनी आपल्या फौजांच्या तुकच्या खानदेशाकडे रवाना केल्या. या सैन्यात एकंदर ४ हजार घोडेस्वार होते. गुजराथच्या सैन्याबरोबर टक्कर देणे आपल्याला शक्य होणार नाही, याची जाणीव होऊन खान- देशाच्या सैन्यांतील अधिकारी इतस्ततः पांगले परिस्थितीने अशा तन्हेने पलटी घेतलेली जेव्हा हिसामउद्दीन याने पाहिली तेव्हा त्याने आरुमखानाला दक्षिणेत पाठविले आणि तो

स्वतः गुजराथच्या मुळतानाला जाऊन मिळाला. असीरच्या किरुपाचा ताबा लारनखान याने या पूर्वीच घेतला होता. तोड़ी गुजराथच्या सुलतानाला जाऊन मिळाला. एवढे झाल्यानंतर महमूदशहाने बुन्हाणपूरच्या राज्यावर आदिलखान याला बसविले आणित्याला आजम हुमायून हा किताब दिला. त्यानंतर त्याने मुजफ्फरशहाच्या मुलीशी त्याचा विवाह लावून दिला. या विवाहाच्या प्रसंगी त्याने आदिलखानाला तीन लक्ष चांदीच्या टंका भेट म्हणून दिल्या. आदिलखानाची बायको म्हणजे गुजराथच्या बहादुरशहाची सख्री बहीण.आदिलखान फारुकीने महमूदशहाच्या सांगण्यावरून गादीवर आल्यावर मलिक लारन याला खानजहान ही पदवी आणि अहवासची जहागिरी दिली. हिसाम-उद्दीनला शाइरियारन्तान ही पदवी देऊन उमराबपद देण्यात आले आणि दानऊर हे शहर जहागिरीदाखल त्याला बहाल करण्यात आले. त्याशिवाय थाळनेरची मुखत्यारी त्याच्याकडे सोपविण्यात आली. या दोघांशिवाय इतर अनेक सरदारांना पद्व्या आणि लहान जहागिरी देण्यात आल्या. त्या नंतर महमूदशहा बेगाडा हा अहमदाबाद येथे परतला.

याप्रमाणे खानदेशाच्या राज्यकारभारावर आजाच्या मदतीने स्थानापन्न झाल्यावर आदिउखानाने आपली मालमत्ता आणि कुटुंबीय मंडळी यांना थाळनेरहुन बुव्हाणपूर येथे हलविले. त्याबरोबरच हिसामउद्दीन याने बुन्हाणपूरहून थाळनेर येथे स्थलांतर केले. थाळनेरचा संपूर्ण जिल्हा त्याला आदिळतानाकडून जहागिरीदाखल मिळाला. काही काळानंतर आदिलखानाला असे आढळून आले की त्याला सिंहासनावरून काढून आलमखानाला गादीवर बसविण्याच्या हेतूने हिसामउद्दीन याची अहमदनगरच्या दरबाराबरोबर कारस्थाने चाललेली आहेत. त्याने ताबडतोच हिसामउद्दीनला दरवारात हजर राहण्याबद्दल हुकूम केला. दरबारात बोलावणे कशासाठी आले आहे हे हिसामउद्दीन वाने ओळखले. ह्या आशेचा अनादर करून आदिल्खानाला चिडण्याचे निमित्त यावयाचे नाही किंवा आपल्याबरोबर अगदी थोडी माणसे घेऊन आपल्याला सहजासहजी पकडण्याची संधी आदिलखानाला यावयाची नाही असा हिसामउद्दीन याने निश्चय केला. याप्रमाणे ठरविल्यानंतर बरोबर ४००० पोडेस्वारांची फौज घेऊन तो बुन्हाणपूरला गेला. तेथून काही अंतराबर त्याची आणि आदिउखानाची भेट झालो. आदिलखानाजवळ जेमतेम ३०० स्वारांचा ख्वाजमा होता. हिसामउद्दीन याची आदिल्तानाने सर्व तम्हेने बडदास्त ठेवली आणि दरबारी रिवाजानुसार त्याने दुसन्या दिवशी इतमानाने आदिलखानाला भेट द्यावी असे ठरविण्यात आले. या प्रसंगी हिसामउद्दीन हा दिवाणखाना सोडून गेल्याबरोबर लगेच त्याला ठार मारावे अशा त-हेचा हुकूम आदिलखानाने आपल्या अनुयायांना दिला. अपेक्षेप्रमाणे हिसामउद्दीन आदिलखानाच्या भेटीसाठी राजदरबारात आपल्या सर्व अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन आला, आदिलखानाने दबकून जावे या हेतूने त्याने आपले घोडेस्वारांचे सर्व सैन्य बाहेर साडे उभे केले होते. बन्याच वेळपर्यंत आणि रितीरिवाजाप्रमाणे दोघांची भेट झाल्यावर आदिकखानाने हिसामउद्दीन याला शेजारच्या खाजगी दिवाणखान्यात नेले. "आपल्याला काही महत्वाच्या आणि खाजगी गोष्टीबद्दल तुझ्याशी बोलावयाचे आहे, " असे त्याने हिसामउद्दीन याला सांगितले. तेथून परतल्यावर आदिलखानाच्या रक्षकांनी हिसामउद्दीनवर हल्ला करून त्याची कत्तल केली. गुजराथचा सुलतान

महमूदशहा बेगाडा याने आपला एक अधिकारी मलिक बुरहाण याला आदिलखानाचा मंत्री म्हणून आपल्या पाठीमागे ठेवले होते.

त्याने हिसामउद्दीनच्या अधिकाऱ्यांवर ताबडतोब इला केला आणि [४] (३०६) त्यांच्यापैकी बहुतेकांना यमसदनी पाठविले. हा हला होत असतानाच तिकडे गुजराथच्या फौजेतील निवडक घोडेस्वारांची एक तुकडी हिसामउद्दीनच्या घोडदळावर तुट्टन पडली आणि त्यानी त्यांची पांगापांग केली. आदिलखानाने योजलेल्या या उपार्यात जरी भयानक रक्तपात झाला तरी परिणामी त्याची सत्ता थाळनेरच्या सबंध जिल्ह्यावर प्रस्थापित झाली. थाळनेरच्या जिल्ह्याने त्याच्या राज्याचा जवळजवळ अर्चा भाग व्यापला होता. हिसामउद्दीनच्या मृत्यूमुळे आदिल्खानाचा एक महत्त्वा कांक्षी क्षाणि बलवान प्रतिस्पर्धा नाहीसा झाला.

यानंतर काही काळाने आदिलखानाने असीरच्या किल्ल्याला भेट दिली.तेथे शेरखान आणि संफखान हे दोन गुजराथी अधिकारी आपल्या विरुद्ध अहमद-नगरच्या निजामशहा बहरी यांजबरोबर कारस्थान करीत आहेत असे त्याला आढळूनजाहे. प्रत्यक्षात निजामशहा बहरी हा आलमखानाला बरोबर घेऊन खानदेशाच्यासुलतानपदावर त्याला बसविण्यासाठी खानदेशाच्या सरहद्दीवर येऊन दाखल झाला.आदिख्खानाने गुजराथच्या मुजफ्फरशहाकडे आपला एक दूत पाठवून त्याला एकंदर घडामोडींची सायंत हकीकत कळविली आणि आपल्याला मदतीसाठी म्हणून फौजपाठविण्याबद्दल त्याच्याकडे याचना केली. दूताबरोबर पाठविलेला निरोप मिळाल्या नंतर मुजफ्फरशहाने सैन्य उभे करण्यासाठी म्हणून आदिउखानाकडे ११ लक्ष टंका पाठविण्याबद्दल आपल्या खजिनदाराला हुकूम केला आणि दिलावरखान व सफ्दर- ज्ञान या दोन अधिका-यांच्या हाताखाली मोठे सैन्य देऊन त्यांना खानदेशाकडे रवाना केले. वारिलखानाला त्याने त्याजबरोबर असेही कळविले की, "जरूर पडल्यास तुझ्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी मी स्वतः चाल करून येईन." तो असेही उद्गारला, "निजामउम्मुल्क बहरी हा स्वतःला सुलतान म्हणवितो. परंतु दक्षिणेच्या सुलतानांच्या राजघराण्यातील एक गुलाम एवढीच त्याची लायकी आहे. फारुकी घराण्याच्या औरस वारसांपैकी जो आदिलखान त्याच्या विरुद्ध आक्रमण करण्याचे धाडस दाखविल्याबद्दल त्याला प्रायश्चित्त भोगावे लागेलच. त्याचा अपराध अधिक आहे, कारण त्याने माझ्या जावयाविरुद्ध आक्रमण केले आहे." गुजराथच्या दरबारात रुतू असलेल्या अहमद निजामशहाच्या वकिलालाही मुजफ्फरशहाने बोलावणे पाठवून वरील अर्थाची कडक शब्दाने त्याला समज दिली. त्याला असेही सांगण्यात आहे की, "प्रत्यक्ष आमचा राजमुकुट जरी धोक्यात आला तरी देखील आदिल- खानाला सर्वतोपरीने मदत देण्याचा आमचा ठाम निश्चय आहे." परिस्थितीने घेतलेली कलाटणी अहमद निजामशहाने पाहिली आणि माघार घेणे शहाणपणाचे ठरविले, शेरस्तान आणि सैफखान यांना गावीळगडाकडे माघार घेऊ देण्यात भाली. यानंतर गुजराथच्या सुलतानाकडून खानदेशात अ दिलखानाच्या मदतीकरता पाठविलेले सैन्य येऊन पोहोचले. त्या सैन्याचा उपयोग आदिलखानाने गाळण्याच्या राजाकडून खंडणी वसूल करून घेण्याकडे केला. गाळण्याचा राजा हा अहमदनगर राज्याचा मांडलिक होता. त्याच्याकडून आदिलखानाने खंडणीच्या रूपाने मोठी रक्कम वसूल केली. यानंतर आदिछखान बुन्हाणपूरकडे परतला आणि त्याने गुजराथच्या फौजेला नापल्या देशाकडे जाण्यासाठी निरोप दिला.

हिजरी ९१३ यावर्षी आदिलखान आपला सासरा इ. स. १५१७) गुजराथचा सुलतान मुजफ्फरशहा याजबरोबर फौज घेऊन मांडू येथे गेला. मुजफ्फरशहाच्या माळव्यावरील मोहिमेत आदिलखानाने त्याला सर्वतोपरी सहाय्य केले. हिजरी ९२६ या वर्षी आदिलखान अतिशय आजारी इ. स. १५२० पडला आणि बुन्हाणपूर येथे त्याला मृत्यू आला. त्याची कारकीर्द एकंदर १९ वर्षे झाली. त्याच्यानंतर त्याचा वडील मुळगा मिरान महमद हा गादीवर भाला. ह्याची आई म्हणजे गुजराथचा सुलतान बहादूरशहा याची बहीण, ३३६.140

**मिरान महमदखान फारुकी ऊर्फ मिरान महमदशहा**

मिरान आदिलखान फारुकी दुसरा बाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा मिरान महमदखान हा गादीवर भाला. तो कारभारावर आल्यानंतर काही कालावधीने वन्हाडचा सुलतान इमादशहा आणि अहमदनगरचा सुलतान बुरहाण निजामशहा यांच्यात परस्परामध्ये संघर्ष सुरू झाला. या युद्धामध्ये आपला सर्व मुलुख इमादशहाने गमाबिला नाणि आश्रमासाठी तो बुन्हाणपूर येथे आला. तेथून इमादशहा आणि खानदेशाचा मिरान महमदखान या दोघांनी गुजराथचा सुलतान बहादूरशहा याला पत्र लिहिले आणि अहमदनगरचा सुलतान बुरहाण निजामशहा याच्याबरोबर निर्माण झालेल्या मतभेदात हस्तक्षेप करण्याबद्दल त्याला विनंती केली. यावर बहादूरशहाने पट्टणचा सुभेदार ऐनउल्मुल्क याची बुन्हाणपूरकडे रवाना होण्यासाठी नियुक्ती केली आणि दोन्ही पक्षांत तह घडवून आणण्यासाठी मध्यस्थाचे काम त्याने [४] (३०९) करावे अशी त्याला आज्ञा केली. गुजराथच्या दरबाराने प्रकट केलेल्या इच्छेला मान देण्यासाठी म्हणून दोन्ही पक्षातील मतभेद तात्पुरते मिटावे अशा पुढे आलेल्या प्रस्तावाला त्याने आपली संमती दिली. परंतु बहादूरशहाचा वकील परतल्यानंतर लगेच त्याने माहूरवर इल्ला केला आणि माहूरचा किल्ला जिंकून घेतला. त्याचप्रमाणे बन्हाडचे दुसरे अनेक जिल्हे त्याने काबीज केले. याचा परिणाम म्हणून हिजरी ९३४ या वर्षी हिजरी ९३४) खानदेशाच्या मिरान महमदखानाबरोबर इमादउल्मुल्कने मैत्रीचा इ. स. १५२७ करार केला. मिरान महमदखानाने आपले सर्व सैन्य आणि हत्ती घेऊन इमादद्दन्मुल्क याच्या मदतीसाठी कूच केले. दोघा सुलतानांच्या फौजांचा मिलाफ गोदावरी नदीच्या तीरावर झाला. काही दिवसानंतर त्यांच्या फौजांत आणि बुरहाण निजामशहाच्या फौजांत युद्ध झाले आणि त्यात बुरहाण निजामशहाचा पराजय झाला. आपल्याला मिळालेल्या यशाचा इमादउलूमुल्क याला गर्व चढला आणि त्याने आपल्या फौजेला उडाइट करण्यासाठी परवानगी दिली. त्यामुळे त्याची फौज इतस्ततः पांगली गेली. त्यामुळे आपल्या सैन्याची पुनर्रचना करण्याची संधी शत्रूला मिळाली, बुरहाण निजामशहाने ३ हजार घोडेस्वारांच्या तुकडीला बरोबर घेऊन वन्हाड आणि महानदेश याच्या संयुक्त फौजांवर हल्ला चढविला. त्या हाडचात त्याने पूर्वी गमावलेले आपले सामानसुमान मिळविले. एवढेच नव्हे तर खानदेशाच्या सैन्यातील अनेक हत्ती कार्बीज केले, खानदेशाच्या सैन्यापैकी अनेक सैनिक मारले गेले. नुकत्याच विजयी झालेल्या इमादउल्मुल्क याच्या सैन्याचा धुव्वा उडाला आाणि त्यांचा ८ मेलापेक्षा जास्त अंतरापर्यंत पाठलाग करण्यात आला. मिरान महमदखानाने असोरच्या मागनि माघार घेतली, तर त्याचा दोस्त इमाइ उलमुल्क हा गावीलगडाकडे पळाला. दोर्षांनी आपापल्या ठिकाणांहून त्यांच्यावर गुजरलेल्या प्रसंगाची हकीकत गुजराथच्या बहादूरशहाला कळविली. अनेक वार त्याच्या विनवण्या केल्यानंतर गुजराथचा मुलतान हा स्वतः बुन्हाणपूर येथे चालून आला. तेवून त्याने मिरान महमदखान आणि इमादउल्मुल्क यांना बरोबर घेऊन दक्षिणेकडे चाल केली. तोजालन्यापर्यंत घुसला. वाटेत त्याला कोणताही प्रतिकार झाला नाही. तेथे भाल्या- नंतर वन्हाड स्वतःचे ताब्यात आणण्याचे दृष्टीने बहादूरशहाने योग्य त्या उपाय योजना केल्या आणि बन्हाडच्या राज्यकारभारात इमादउल्मुल्फच्या अधिकाऱ्यांना काढून टाकून त्यांच्या जागी आपल्या अधिकाऱ्यांना नेमण्याची धमकी त्याने इमाद- उल्मुल्क याला दिली. बहादूरशहाच्या बेर्ताचा सुगावा इमादउल्मुल्क याला लागला तेव्हा त्याने याचाबत काय करावयाचे यासंबंधी मिरान महमदखान याच्याबरोबर विचारविनिमय केला. मिरान महमदखानाने पुढीलप्रमाणे उत्तर दिले, "परकीयांची मदत मागितल्याचा हा साहजिकच परिणाम आहे. यावर उपाय एकच आणि तो म्हणजे बहादूरशहाच्या नावे सार्वजनिक ठिकाणी खुल्या वाचणे, त्याच्या नावे नाणी पाडणे, त्याचे मांडलिकत्व कबूल करणे आणि त्याच्या राज्याचे आपण सेवक असल्याची ग्वाही देणे हा होय. " मिरान महमदखानाने सुचविलेली योजना अतिशय अपमाना-स्पद होती. तरीही तिचा स्वीकार करण्यात इमादउळूमुल्कने कोणतीही कुचराई  दाखविली नाही. परिणामी त्याने बहादूरशहाला वरीलप्रमाणे सुचविले, आणि त्याप्रमाणे कारवाई करण्यासाठी म्हणून ताबडतोब अहमदनगरच्या दिशेने कूच करुन असा शह त्याने बहादूरशहाला दिला. यामुळे बहादूरशहा इतका खुष झाला की त्याने इमादउल्मुल्क आणि मिरान महमदखान त्यांनी सुचविलेल्या योजनेला भापली पूर्णपणे संमती दिली. यानंतर त्याने वन्हाड आणि खानदेश यांच्या सैन्यासहवर्तमान अहमदनगरच्या दिशेने कूच केले. गुजराथच्या इतिहासात यापूर्वीच निवेदन केल्या- प्रमाणे गुजराथच्या सुलतानाच्या नावे जाहिररित्या खुब्याचे वाचन करण्यात आले. ही मोहीम संपल्यानंतर बहादूरशहाने भडोचकडे कूच केले आणि मिरान महमदखान व इमादउन्मुल्क हे आपापल्या राजधान्यांकडे परतले.

हिजरी ९३९ या वर्षी माळब्याचा प्रदेश जिंकून इ. स. १५३९) घेण्यासाठी बहादूरशहाने माळव्याच्या दिशेने कूच केले. या मोहिमेत बहादुरणद्दाने जेव्हा मांडूचा किल्ला जिंकून घेतला त्या प्रसंगी मिरान महमदखान हा हजर होता. त्यानंतर तो बुन्दाणपूर येथे परतला. [४] (३११) माळयाचे राज्य बहादूरशहाने आपल्या ताब्यात घेतल्यामुळे अहमदनगरच्या बुरहाण निजामशहाच्या मनात भयंकर धास्ती निर्माण झाली. त्याने मिरान महमदन्तानाकडे आपला वकील रवाना केला. वकिलातर्फे त्याने खानदेशाच्या सुलतानाबद्दल आपल्याला बाढणारा आदर प्रगट केला आणि अहमदनगर आणि गुजराथ या दोन राज्यांमध्ये त्यावेळी अस्तित्वात असलेले काही मतभेद मिटविण्यासाठी आपल्या वतीने गुजराथच्या सुलतानापाशी बोलणी करण्याची त्याने मिरान महमदव्हानाला विनंती केली.

पुढील वर्षी बहादूरशहा हा बुऱ्हाणपूरकडे कूच करून गेला. तेथे त्याची आणि बुरहाण निजामशहाची भेट झाली. बुरहाण निजामशहाला त्याने सफेत छत्र आणि बंदरी रंगाचे चामर ही बहाल केली. यानंतर बुरहाण निजामशहा हा अहमदनगरकडे परतला आणि बहादूराहाने माळव्याकडे कूच केले. गुजराथच्या मुलतानाच्या चितोडवरील मोहिमेत मिरान महमदखान हा त्याच्याबरोबर होता. बहादूरशहावर नंतर हुमायून बादशहाने हल्ला केल्यामुळे त्याला मांडूपर्यंत माघार घ्यावी लागली. त्यावेळोही मिरान महमदखान त्याच्याबरोबर होता. हुमायूनने त्यानंतर संपूर्ण गुजराथच्या प्रदेशावर आपला ताबा बसविला आणि आपला एक बरिष्ठ अधिकारी आसफखान याला दक्षिणेकडील देशांतून खंडणी वसूल करण्यासाठी रवाना केले. तो स्वतःही बुन्हाणपूरकडे कूच करण्यासाठी निघाला होता. त्याचा उद्देश निःसंशय बुन्हाणपूर ताब्यात घेण्याचा होता. परंतु बंगाळमधून शेरशहाने दिल्ली च्या ताभ्यातील मुलखात जी धडक मारली त्यामुळे माळव्यातून आध्याच्या दिशेने परत फिरणे हुमायूनला भाग पडले, त्याचमुमारास बहादूरशहाने गुजराथ ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला, त्याचवेळी त्याने मिरान महमदशहाला माळव्यावर हल्ला करून दिलीच्या अधिकाऱ्यांची हकालपट्टी करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे मिरान महमदखानाने कारवाई केली आणि गुजराथ सरकारने पूर्वी नेमलेला माळव्याचा सुभेदार मल्लूरखान याच्याशी संगनमत करून मांडूचा ताबा घेतला. मिरान महमदखान हा तेथे असताना त्याच्या कानावर बातमी आली की दीव येथील काफर पोर्तुगीजांच्या हातून बहादूरशहा हा ठार मारला गेला आहे आणि बहादूरशहाच्या भाईने आपल्या दरबारातीलं अमीर उमरावांच्याबरोबर मसलत केल्यानंतर खानदेशाचा मिरान महमदस्तान याला गुजराथचा सुलतान म्हणून जाहीर केले आहे. त्यानंतर थोडयाच काळाने मिरान महमदखान याला गुजराथेला घेऊन जाण्यासाठी मांडू येथे काही प्रतिनिधी आले. दरम्यान अनौपचारिकरित्या त्याला मांडू येणे राज्याभिषेक करण्यात आला. मिरान महमदखानाने मिरान महमदशहा द्दी पदवी घेतली. परंतु त्याची कारकीर्द ही फारच थोडया काळपर्यंत टिकली. कारण अहमदाबादकडे जाण्याच्या जिलकाद १३ हिजरी मे ४ ९४१ इ. स. १५३५ } मार्गावर असताना त्याला भयंकर तापाने घेरले आणि तो एकाएकी १३ जिलकाद हिजरी ९४२ या वर्षी मरण पावला. त्याचे शव बुन्हाणपूर येथे नेण्यात आले. त्याचा बाप आदिलखान दुसरा याच्या कबरीशेजारीच त्याचे दफन करण्यात आहे.

**मिरान सुवारकखान फारुकी**

मिरान महमदशहाचा मृत्यू झाला त्यावेळी त्याची सर्व मुले लहान होतो आणि राज्याचा कारभार हाती घेता येण्याइतके कोणत्याच मुलाचे बय नन्हते. मिरान महमदशहा याचा बुन्छाणपूर येथे मृत्यू झाल्याचे त्याचा भाऊ मुबारक याच्या कानावर पडले, तेव्हा त्याने ताबडतोब शहा हे बिरुद धारण केले आणि आपल्या नावे खानदेशाचा सुलतान म्हणून द्वाही फिरविली, तो सुलतान पदावर आल्यानंतर काही काळाने गुजरातच्या अमिरांनी त्याच्याकडे राजपुत्र महमूद याला ताब्यात घेण्यासाठी म्हणून गुजराथ राज्याचा एक अधिकारी इहितयारखान याची नियुक्ती केली. राजपुत्र महमूद हा गुजराथच्या बहादूरशहाचा पुतण्या उतिफखान३६-१७ याचा मुलगा होता. बहादूरशहाने त्याला आपल्या हयातीतच खानदेशाच्या मिरान महमदखानाकडे पाठवून त्याला आयुष्यभर एखाद्या डोंगरी किल्यावर मंदिस्त करून ठेवण्यास सांगितले होते. मिरान मुबारक याला गुजराथच्या सिंहासनावर सुलतान म्हणून येण्याची महत्त्वाकांक्षा होती. त्याचा भाऊ मिरान महमदशहा याला त्याच्या मृत्यूच्या अगोदर काही काळच गुजराथच्या सिंहासनावर बसविण्यात आल्याचे त्याने पाहिले होते. म्हणून त्याने राजपुत्र महमूद याची सुटका करण्याच्या कामामध्ये अनेक अडथळे निर्माण करण्यास सुरुवात

केली. परंतु महमूद याला कैदेत ठेवल्याबद्दल गुजराथच्या अधिकाऱ्यांनी आपली प्रतिक्रिया हिजरी ९४३ ) इतक्या तीव्रपणे प्रकट केली की सद्यःपरिस्थितीत महमूदला इ. स. १५३६ } ) सोडण्याचे धोरण हेच लाभदायी ठरणार या जाणावेने तसा निर्णय घेणे मिरान मुबारक बाला भाग पडले, परिणामी त्याने इख्तियारखानाला राजपुत्र महमूदचा ताबा घेण्याची परवानगी दिली. महमूदला गुजराथेत नेण्यात आहे आणि त्यानुसार हिजरी ९४३ या वर्षी अहमदाबाद येथे त्याला राज्याभिषेकः करण्यात आला.

याच सुमारास गुजराथचा एक अधिकारी इमादउल्मुल्क याने गुजराथे- वून पळ काढला बाणि तो बुन्हाणपूर येथे आधयार्थ आला. मिरान मुबारकखान याने त्याचा आदरसत्कार करून त्याला आश्रय दिला आणि त्याने १२००० गुजराथी घोडेस्वारांची जमवाजमव करण्याबद्दल सर्वतोपरी उत्तेजन दिले. या फौजेला बरोबर घेऊन दोघांनी मिरान मुबारकखान याला गुजराथेच्या सिंहासनावर बसविण्याच्या हेतूने गुजराथेच्या दिशेने कूच केले. त्यांना प्रतिकार करण्यासाठी गुजराथचा सरदार दर्याखान हा गुजराथचा मुलतान महमूदशहा तिसरा याला बरोबर घेऊन पुढे सरसावला. दोन्ही फौजांची गाठ पडून अतिशय तुंबळ असे युद्ध झाले आणि त्यात खानदेशाच्या फौजांचा पराभव झाला. मुबारकखानाने असीर येथे पळ काढला आणि इमादउल्मुल्क याने मांडूच्या दिशेने पलायन केले. तेथे त्याने [४] (३१५) माळव्याचा सुलतान कादर याचा बाधय घेतला. आपल्या विजयानंतर परत न फिरता गुजराथच्या फौजांनी दर्याखानाच्या अधिपत्याखाली पुढे चाल केली आणि खानदेशाच्या मुलखात आक्रमण करून त्यात त्यांनी लुटालूट केली आणि तो प्रदेश साफ उद्ध्वस्त केला. मिरान महमदखान याला त्यांनी अतिशय जबरदस्त दंड देण्यास नाग पाडले. महमूदशहा हा जेव्हा असीरच्या किल्पात बंदिवासात होता तेव्हा त्याने मिरान मुबारकखानाला असे वचन दिले होते की जर का कधीकाळी आपणाला गुजराथच्या सिंहासनावर बसण्यात यश मिळाले तर आपण मिरान मुबारकखानाला नंदुरबारचा जिल्हा तोडून देऊ. या प्रसंगी त्याने अधिकृतपणे नंदुरबारचा जिल्हा मिरान मुबारकलानाच्या ताब्यात सोपविला.

(हिजरी ९६९ या वर्षी मोगलांच्या फौजानी केलेल्या इ. स. १५७२) मोघलांच्या फौजां समोर टिकाब न लागल्यामुळे माळव्याचा मुलतान बाजबहादूर याला माघार घेणे भाग पडले. माळवा सोडून तो मिरान मुचारक- स्तान याच्या आधयाला आला. सुलतान बाजबहादूर याला माळव्यातून पीर महमद- खान या मोगल सेनापतीने हाकलून लावले होते. त्याने बाजबहादूरचा खानदेशाच्या अगदी अंतर्भागापर्यंत पाठलाग केला आणि तो बुन्हाणपूरपर्यंत घुसून आला. वाटेतील सर्व प्रदेश त्याने उद्ध्वस्त केला, दुरहाणपूर शहराची नासधूस केली आणि अनेक निर्याची बेअनू केली. त्याने इतके निघृण अत्याचार केले की ते या ठिकाणी सांगणे अनुचित ठरेल. आपल्यावर ओढविलेल्या या भयानक प्रसंगात आपल्याला सहाय्य करण्याविषयी मिरान मुबारकखान याने बन्हाडचा सुभेदार तुफालखान याची पत्र लिहून याचना केली. मुबारकस्तानावर ओढविलेल्या प्रसंगाच्या गंभीरतेला पोषक ठरेल इतक्या जलदगतीने तुफालखानाने आपल्या सर्व सैन्यासहित खानदेशाच्या दिशेने कूच केले आणि तो मिरान मुबारकखान आणि सुलतान बाजबहादूर यांना येऊन मिळाला. पीर महमदखानाच्या रानटी फौजा खाण्यापिण्याच्या अतिरेकात आणि विषयासक्तीत इतक्या मशगूल होऊन गेल्या होत्या भाणि त्यांनी केलेल्या सुटीची त्यांच्या संपत्तीत एवढी भर पडली होती की आपणहून संघर्ष ओढवून घेऊन हाती पडलेली लूट गमाविण्याकडे त्यांचा बिलकूल कल नव्हता. साहिजकच स्वतःची इच्छा नसताना देखील त्यांचा सेनापती पीर महमदखान याला माळव्यातून माघार घेणे भाग पडले, त्याच्या फौजेतील काही सैनिकांना आपल्या ठिकाणावर पोहोचण्याची इतकी घाई झाली की त्यांनी पीर महमदखानाच्या अगोदरच आगेकूच केले, त्यांच्या पाठोपाठ उरलेल्या छोट्याशा फौजेन्बी तुकडी आणि जड सामानसुमान च लष्करी सामग्री बरोबर घेऊन पोर महमदखान हा निघाला. तुफालखानाच्या अधिपत्याखाली दोस्तांच्या फौजांनी मोगलांचा पाठलाग केला. मोगलांच्या फौजा इतस्ततः पांगल्या गेल्या असल्याची बातमी त्यांना मिळाली तेव्हा त्यांनी अतिशय झपाट्याने कूच केले आणि नर्मदेच्या किनाऱ्यावर पीर महमदखानाला गाठले. दोस्तांच्या फौजांनी उगोलग शत्रूवर हल्ला चढविला. मोगलांच्या फौजेपेक्षा दोस्तांच्या फोजा: संख्येने अधिक होत्या. त्यामुळे पलायन करण्यातच आपली सुरक्षितता आहे असे वाटून मोगल फौजेने पळ काढला. त्यांच्यापैकी अनेकजण नदीत बुडून मेले. पीर महमदखानाने भापला इत्ती नदीच्या पाण्यात घुसवून देण्याचा हुकूम दिला होता. वर बुढालेल्या अनेक सैनिकांबरोबर पीर महमदखान हा पण बुडून नेला. दोस्तांच्या बिजयी फौजांनी

आपली आगेकूच तशीच पुढे चालू ठेवली आणि ते मांडू येथे पोहोचले. तेथे गेल्यावर सुलतान बाजबहादूर याने राज्याच्या कारभाराचो सूत्रे जमादिल उल्बातर ६ हिजरी ९७४ डिसेंबर २४ } आपल्या हाती घेतली. यानंतर दोस्तांच्या फौजा आपापल्या देशांकडे परतल्या. यानंतर काही वर्षांनी मिरान मुबारकखान हा बुधबार ६ हिजरी ९७४ या दिवशी रात्री मरण पावला. त्याने एकंदर ३२ वर्षे राज्य केले.

**मिरान महमदखान फारुकी**

मिरान मुबारकखान मेल्यानंतर त्याचा मुलगा मिरान महमद हा गादीवर आला. याचवर्षी गुजराथचा सुलतान मुजफ्फरशहा तिसरा याचा मुख्य बजीर एतिमादरखान याच्या चिथावणीवरून गुजराथचा एक अधिकारी चंगीजखान याने नंदुरबार जिल्ह्यावर आक्रमण केले. त्याच्या इलयापुढे खानदेशाच्या अधिकाऱ्यांना माघार घेणे भाग पडले. चेंगीजखानाने मोठ्या धडाडीने थाळनेरच्या किल्याच्या दिशेने धडक मारली. भापल्या प्रदेशात झालेल्या आक्रमणाची बातमी कानी पढल्यावर मिरान महमदखान याने वऱ्हाडचा तुफाळतान याला मदतीसाठी बोलाविले. खानदेश आणि बऱ्हाड यांच्या संयुक्त फौजा खानदेशाच्या पश्चिम सरहद्दीकडे कूच करून गेल्या. थाळनेर येथे आल्यावर त्यांना असे दिसून आले की, चेंगीजखानाच्या फोजा मजबूत ठाण मांडून बसल्या असून त्याच्या दोन्ही बाजूला खोल दऱ्यांचे संरक्षण आहे. त्याचप्रमाणे त्याचा तोफखाना आणि त्याच्या फौजेत असलेली सर्व प्रकारची वाहने यांनी त्याच्या आघाडीवर एक मजबूत फळी उभी केली आहे. खानदेश आणि बऱ्हाडच्या फौजा थाळनेर देथे आल्यावर चेंगीजखानाने आपले मोर्चे सोडून पुढे यावे यासाठी मिरान महमदखानाने त्या दिवशी निरर्थक आपल्या प्रयत्नाची पराकाष्ठा केली. परंतु रात्रीच्या वेळी आपले सर्व सैन्य आणि तोफखाना मागे ठेवून चेंगीजखान एकटा भडोचकडे पळून गेला. दुसऱ्या दिवशी मिरान महमदलानाने शत्रूने सोडून दिलेल्या जागेचा ताबा घेतला. यावेळी गुजराथ राज्यात अतिशय गोंधळाची आणि अंदाधुंदीची परिस्थिती होती आणि देशात यादवी युद्धाचा प्रादुर्भाव झाला होता. गुजराथेचा सुलतान मुजफ्फरशहा हा एत्तिमाद उल्मुल्क याच्या हातातील निम्बळ एक बाहुले बनला असून महमूदशहाचा तो मुलगाच नव्हे असे गुजराथच्या बहुतेक अमीर उमरावांचे मत होते आणि त्यांनी साहजिकच त्याच्या सिंहासनावरील आंधकाराला मान्यता देण्यास नकार दिला. गुजराथेच्या गादीचे कायदेशीर बारस आपणच आहोत अशी मिरान महमदखानाने आपली स्वतःची समजूत करून घेतली, आणि आपण जर धडाडीने गुजराथेच्या राज्यावरील आपला इक सांगितला तर गुजराथेच्या सरदारांकडून आपल्याला पाठिंबा मिळेल, असे कळल्यामुळे मिरान महमदखानाने ३० हजार घोडेस्वार जमविले आणि अहमदाबादकडे कूच केले. दरम्यान गुजराथेमधील यादवी युद्धात चंगीजखान हा यशस्वी झाला होता. तो गुजराथेच्या राजवानीच्या शहरी होता. तेथून त्याने आपला प्रतिस्पर्धी एतिमाद उल्मुल्क आणि मुजफ्फरशहा यांची हकालपट्टी केली होती. मिरान महमदखान हा मोठी फौज घेऊन अहमदाबादनजीक येऊन पोहोचला आहे अशी बातमी चेंगीजखान याला मिळाली. तेव्हा त्याने त्याला प्रतिकार करण्यासाठी केवळ ७ हजार फौज घेऊन कूच केले. दिल्लीच्या मिर्जानी त्याला पाठिंबा दिला. (यांचा उल्लेख गुजराथ आाणि दिल्ली यांच्या इतिहासात आलेला आहेच.) खानदेशाच्या फौजांबरोबर झालेल्या युद्धात चेंगीजखानाला संपूर्ण विजय मिळाला. मिरान महमदखान याने असीरकडे सुरक्षितपणे माघार घेण्यात यक्ष मिळविले, आणि तेवढ्यावरच भापण बचावलो म्हणून स्वतःला धन्य मानले. रणांगणावर त्याचे सर्व हत्ती, तोफखाना आणि खानदेशाचे सुलतान धारण करीत असलेली शाही चिन्हें ही गुजराथच्या फौजांच्या हाती पढली. ही घटना घडल्यानंतर काही काळाने मिर्जानी दक्षिण गुजराथेचा बहुतेक भाग लुटालूट करून उद्ध्वस्त केला, खानदेशावरही त्यांनी आक्रमण केले, आणि मिरान महमदखान त्याला प्रतिकार करण्याठी पुरेशी फौज जमा करीपर्यंत त्यांनी गुजराथेचे अनेक जिल्हे उद्ध्वस्त केले. तेथून त्यांनी खंडणी वसूल केली. मिरान महमदखानाबरोबर गाठ पडण्याचे अगोदरच ते खानदेशाचा प्रांत सोडून चालते झाले.

हिजरी ९८२ यावर्षी अहमदनगरच्या मुर्तजा इ. स. १५७४ निजामशद्दा बहरी याने वऱ्हाडच्या प्रदेशावर आक्रमण केले आणि तो प्रदेश काबीज केला. स्याने तुफालखानाला पकडले आणि बंदिवासात ठेवले. त्याच्या सरकारातला एक अधिकारी खानदेशात दाखल झाला. स्याने आपण इमाउदमुल्क आहोत आणि तुफाडलानाचे

प्रतिनिधी म्हणून आपण आलो आहोत असे सांगून मिरान महमदखानाकडे आपल्याला मदत देण्यासंबंधी याचना केली. हा माणूस तोतया होता. पण त्याच्या सांगण्यावरून मिरान महमद तानाची इतकी फसवणूक झाली की त्याने वन्हाड परत जिंकून घेण्यासाठी त्याच्या- बरोबर जाण्यासाठी म्हणून ५००० सेनिकांची तुकडी रवाना केली. तोतया इमाद- उन्मुल्कने वन्हाडवर चाल केली आणि तो सर्व प्रदेश उद्ध्वस्त केला. परंतु आपला मुख्य वजीर चेगीजखान इस्फहानी याच्या सांगण्यावरून मुर्तजा निजाम- शहा वल्हादकडे परत फिरला. न्वानदेशाच्या फौजांची त्याने शेळ्यामेंड्यांप्रमाणे पांगापांग केली आणि बन्हाडवरील तथाकथित इमाउलमुल्कच्या आक्रमणाला कारणीभूत झालेल्या मिरान महमदन्यानाकडे आपला मोर्चा वळविला. परिणामी अहमदनगरच्या सुलतानाने बुन्हाणपूर शहर बेचिरान्त केले आणि तो असोरवर चालून गेला भाणि त्या फिलयाला त्याने सख्त वेडा दिला. बराच काळ वेडा चाळल्या- नंतर मिरान महमदखानाठा तहासाठी याचना करणे भाग पडले, तहाच्या अटीप्रमाणे त्याने मुर्तजा निजामशहाला सहा उक्ष मुजफ्फरी ३६.१९८० रुपये म्हणजे ३ लक्ष चांदीचे सिका एवढे इन्य नाबद्दा म्हणून दिले. त्याशिवाय मुर्तजा निजाम- [४] (३२०) शहाचा मुख्य बजोर चेंगीनखान याला २ उक्ष मुजफ्फरी त्याने दिल्या त्या वेगळ्याच (३४) हिजरी ९८४ ? हिजरी ९८४ या वर्यों मिरान महमदखान बाळा इ. स. १५७६ तापाने घेरले. काही महिनेपर्यंत ज्वराने त्याची कुचंबणा केली. त्यानंतर मिरान महमदखान मरण पावला. त्याचा एकुलता एक बारस म्हणजे त्याचा मुलगा हुसेनखान हा होता. तो त्यावेळी अल्पवयी होता.

**राजा अलीखान फारुकी**

मिरान महमदखानाला ज्या तापाने प्रथम घेरले आणि पुढे त्यातच त्याचा गुत्यू झाला, त्या तापाची पहिली खबर त्याचा भाऊ राजा अलीखान याला मिळाली तेव्हा तो आग्रा येथे होता. त्याने ताबडतोब बुन्हाणपूरकडे कूच केले आणि आपल्या साबाच्या मृत्यूनंतर ३ दिवसांनी तो तेथे येऊन पोहोचला. राज्यातील अमीरउमराव त्याला शहराबाहेर भेटण्यासाठी सामोरे गेले. हुसेनखान हा अल्पवयी असल्यामुळे त्यानी त्याला सिंहासनावरून काढले आणि राज्याच्या मसनदीवर राजा अलीखान याला बसविले. या सुमारास बंगालपासून सिंधपबैतच्या माळवा आणि गुजराथ आदिकरून हिंदुस्थानातील सर्व देशांचे सुलतान अकबर बादशहाच्या विजयी शस्त्रबलापुढे पराजित झाले होते. अकबराच्या प्रचंड सामर्थ्याला तोंड देण्यापेक्षा त्याच्याबरोबरील संघर्ष टाळणेच श्रेयस्कर आहे असा विचार राजा अलीखान याने केला. त्याच्या भावाने सुलतान म्हणून स्वतःला घेतलेल्या पदवीचा त्याने त्याग केला आणि अकबराला पत्र लिहून त्याने आपल्याला मोगल साम्राज्याचा मांडलिक आणि खंडणीदार म्हणून समजावे अशी त्याच्याजवळ याचना केली. आपण किती प्रामाणिक आहोत याबद्दल अकबराची खात्री पटविण्यासाठी त्याने अनेक भारी आणि मूल्यवान नजराणे त्याच्याकडे पाठविले. काही वर्षापर्यंत त्याने दक्षिणेतील मुलतानांबरोबर अतिशय मैत्रीचे संबंध ठेवले. राजा अळीतान हा अतिशय विलक्षण बुद्धिमतेचा मनुष्य होता. राज्यकत्र्याच्या अंगी असावा लागणारा न्यायीपणा त्याच्यात होता. मुत्सयाबी हुशारी आणि शहाणपण त्याच्यात पुरेपूर होती. योड्याच्या अंगी असणाच्या शौर्य आणि साइसादि गुणांनी तो युक्त होता. उत्साहाचे वारे त्याच्या अंगात खेळत होते. तर दुर्दम्य महत्त्वा कांक्षा त्याच्या अंगी बाणली होती. त्याची प्रजा त्याला देवासमान मानीत असे. दुसऱ्यांच्या बरोबर आक्रमक युद्धे खेळण्यात त्याने आपली शक्ती साचे केली नाही. किंवा आपल्या प्रदेशावर दुसऱ्याकडून होणारे आक्रमण स्थितप्रज्ञाप्रमाणे त्याने कधीही सहन केले नाही. हनाफो पंथाच्या बिद्वान धर्मपंडितांबरोबर धर्मग्रंथांचे वाचन करण्यात तो आपला वेळ घालवीत असे. निरनिराळ्या कलाकुसरींना उत्तेजन देण्यात त्याच्या सारखा दुसरा कोणी नव्हता. ही परिस्थिती हिजरी १५९३ पर्यंत (म्हणजे मुर्तजा हिजरी १००२) निजामशहाने राज्याच्या कारभारातून आपले अंग काढून घेतले } इ. स. १५९३ त्या वर्षापर्यंत) टिकली. त्यावर्षी अहमदनगरचा राजप्रतिनिधी सलाबतस्तान आाणिवन्हाडचा सुभेदार सप्यद मुर्तजा यांच्यात भांडण निर्माण झाले आणि अहमदनगरपासून १२ मेल अंतरावर दोघांमध्ये युद्धाची ठिणगी पडली. या युद्धात सम्यद मुर्तजाचा पराभव झाला. त्याने १२ हजार सैनिक आणि आपले काही अधिकारी यासहवर्तमान एलिचपूरकडे माघार घेतली. त्यांचा सलाबतखानाकडून कसोशीने पाठलाग करण्यात आला तेव्हा सम्यद मुर्तजा आणि त्याचे अधिकारी यांनी आपला मोर्चा गुन्हाणपूरकडे वळविला. त्यांनी राजा अलोखान याचे साहाय्य मागितले. त्याने त्यांना साद्दाप्य करण्याचे वचन देऊन उत्तेजनही दिले

नाही किंवा त्यांना वाढाण्याच्या अक्षताही लावल्या नाहीत. दरम्यान निश्चित उत्तर मिळण्यास राजा अलीखानाकडून विलंब लागल्यामुळे संयम सुदन सप्यद मुर्तजाच्या शिपायांनी बुन्हाणपूर शहराची छटालूट केली आणि नंतर आध्याच्या दिशेने त्यांनी कूच केले. राजा अलीखानाने त्यांचा पाठलाग केला आणि या बंडखोर लुटारूंना नर्मदेच्या तीरावर गाठून त्यांचा पराभव केला. त्यांचे सर्व सामानसुमान आणि वाहतुकीची जनावरे राजा अलीखानाच्या हाती पडली. या जनावरांमध्ये १०० हत्ती होते. सप्यद मुर्तजाला मात्र नदीपार होणे शक्य झाले आणि नदी ओलांडून पलीकडे गेल्यावर अकबर बादशहाची गाठ घेण्यासाठी म्हणून तो निघाला. बादशहाची भेट झाल्याबरोबर त्याच्यापाशी त्याने राजा अलीखान आणि विशेषतः सलाबतखान यांव्याकडून त्याला जी वाईट वागणूक मिळाली होती त्याबद्दल त्याने बादशहापाशी तक्रार केली. अकबराला फार काळापासून दक्षिणेवर आक्रमण करण्याची इच्छा होती. आपली योजना प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी ही चालून आलेली संधी उत्कृष्ट आहे असा त्याने विचार केळा हा हेतू मनात ठेवून त्याने दक्षिणेमधून आपल्याकडे निर्वासित म्हणून आलेल्या सम्यद मुर्तजा आदींना आपल्या चाकरीत दाखल करून घेतले आणि त्यांची लष्करातल्या मोठमोठ्या अधिकारपदावर नेमणूक केली. अकबराने दक्षिणेच्या अधिकाऱ्यांना इतके मोठे पदाधिकार दिलेले जेव्हा राजा अलीखानाने पाहिले तेव्हा दिल्लीपतीच्या आकमणाचे वारे कोणत्या दिशेने वाहणार याची त्याला कल्पना आली आणि त्याने आपल्यातर्फे एका वकिलाची अकबराच्या दरबाराकडे जाण्यासाठी नियुक्ती केली. त्याच्याबरोबर सप्यद मुर्तजाकडून त्याने जिंकून घेतलेले सर्व हत्ती आणि त्याशिवाय बरीचशी रक्कम अकबराकडे रुजू करण्यासाठी त्याने दिली. अकबराने हा नजराणा हिजरी १००३ स्वीकारला. पुढील बर्षी म्हणजे हिजरी १००३ या वर्षी सम्बद इ. स. १५९४ 5 मुर्तजा आणि दक्षिणेतील त्याच्याबरोबर आलेले इतर अधिकारी यांना मांडूकडे कूच करण्याचा आदेश देण्यात आला. वन्हाडवर आक्रमण करण्या साठी म्हणून मांडू येथे मिर्जा अजीज कोका याने त्याच्या साहाय्यार्थ भरपूर सैनिक त्यांच्या समवेत दिले. या सैन्याचा प्रतिकार करण्यासाठी म्हणून अहमदनगरच्या मुलतानाने मिर्जा महमद तकी याला रवाना केले. नमदेच्या तीरावरील हंडिया या गावी दिल्लीची फौज येऊन पोहोचल्यावर सेनाप्रमुखाने आपल्यातर्फे एक माणूस राजा अलीखानाने अहमदनगर आणि वन्हाडच्या अधिकान्यात समझोता घडवून आणण्यासाठी मध्यस्थी करण्याच्या हेतूने राजा अलीखानाकडे पाठविला. इकडे राजा अलोखानाने दक्षिणेच्या सैन्याला येऊन मिळावे म्हणून त्याला उयुक्त करण्या- साठी निजामशाही सेनापती महमद तफी याला त्याबद्दल राजा अलीखानाकडे बोलणी करण्यासाठी सर्वाधिकार देण्यात आले. एकंदर सर्व परिस्थितीचा मुत्सद्याला साजेलशा परिपूर्णतेने विचार केल्यानंतर राजा अलीखानाने दक्षिणेच्या फौजेबरोबर हातमिळवणी करणेच योग्य आहे असा निर्णय घेतला भाणि त्याप्रमाणे त्याच्याबरोबर त्याने इंडियाच्या दिशेने कूच केले. मोगल सैन्याच्या तळापासून दोन मैलाच्या अंतरावर आल्यानंतर त्यांनी दुसन्या दिवशी मोगलांवर हल्ला करण्याचे ठरविले. [४] (३२४) परंतु त्या दिवशी रात्री आपली उभारलेली छावणी तशीच ठेवून आणि दिवे जळते ठेवून मोगल सेनापतीने छावणी सोडली आणि बन्हाडचा मार्ग भरला. वाटेतला प्रदेश उद्ध्वस्त करून मोगल सैन्य एलिचपूर आाणि बाळापूर या शहरांवर घसरले आणि ती शहरे त्यांनी उध्वस्त केली, मोगल सेनापतीने टाकलेल्या डावपेचाची हकीकत जेव्हा राजा अलीखान आणि मिर्जा महमद तकी यांच्या कानावर पडली तेव्हा त्यांनी देखील आपली छावणी उठवून कूच केले. परंतु दरम्यान आपल्या हंडिया येथे मागे ठेवलेल्या सैनिकांबरोबर कोणत्याही प्रतिकाराला तोंड द्यावे न लागता मोगलांनी पुन्हा हातमिळवणी केली. इकडे अहमदनगर आणि खानदेश यांच्या सेनानींनी आपल्यावर मोगलांचा इला होणार नाही याबद्दल योग्य ती काळजी घेतली आणि ते आपापल्या देशाकडे परतले,

हिजरी १००४ या वर्षी बुरहाण निजामशहा याचा इ. स. १५९५ मृत्यू झाला. त्यानंतर अकबर बादशहाचा मुळगा राजपुत्र मुराद मिर्जा आणि वैरामखानाचा मुलगा खानखानान यांनी दक्षिण देश पादाक्रांत करण्यासाठी म्हणून उत्तरेकडून कूच केले. त्याच्याबरोबर राजा अली- खानानेही कूच केले, खानखानान आणि अहमदनगरच्या फौजेचा सेनापती सुहेलखान यांच्यामध्ये झालेल्या अलौकिक रणसंग्रामात दारूगोळ्याच्या गाडीत झालेल्या प्रचंड स्फोटात राजा अलीखान आणि त्याचचरोबर अनेक नावाजलेले अधिकारी ठार झाले. ३३६.२००

राजा अलीखानाची कारकीर्द एकंदर २१ वर्षे झाली. इ. स. १५९६ त्याचे शव बुच्छाणपूर येथे नेण्यात आले आणि त्याला साजेलशा इतमामाने त्याचे दफन करण्यात आले.

**बहादूरखान फारुकी**

राजा अलीखानाचा हिजरी १००५ मध्ये सृत्यू इ. स. १५९६) झाल्यानंतर त्याचा मुलगा बहादूरखान हा गादीवर आला. अकबर बादशहान्चा सेनापती खानखानान याचे त्याला पूर्ण साहाय्य होते. गादीवर आल्यानंतर बहादुरन्तान हा आपल्या अंतःपुरातील श्रियांच्या सहवासात स्वतःला पूर्णपणे विसरून गेला. त्याने राज्यकारभाराकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केले आणि हांजीखोर आणि नर्तक यांच्या नादात तो आपला वेळ पालवू लागला. जेव्हा राजपुत्र मुरादमिर्जा शहापूर या शहरी मरण पावला तेव्हा त्याच्या जागेवर दक्षिणेच्या मोहिमेबर सेनापत्ती म्हणून राजपुत्र दानियल मिर्जा याची नेमणूक झाली. तद्देशीय प्रथेप्रमाणे बहादुरखानाने दानियल मिर्जाकडे त्याच्या भावाच्या मृत्यूबद्दल दुखवळयाचा संदेश पाठविला नाही किंवा दक्षिणेमबील मोगल फौजेचा सेनापती या अधिकारपदावर नेमणूक झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन देखील केले नाही. यानंतर काही वर्षांनी नकबर बादशहा दक्षिणेवर आक्रमण करण्याच्या उघडउघड हेतूने मांडू येथे येऊन दागाल झाला. बहादूरखानाचा बाप राजा अलीखान याचे धोरण अकबर बादशहाच्या चांगुलपणावर विसंबून राहण्याचे होते. बहादूरखानाने या धोरणाचा त्याग केला आणि आपले सैन्य घेऊन अकबराबरोबर सहकार्य करण्याचे ऐवजी तो असीरच्या किल्ल्याकडे चालता झाला आणि तेथे त्याने आपल्याला कोंडून घेतले. एवढेच नव्हे अकबराने फिश्याला वेढा दिल्यास बेडबाला तोंड देण्याच्या दृष्टीने तयारी सुरू केली.

या तयारीची पूर्तता करण्याकरता त्याने गावातील कामगार, कारागीर आणि दुकानदार, वगैरे मिळून एकंदर १५००० डोकांना असीरच्या किल्ल्यात बोलावून घेतले. काम करण्यासाठी उपयोग व्हावा म्हणून त्याने घोडी आाणि गुरेढोरे किल्ल्यात आणून भरली. पुढेमागे त्यांचा उपयोग भक्ष्य म्हणून आणि इतर कामासाठी होईल असाही त्याचा उद्देश असावा. अकबर बादशहाच्या कानावर जेव्हा बहादूर- खानाने चालविलेल्या तयारीची हकीकत गेली तेव्हा त्याने खानखानान आणि राजपुत्र दानियल मिर्जा यांना अहमदनगरचा वेढा चालू ठेवण्यासाठी हुकूम रवाना केला आणि त्याने स्वतः दक्षिणेकडे कूच केले. त्याने पुन्हाणपूर शहराचा ताबा घेतला आणि आपल्या एका अधिकाऱ्याला असीरगडला वेढा देण्यासाठी पाठीमागे ठेवले. किल्याची नाकेबंदी बऱ्याच काळपर्यंत चालू राहिली. तेथल्या घाणीने हवा दुषित झालो आणि दररोज मरणाऱ्या अनेक गुराढोरांमुळे अनेक साथीनी धुमाकूळ घातला. या सुमारास प्रचलित असलेल्या एका दंतकथेला अधिकच प्रसिद्धी मिळाली आणि किल्यावरील शिबंदीचा सहजगत्या त्यावर विश्वास बसला. ती दंतकथा म्हणजे जादू- डोण्याचा उपयोग करून किल्ले जिंकून घेण्याचे सामथ्य अकबराच्या अंगात आहे आणि ज्या मोहिमेवर अकबर बादशहा निघत असे तेव्हा त्याच्याबरोबर जादूगार जात असत. आपल्यावर ओढवलेल्या आपत्तीचे मूळ म्हणजे अकबर उपयोगात आणीत असलेला जादुटोणा हे होय अशी बहादूरखानाने आपल्या मनाची समजूत करून घेतली जाणि त्याच्या भोवतालच्या भयानक परिस्थितीने जो धुमाकूळ घातला होता तिचा प्रतिकार करण्यासाठी त्याने कोणतीच उपाययोजना केली नाही. मृत जनावरांची बासलात लावण्यासाठीही त्याने आज्ञा दिली नाही किंवा शुश्रूषागृहे उभारण्यासंबंधी काही हालचाल केली नाही. ज्यांचा किल्यावर काही उपयोग नव्हता अशा माणसांना बाहेर पाठविण्याची तजवीज देन्त्रील त्याने केली नाही. सरतेशेवटी किल्यावरील शिपाई अगदी थकून गेले आणि कर्तव्य पार पाडण्याकडे त्यांचे पूर्णपणे दुर्लक्ष होऊ लागले. अखेर मोगलांनी किल्पावर धडक दिली आणि माहीगर या नावाने ओळखला जाणारा खाळचा किया आपल्या ताब्यात घेतला. बहादूरखानाजवळ दहा वर्षे पुरेल एवढे धान्य आणि अपार इव्यसंचय होता तरी देखोल बहादुरन्तानाचा उन्मत्तपणा इतक्या थराला गेला की त्याने आपल्या सैनिकांच्या पगाराची थकबाकी ठेवली. किइयावरील शिपायांनी शेवटी पाहिले की आपल्या गाहाण्यांची दाद लागण्याची काही आशा नाही तेव्हा त्यांनी बहादुरखानाला पकडण्याचे आणि त्याला अकबर बादशहाच्या स्वाधीन करण्याचे ठरविले. परंतु त्यांचा हा बेत सिद्धीस जाण्याचे अगोदरच बहादूरखानाला या बेताचा मुगावा लागला. त्याने आपल्या अधिकाऱ्यांची सहामसख्त चेतली. त्यांनी

एकमताने असा निर्णय दिला की यापुढे उपाययोजना करण्याच्या पलीकडे परिस्थिती गेली आहे. दरम्यान रोगराईने भयानक धुमाकुळ घातला. किडपावरील शिबंदीचे पैये पूर्णपणे खचले नाणि ती दुबेल झाली.

किल्ला अकबर बादशहाच्या स्वाधीन करण्यासाठी बोलणी सुरू करणे एवढा एकच मार्ग फक्त उरला. किल्ल्यावरील शिवंदीच्या प्राणांना धोका देण्यात येऊ नये आणि त्यांना आपल्या मालमत्तेसह किलपावरून मुरक्षित जाऊ देण्यात यावे या गोष्टीची याचना तहाच्या वाटाघाटीत करण्याचे ठरले. अकबर बादशहाने या अटींना मान्यता दिली परंतु बहादूरखानाला त्याच्या खाजगी मालमत्तेसह किल्यावरून बाहेर मुरक्षितपणे जाऊन देण्याचा प्रस्ताव मात्र अकबर बादशहाने नाकारला. ही सर्व मालमत्ता अकबर बादशहाच्या आधीन झाला. असीरचा अजिंक्य किला त्याबरोबर दहा वर्षेपर्यंत पुरेल इतक्या सामुग्रीसह आणि अगणित संपत्तीसह अकबर बादशहाच्या विजयी सैन्याच्या हाती पडला.

**फारुकींची दैवी उत्पत्तीची राजसत्ता-**

खानदेशातील फारुकी सुलतान त्यांच्या राजसत्तेला दैवी उत्पत्तीची राजसत्ता म्हणून मानत असत. मलिक राजा अहमद, नासिरखान आणि आदिलशहा वगळता इतर सुलतानांनी मात्र या सिद्धांतावर फार भर दिला नव्हता. हाजी उद-डबीर या समकालीन इतिहासकाराने जाफर-उल-वालिह या ग्रंथात सुलतानाला 'परमेश्वराची छाया' म्हटले आहे. मलिक राजा अहमद हा स्वतःला खलिफाचा वारसदार समजत असे. गुजरातमधील सरदारही खानदेशच्या सुलतानाला 'अल फारुक' याचा आणि दुसऱ्या खलिफाचा वारसदार म्हणून समजत असत. आसिरगड येथील जामी मज्जीदमध्ये संस्कृत भाषेत शिलालेख कोरलेला आहे. त्या शिलालेखात फारुकींची राजसत्ता ही सूर्य, चंद्र, तारे आणि पृथ्वीवरील पवित्र गंगेइतकी पवित्र आणि दैवी प्रतीक असल्याचा उल्लेख आहे. यावरूनही तत्कालीन समाजात अणि जनमानसात फारुकींची राजसत्ता दैवी राजसत्ता असल्याची भावना रूढ होती असे दिसते.

फारुकी सुल्तानांनी स्वतःला जी उपाधी लावली होती, त्यावरून त्यांचा तत्कालीन राजकीय दर्जा समजू शकतो. फारुकी घराण्यातील मलिक राजा अहमदखान, दाऊदखान इत्यादी सुलतानांनी स्वतःला 'खान' ही उपाधी लावली होती.

फेरिस्ता या इतिहासकाराच्या मते नासिरखानने गुजरातच्या सुलतानाकडून 'खान' ही उपाधी मिळविली होती. यावरून खानदेशचा प्रमुख आणि राज्यकर्त्याचे त्या प्रदेशातील प्रभुत्त्व दर्शविणारी उपाधी 'खान' म्हणून लावण्यात आली होती है स्पष्ट होते. परंतु फारुकी घराण्यातील नंतरच्या सुलतानांनी आदिलशहा, मुहम्मदशहा, अहमदशहा, हसनशहा आणि बहादूरशहा इत्यादी पाच सुलतानांनी 'खान' तसेच 'शहा' उपाधी लावलेली होती. येथे 'शहा' शब्दाचा अर्थ सुलतानाचे सर्वदृष्ट्या 'प्रभुत्व' अशा अर्थाने घेतला आहे. आदिलखान हा पहिला फारुकी सुलतान की ज्याने 'शहा' ही सर्वप्रथम उपाधी धारण केली.

राजसत्तेच्या विभाजनाची संकल्पना- फारुकी घराण्याचा संस्थापक मलिक राजा अहमद याचा विचार राजसत्तेचे विभाजन त्याच्या दोन्हीही मुलांमध्ये करावे, असा होता. त्याच्या दृष्टीने त्याचा ज्येष्ठ मुलगा नासिरखान आणि लहान मुलगा इफ्तिखार यांच्यात राजसत्तेची विभागणी व्हावी. कारण त्याने राजसत्तेला खाजगी मालमत्ता समजून तिच्या विभाजनाचा विचार केला होता. परंतु मृत्यूपूर्वी मलिक राजाने दौलताबाद येथील सूफी संताकडे दोनही मुलांना पाठविले. परंतु सूफी संताने मात्र नासिरखान यास मानवस्त्रे दिली. मलिक राजाने नासिरखानास त्याचा वारसदार नेमले. परंतु थाळनेरची जहागिरी मात्र इंफ्तिखार यास दिली होती. परंतु नासिरखानास राजसत्तेतील विभागणी मात्र मान्य नव्हती. त्याने काही दिवसांनी इफ्तिखारचा प्रदेश ताब्यात मिळविला.

यावरून मलिकराजा अहमद आणि नासिरखान यांची राजसत्तेची संकल्पना एकमेकांच्या विचारांपेक्षा भिन्न होती. नासिरखानाने राजसत्तेला सगेसोयरे, नातेवाईक माहीत नसतात, या तत्त्वाचा स्वीकार केलेला दिसतो. म्हणून त्याने सत्तेवर आरूढ झाल्यावर त्याच्या भावास आसिरगडावर कैदेत ठेवले होते. भाऊ, काका यांसारख्या रक्तसंबंधाच्या

व्यक्तींना राजसत्तेपासून दूर ठेवून अथवा त्यांचा राजसत्तेतील वाटा अमान्य करून त्यांना कैदेत ठेवण्याची प्रथा सुलतान मुहम्मदशहा मेल्यानंतरही चालूच होती. कारण मुहम्मदशहाच्या मृत्यूनंतर त्यांची मुले मुबारकखान व मुहम्मदखान यांना कैद केले होते आणि यावल येथील किल्ल्यात त्यांना बंदिस्त ठेवण्यात आले होते.

राजा अळीनंतर आलेला सुलतान बहादूरशहा हा देखील सत्तेवर येण्यापूर्वी आसिरगडावरील तुरुंगात तीस वर्षे बंदिस्त होता. अशाप्रकारे राजसत्तेच्या वारसदारांमध्ये सत्तेसाठी संघर्ष होऊ नये यासाठी फारुकी सुलतानांनी प्रतिस्पर्ध्यास कैदेत टाकण्याची

एथिओपियाच्या हबशींची प्रथा उचललेली होती हे यावरून स्पष्ट होते. असे असले तरी फारुकींच्या राजसत्तेचा वारसाहक्काचा प्रश्न शांततेने मिटत होता असे मात्र नाही. वारसाहक्कासाठी त्यांच्या वारसदारांमध्ये इतर मुस्लिम राजसत्तेप्रमाणे भांडणे, राजकीय प्रतिस्पर्धा आणि शेवटी रक्तपात झाल्याचे आढळून येते.

**लोकहितासाठी झटणारी राजसत्ता-**

फारुकी राजसत्तेने लोकांच्या कल्याणासाठी प्रयत्न केले होते. आसिरगडावरील जामी मज्जीदमधील शिलालेखातील तपशिलावरून ही राजसत्ता लोकांच्यासाठी हितकारी आणि दयाळू असल्याचे दिसून येते. सामान्य लोकांच्या कल्याणासाठी व जनहितासाठी केलेल्या कार्यामुळे त्या राजसत्तेबद्दल प्रजेला मोठा जिव्हाळा व आदर वाटत होता. राजसत्तेवर अमीरांचा प्रभाव-

खानदेशातील फारुकी राजसत्तेवर दरबारातील अमीर-उमरावांचा मोठा प्रभाव होता. कारण सुलतानाला राजसत्तेवर आरूढ करण्यात अमीरांचा मोठा सक्रिय सहभाग असे. त्यामुळे सत्तेवर आलेल्या सुलतानास अशा अमीरांना दरबारात मानाने व आदराने वागवावे लागे. अशा अमीरांचा सुलतानाच्या ध्येय धोरणांवरही प्रभाव पडत असे.

आदिलखान फारुकी हा अमीरांच्या पाठबळावर राजपदावर आरूढ झाल्यामुळे त्याने अमीरांना त्याच्या दरबारात मानाचे स्थान दिले आणि त्यांची प्रतिष्ठा पूर्वीपेक्षा वाढविली होती. खानदेशातील दरबारात फौलादखान, अमीर गझनीखान यांसारखे सामर्थ्यवान अमीर होऊन गेले आणि त्यांनी खानदेशच्या राजकारणावर आणि सुल्तानावर मोठा प्रभाव पाडलेला होता. गुजरातच्या सुल्तानांचाही अशा अमीरांवर प्रभाव असे. तो त्यांच्या मदतीने खानदेशच्या राजकारणात काही प्रसंगी ढवळाढवळ करीत असे. बुहाणपूरच्या अमीरांच्या मदतीने पियारू या वझिराने खानदेशच्या राजपदावरून अहमदशहा यास पदच्युत करून त्याच्या जागी मुबारकशहा यास सत्तेवर बसविले. अशाप्रकारे, अमीरवर्ग राजकारणात प्रभावी आणि वरचढ ठरून वेळप्रसंगी त्यांना अनुकूल असणाऱ्या राजघराण्यातील व्यक्तीला मोठ्या मुत्सद्दीपणाने राजपदावर बसविण्याची भूमिका पार पाडीत असे.

**दुय्यम सुलतानपद अथवा राजप्रतिनिधी यांची प्रथा-**

सुलतानपदावर येणारी व्यक्ती अल्पवयीन असल्यास त्यावेळी किंवा पूर्वीच्या सुलतानाला पदच्युत केल्यानंतर काही काळापर्यंत दुय्यम सुलतान किंवा सुलतानाचा राजप्रतिनिधी नेमण्याची प्रथाही फारुकी राज्यात रूढ होती. उदाहरणार्थ, गाझीउद्दीनच्या पदच्युतिनंतर दाऊदखानाची केलेली नेमणूक ही दुय्यम सुलतान या नात्यानेच केली होती. हाजी-उद-डबीर लेखकाने आलमखानाचा वृत्तांत देताना राजप्रतिनिधी म्हणून अल्पवयीन सुलतानास गादीवर बसविण्याचा आणि सर्व राज्यकारभार वझिराकडे सोपविण्याचा तपशील त्याच्या ग्रंथात दिलेला आहे. त्यावरून त्या पद्धतीवर बराच प्रकाश टाकण्यास मदत होते.

खानदेशच्या सुलतानास राजसत्तेचा विशेष हक्क म्हणून सिंहासनाचा वापर करण्याचा, सफेद रंगाचे राजछत्र वापरण्याचा, त्याच्या नावाचा खुत्वा वाचण्याचा, विशिष्ट प्रसंगी वाद्य वाजविण्याचा, इत्यादी हक्कांचा उपभोग घेता येई. तसेच, अमीर, सरकारी अधिकारी, सेनापती इत्यादींना सन्मानाची उपाधी किंवा मानाचा किताब देण्याचा अधिकार सुलतानासच होता. राजदरबारी पालखीचा वापर करण्याचा हक्क सुलतानाचा होता.

**फारुकी सुलतानांची शासनव्यवस्था आणि सांस्कृतिक देणे- शासनव्यवस्था-**

सुलतान हा राज्याचा प्रमुख होता. लष्करी आणि मुलकी विभागाचे सर्वाधिकार त्याजकडे होते.बझीर- सुलतानानंतर फारुकीच्या राज्यात सर्वात जबाबदार अधिकारी हा 'वझीर' होता. त्याला राज्याच्या सर्व कामकाजावर देखरेख ठेवावी लागे. त्यामुळे फारुकी सुलतान हा त्याच्या अत्यंत जवळच्या व विश्वास असणाऱ्या व्यक्तीलाच वझीर पदावर नेमत असे. प्रशासनावर सर्वस्वी लक्ष ठेवण्याची जबाबदारी वझिरावर येऊन पडे. सुलतानाबरोबर मुलकी, लष्करी व परराष्ट्रीय धोरणावरही त्याचे नियंत्रण असे. वझिराचा मुलगा हा जर उमदा आणि मुत्सद्दी निघाला तर त्याला सुलतान पदही मिळत असे. उदा. मलिकराजा अहमद हा खान जहान या दिल्ली सुलतानाच्या दरबारातील उमराव आणि बहमनी सुलतानाच्या वझिराचा मुलगा होता. काही प्रसंगी सुलतान हा त्याच्या दरबारात जो प्रभावी उमराव असेल, त्यालाच वझीर-पदावर नेमत असे. फारुकी राजा दाऊदखान याने त्याच्या कारकीर्दीत दरबारातील राजकारणात प्रभावी असलेल्या अली भावांपैकी हसन अली यांस वझीर पद दिले होते. सुलतानाच्या विरुद्ध पदच्युत करण्याच्या कटात सामील झालेल्या अमीर उमरावांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी ही वझिराची होती. सुलतान मोहिमेवर गेला असता त्याच्या पश्चात राज्याची संरक्षणाची जबाबदारी वझिराची होती. एखादया व्यक्तीला वझीरपदावर नेमणे अथवा त्याला दूर करणे किंवा दूर केल्यानंतर काही दिवसांनी पुन्हा त्यास त्याच पदावर नियुक्त करण्याचा सर्वस्वी अधिकार सुलतानाचा होता. सुलतानाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा राज्यकारभार सांभाळण्यास अत्यल्प वयाचा असल्यास त्याचा सांभाळ करणे आणि राज्यकारभार चालविणे इ, जबाबदारी ही वझिराची होती. त्याच्याच मार्गदर्शनाखाली सुलतान वागत असे. मिरन महमंदशहा पहिला याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अहमदशहा हा सत्तेवर आरुढ झाला, परंतु तो अल्पवयीन असल्याने मलिक पियारु हा त्याचा वझीर बनला. त्याने दिलेल्या सल्ल्याप्रमाणे सुलतानाने त्याच्या चुलत्याचे डोळे काढण्याचा कट योजला होता.

सुलतान अल्पवयीन असल्यास त्याची देखभाल करण्याची जबाबदारी वझिरावर सोपविली जाई. जेव्हा सुलतान आदिलखान अल्पवयीन होता, त्यावेळी गुजराथच्या सुलतान महमंदखान बगेंदा याने त्या जागी त्याचा उमराव, मलिक बुरहान याची खानदेशचा वझीर म्हणून नेमणूक केली. आणि आदिलखानाचा सांभाळ करून राज्याचा कारभार चालविला. काही प्रसंगी वझीर व सुलतानाची नातेवाईक व्यक्ती यांच्यात करार होऊन सुलतानाच्या अल्पवयीन मुलास गादीवर बसविण्याचा निश्चय होई. त्यानुसार त्यांच्यात करारही केला जाई. फारुकी राजा महंमदशहा याच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ राजा अली व वझीर शैनुद्दीन यांच्यात करार होऊन सुलतानाचा अल्पवयीन पुत्र हासनशहा यास गादीवर बसविण्याचे व त्याचा कारभारी म्हणून राजा अली याने काम पाहावे असे ठरले होते.

आसफरखानासारखे फारुकी सुलतानांचे काही वझीर प्रशासनात निपुण होते. विद्वत्तेशिवाय त्याच्या जवळ काव्यशैलीही होती. तो साधुसंतांचा आदर करी. सूफी संतांसाठी त्याने ब-हाणपूर येथे राहण्याची व्यवस्थाही केली होती. अती संकटाच्या वेळी मात्र सुलतान वझिराचा सल्ला घेई. फारुकींच्या दरबारात मलिक पियारु आसंफखान आणि हासन मुहम्मद यांसारखे प्रभावी वझीर होऊन गेले. त्यांच्या शिवाय सुलतानाचे मंत्री मंडळ म्हणजे केवळ पोकळ डोलाऱ्यासारखे होते. वझिराला आदिलखानासारख्या फारुकी राजाने त्याच्या सेवेच्या मोबदल्यात थाळनेर सारख्या प्रदेशाची जहागिरी दिली. बहादूरशहाने त्याच्या कारकीर्दीत हसन मुहम्मद यास वझीरपदावर नेमले होते. तसेच त्याच्या कामगिरीवर खूष होऊन सुलतानाने त्याला मानाचा किताबही बहाल केला होता. वझीर हा दरबारात सुलतानानंतर महत्त्वाचा असल्यामुळे त्याची भेट दरबारात येणाऱ्या संतांपासून ते सामान्य व्यक्तीही घेत असे. काही सुलतान नायब वझिरांची ही नेमणूक करीत होते. दरबारात भेटीस येणाऱ्या संत-महंतांना वझीर दानधर्महो करी. एखाद्या साधुसंतांच्या स्मरणार्थ व सन्मानासाठी भव्य अशा वास्तूची निर्मिती करण्याची आवड वझिराला असे. राजा अलीचा वझीर आसफखान हा स्वतः एक विद्वान होता. त्याने विविध प्रकारच्या काव्याची निर्मिती केली होती.

**सुलतानाचे सल्लागार मंडळ-**

विजापूरचे आदिलशाही राजे आणि गोवळकोंड्याच्या कुतुबशहांप्रमाणे फारुकी राजांच्या मदतीला संकट प्रसंगी त्यांना सल्ला देणारे सल्लागार मंडळ होते. बहादूरशहा हा सत्तेवर असताना त्याच्या सल्लागार मंडळात अनेक अमीर, उमराव आणि वझीर यांचा समावेश होता. जेव्हा अकबराने खानदेशवर चढाई करण्याची आणि मोगल सैन्य खानदेशच्या दिशेने आगेकूच करीत असल्याची बातमी बहादूरशहाला लागली, तेव्हा त्याने वझीर अफजलखान अमीर उल उमरा, मखदम आझम इ. हुमायून अमीर उल उमरा, अब्दुल करीम फौलादखान यांची बैठक बोलावून येणाऱ्या संभाव्य संकटाला तोंड कसे धावे म्हणून त्यांचा सल्ला घेतला. अशाप्रकारे युद्धाच्यावेळी अथवा इतर महत्त्वाच्या प्रसंगी राजाने कोणत्या धोरणाचा अवलंब करावा याचे मार्गदर्शन करण्यासाठी सुलतानाला सल्लागार मंडळ सल्ला देण्याचे काम करीत असे.

**वकील-**

निझामशाही राज्यात जसा पेशवा किंवा वकील हा दरबारात प्रभावी होता, त्याचप्रमाणे राजा अली या फारुकी सुलतानाच्या कारकीर्दीत पेशवा किंवा वकील फारच महत्त्वाचा होता. काही वेळा वकिलालाच पेशवा म्हणून संबोधले जात होते. वकील म्हणून नेमणारी व्यक्ती सुलतानाची जवळची व त्याच्या विश्वासातील असायची. सुलतान जर आळशी किंवा विलासी निघाला तर राज्यकारभाराची सर्वस्वी जबाबदारी वकिलांवर किंवा पेशव्यांवर येऊन पडे. काही प्रसंगी सुलतानावर पेशव्याचे नियंत्रण राहात असे. वकिलास सुलतानाकडे केव्हाही भेटण्याची परवानगी असे. राजा अलीच्या कारकीर्दीत जेव्हा अकबराने त्याला भेटण्यासाठी मोगलांचा राजदूत शेख यास पाठविले, त्यावेळी बुहाणपूर जवळील पूर येथील शामियान्यात सुलतान राजा अली याने त्याची भेट घेतली. भेटीप्रसंगी राजा अली बरोबर त्याचे अधिकारी व वकील होते. वकील हा परराष्ट्रीय कारभार पहात असे. तसेच तहनामे व युद्धाचा निर्णय अथवा शांतता प्रस्थापित करण्याच्या कामात वकिलाचा फार मोठा वाटा असे. फारुकीच्या राज्यात प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेले वकील अथवा पेशवा फारच थोडे होऊन गेलेले दिसतात. वकिलास मात्र दरबारात सुलतानाच्या सिंहासनाच्या बाजूलाच बसण्यासाठी जागा दिली जाई. सुलतानाला गुप्त बातम्या पुरविण्यासाठी हेरांची नेमणूक केलेली असे. त्यांच्यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याचे काम वकिलाचे होते. हेरांच्या मार्फत राज्यातील अमीरांच्या बंडासंबंधीच्या गुप्त बातम्या अथवा दरबारातील कपट कारस्थानाच्या गुप्त योजना सुलतानाकडे हेरांच्या मार्फत पाठविल्या जात असत. तसेच शत्रूच्या असणाऱ्या राजकीय हालचाली याची माहिती सुलतानास हेरांमार्फतच मिळत होती.

अशाप्रकारे परराष्ट्रीय व्यवहारात वकिलाचे खाते हे महत्त्वाचे होते. वकील हा फारुकींचा विश्वासू मंत्री होता असे दिसते. वकिलास परराष्ट्रीय संबंध टिकविण्यात मानाचे स्थान मिळत होते. तसेच, फारुकी राजे आणि शेजारील राज्यकर्ते यांच्यात खंडणीवरून सोडावयाच्या वादात वकिलाला महत्त्वाची भूमिका बजावावी लागत असे.

गुजराथचा सुलतान महमद शहा बगेदा खानदेशवर चालून आला असता, त्याने आसिर व बुऱ्हाणपूरकडे मोर्चा वळविला आणि त्या शहरांजवळील नदीच्या काठावर त्याच्या सैन्याने छावणी दिली. त्यावेळी आदिलखान फारुकीच्या वकिलाने तणावपूर्ण स्थिती विचारात घेऊन गुजराथच्या सुलतानाशी तहाची बोलणी करण्यासाठी आणि त्याचबरोबर त्याला खंडणी देण्यासाठी नदी काठावर सुलतानाची भेट घेतली आणि त्याला खंडणी देऊन दोन्ही राज्यांत समझोता केला.

**बक्षी-**

बक्षी यास परगण्यातील अथवा प्रांतातील किल्ले व त्यावरील लष्करी बळ, युद्ध साहित्य याची माहिती ठेवावी लागे. हिशेब ठेवणे, सैन्याचा पगार देणे इत्यादी कामे त्यास करावी लागत होती. किल्ल्यावरील लष्कराचा सर्व तपशील त्यालाच ठेवावा लागे. राजा अलीच्या राज्यारोहणानंतर लाड महम्मद बक्षी हा या पदावर होता. त्यानंतर सुलतानाने त्यास बढती दिली आणि वझीर म्हणून नेमले. बक्षी यास युद्धाच्या वेळी मोठी दक्षता बाळगावी लागे.

त्याला स्वतःला मोहिमेत भाग घ्यावा लागे आणि गडाची पहाणी व गुप्त बातमी काढून ती सुलतानाला कळवावी लागे. लाड महम्मद बक्षी सारखे बक्षी राजकारणी व मुत्सद्दी होते. सुलतानाला गादीवर आणण्यात त्यांचा फार मोठा वाटा असे.

**राज्यपाल-**

फारुकीच्या राज्यात राज्यपाल हा अधिकारी किल्ले आणि शहरांचा प्रमुख म्हणून नेमलेला होता. इ. स. १५०८ मध्ये आलमशहा हा थाळनेरच्या किल्ल्याचा राज्यपाल म्हणून काम पाहत होता. तसेच जुजहारखान याला इ. स. १५३९ ते १५६९ पर्यंत सुलतानपूर व नंदुरबार या प्रदेशाचा राज्यपाल म्हणून नियुक्त केलेले दिसून येते. त्यानंतर त्या प्रदेशाच्या राज्यपाल पदावर त्याचा मुलगा अबुल करीम यास ते नेमण्यात आले होते. अझीझ मुहक शेख सुलतान यास सुलतानपूरच्या राज्यपालपदी नेमले होते. आसिरगडाच्या किल्ल्यावर खान जहान पुबारीया याची राज्यपाल म्हणून नेमणूक झालेली दिसून येते. सुलतानपूर नंदुरबार येथील राज्यपाल जीजहारखान हा ॲबिसिनियन होता. त्याला नियम व कायदे करण्याचा अधिकार होता. तसेच चुका करणाऱ्या अधिकाऱ्याला दंड देणे, तसेच बंडखोरांना बंड केल्याबद्दल शिक्षा करणे व त्यांचे बंड मोडून काढण्याचा अधिकार राज्यपालाला दिलेले होते. बंडखोरांचा प्रभाव वाढू न देणे व राज्यकारभारात सुधारणा करण्यासाठी सुलतानाला मदत करणे, ही राज्यपालाची जबाबदारी होती. बुऱ्हाणपूर ह्या राजधानीच्या शहरी जे सरकारी अधिकारी होते त्यात राज्यपालाचाही समावेश असे. मोगलांनी आसिरगड जिंकून घेतल्यानंतर जेव्हा त्यांचा मोर्चा बुऱ्हाणपूर शहरावर गेला, तेव्हा तेथील राज्यपालने ते शहर मोघलांच्या स्वाधीन केले. खानदेशातील किल्यांना प्रशासनाच्या दृष्टीने फारच महत्त्व होते. थाळनेर, लळींग, आसिरगड, पिंपळनेर, सुलतानपूर, सोनगीर, (दालकोट) या सारख्या किल्यांवर फारुकी राजांचा ताबा होता. ह्या किल्यावर सर्वप्रकारची देखरेख व नियंत्रण राज्यपालाचे होते. यातील बरेचसे किल्ले हे शहर आणि किल्ला मिळून बनलेले होते. काही किल्ले हे शहरातच होते, तर काही किल्ले शहरापासून थोड्या अंतरावर होते. सर्व किल्यांना ज्या त्या भागातील जमीन दिलेली होती. त्या जमिनीतून येणाऱ्या उत्पन्नांवर किल्याचा, संरक्षणाचा व सैन्याचा, धान्याचा खर्च भागविला जाई. अन्नधान्याच्या बाबतीत ते स्वयंपूर्ण असत. किल्यावर अन्नधान्य, सैन्याची शस्त्रास्त्रे, दारूगोळा व जीवनावश्यक वस्तूंचा साठा केलेला असे. त्यामुळे एखादद्या किल्ल्याला शत्रूने वेढा देऊनही, तो वेढा अनेक महिने चाळूनही सैन्यास धान्याचा तुटवडा भासत नसे. आसिरगड हा मुळातच टेकडीवर बांधलेला असल्यामुळे त्याच्या संरक्षणासाठी किल्ल्यावर तोफा व युद्ध साधने होती. किल्ल्याला लागून खालच्या भागात मोठ्या शहरासारखी वस्ती वसलेली होती. बुऱ्हाणपूर ह्या राजधानीच्या शहराचा कारभार हा खान जहान पुराबिया नावाचा राज्यपाल पाहत होता. त्यालाच आसिरगड किल्ल्याचा सेनाधिकारी म्हणूनही नियुक्त केले होते. अशाप्रकारे किल्याचा प्रमुख अधिकारी व शहराचा प्रमुख अधिकारी म्हणून दोन्ही पदे एकाच व्यक्तीकडे सोपविली होती.

**ठाणेदार**

खानदेशच्या संरक्षणात ठाणे किंवा लष्करी ठाण्यास महत्त्व होते. प्रत्येक ठाणे हे लष्करी प्रमुखाच्या ताब्यात होते. त्याला ठाणेदार म्हणत असत. ठाणेदाराच्याताब्यात असणाऱ्या प्रदेशातील किल्यावरील ताबा हा ठाणेदाराचाच असे. ठाणेदाराला त्या संपूणे प्रदेशाचा व किल्ल्याचा परकीय शत्रूच्या आक्रमणापासून बचाव करावा लागे. गुजराथचा सुलतान महम्मदशहा बगेदा याने इ. स. १५०९ मध्ये खानदेशवर चाल केली असता व थाळनेरचा किल्ला व त्यासभोवतालचा प्रदेश जिंकला. त्यावेळी मलिक हसन शाह हा थाळनेरचा ठाणेदार होता. त्यावेळी सुलतानपूर येथील ठाणेदार अझीझ उल मुल्क हा होता. गुजरातच्या सुलतानाने थाळनेरच्या ठाणेदाराचा पराभव करून किल्ला व ठाणे ताब्यात घेतले.

**कोतवाल-**

कोतवाल हा शहराचा पोलिस अधिकारी होता. त्याची प्रमुख जबाबदारी म्हणजे शहराचे चोर आणि दरोडेखोर, लुटारूंपासून संरक्षण करणे होय. तो शहरातील वस्तूंच्या देवाण-घेवाणीवर व किंमतीवर नियंत्रण ठेवीत असे. शहरात शांतता व सुव्यवस्था ठेवण्याची जबाबदारी कोतवालाची होती. शहरातील सरकारी तुरुंग व त्यातील गुन्हेगारांवर देखभाल व नियंत्रण हे कोतवालाचे होते. शहराच्या ठिकाणी होणाऱ्या चोऱ्यांचा पूर्ण शोध लावणे व गुन्हेगारांना शिक्षा करणे इ. कोतवालाची कामे होती. राजधानीच्या शहराचा प्रमुख म्हणून कोतवाल काम पाहत होता.

**अमीर उमराव-**

फारुकीच्या दरबारात अनेक अमीर उमराव होते. ते अरब, पर्शियन, ॲबिसियन जमातीपैकी होते. खानदेशाच्या तत्कालीन राजकारणात अंतर्गत दुही माजवण्यात व गटबाजी वाढवण्यात त्याचा बराच पुढाकार होता. यापैकी फौलादखानासारखे ॲबिसियन उमराव हे फारुकी राजास एकनिष्ठ होते. तसेच ते तत्कालीन उमरावांमध्ये फारच प्रभावी होते. परगणा किंवा जिल्ह्याच्या जहागिरीच्या प्रदेशाचे प्रशासन अमीरांकडे सोपविले होते. परगण्यातील अधिकाऱ्यांमार्फत जहागीरदार किंवा सरकार राज्यकारभार चालवीत असे. अमीर-उमरावांच्या मदतीने फारुकी राजांनी त्यांच्या राज्यांचे संरक्षण केले. परकीय आक्रमण झाले असता फारुकी राजा त्यांचा सल्ला घेई. व त्यांच्या मदतीने परकीय आक्रमणास तोंड देत असे. त्या अमीरांकडे विशिष्ट प्रदेशाची जहागिरी सोपविली असे. त्या जहागिरीच्या प्रदेशाची देखभाल व रक्षण करण्याची जबाबदारी ज्या त्या उमरावांची होती. त्यांच्याकडील जहागिरीतील प्रदेशाचा महसूल त्यांनाच गोळा करावा लागे. काही प्रसंगी उमरावांना फारूकी राजाला खंडणी म्हणून जी रक्कम बाहेरील राज्यातून येई, त्यातून जो काही हिस्सा मिळत असे, त्यावरच त्यांना समाधान मानावे लागे. अमीर उमरावांना सुलतानाला वार्षिक खंडणी पाठवावी लागत होती. हसन अली, यार अली, नुरसत अली, उल-मुक, अमीनखान, रवी रॉय, सादतखान, सय्यद असफखान, अझीझ उल-मुक्ल इ. अनेक अमीर खानदेशात फारुकीच्या काळात होऊन गेले. त्यांच्या सहकार्याने राज्याचा कारभार चालविला जाई. परंतु त्यांच्यातील फुटीरता, आणि दुहीमुळे त्यांनीच परकीयांना त्याच्या स्वार्थासाठी खानदेशावर आक्रमण करण्यास प्रोत्साहन दिले आणि त्यातूनच खानदेशच्या राज्याचा विनाश झाला.

**न्यायदान व्यवस्था-**

फारुकी राजांना त्यांच्या जनतेला न्याय मिळवून देण्यात बराचसा वेळ खर्ची घालावा लागे. त्यांच्या कारकीर्दीतील न्यायदान पद्धतीवर प्रकाश टाकणारी साधने फारच दुर्मिळ असली तरी काझीच्या कागदपत्रातून जो उल्लेख आढळतो, त्यावरून राजधानीच्या शहरी आणि काही परगण्याच्या ठिकाणी जनतेला न्याय देण्यासाठी, काझींची नेमणूक केलेली होती. कुराण आणि हदीज ग्रंथांच्या आधारावर न्यायदानाचे कामकाज केले जाते होते. फारुकी राजा किंवा शाह हाच राज्यातील न्यायदान खात्याचा प्रमुख होता. जेव्हा बहादूरशहा सारखा राजा चैनी, विलासी व स्त्रियांच्या सहवासात जीवन घालविण्यात धन्यता मानीत असे, अशावेळी मात्र न्याय व्यवस्थेच्या विभागावर देखरेख ठेवण्याचे व न्याय देण्याचे काम वझिरालाच करावे लागे. राज्यातील हिंदू जनतेला न्यायदान मिळावे हणून धर्मपंडित आणि गावातील मुकादम आणि इतर पारंपारिक न्याय व्यवस्थेत फारुकी सुलतानांनी ढवळाढवळ केली नसावी. शेजारील मुस्लिम राज्यात ज्या प्रमाणे हिंदू जनतेला न्याय दिला जाई, त्याच पद्धतीप्रमाणे खानदेशातील हिंदूंनाही न्याय मिळत होता. बुहाणपूर येथील सूफी संत मौलाना शाह भिकारी यांचा शिष्य काझी दौद, यासारखे काझी बुऱ्हाणपूर सारख्या शहरी काझीचे काम करीत असत.

**फारुकी कालीन खानदेशातील स्थापत्य कला-**

खानदेशातील स्थापत्य कलेवर भौगोलिक आणि आर्थिक परिस्थितीचा परिणाम झालेला दिसून येतो. स्थापत्य कलेची केंद्रे : बुहाणपूर व थाळनेर- भौगोलिक स्थान- फारुकींच्या काळात खानदेशात थाळनेर ते बुऱ्हाणपूर या दोन राजधानींच्या शहरी स्थापत्य कलेचा विकास घडून आला. ही दोन्ही शहरे तापी नदीच्या काठावर वसलेली आहेत. पावसाळ्यात तापीला येणाऱ्या महापुरांमुळे नदी ओलांडून आक्रमण करण्यास शत्रूना अवघड व अशक्य होई. त्यामुळे शत्रूच्या

आक्रमणापासून बचाव होऊ शकत असल्यामुळे कलेच्या विकासाला त्याची मदत झाली. दोन्ही शहरे सातपुड्याच्या पायथ्याशी व त्याच्या कुशीत असल्यामुळे सातपुड्याच्या उच्च रांगांकडून त्यांचे उत्तरेकडून शत्रूच्या आक्रमणापासून बचाव होण्यास मदत झाली. दोन्ही ठिकाणे शत्रूच्या आक्रमणाच्या दृष्टीने सुरक्षित वाटल्यामुळे तेथील कलेचा विकास घडून येऊ शकला.

शहरांचे व्यापारीदृष्ट्या स्थान- दोन्ही शहरांचा वसाहतीच्या दृष्टीने विचार केल्यास मध्ययुगीन काळात दोन्ही शहरे व्यापारी राजमार्गावर वसले असल्याचे दिसून येईल. बुऱ्हाणपूर तर उत्तर व दख्खन याना जोडणाऱ्या मार्गावरील प्रवेशद्वारच समजले जाई. ते सुरत ते आग्रा (बुऱ्हाणपूर मार्गे) राजमार्गावरील एक महत्त्वाचे राजधानीचे थाळनेर येथील फारुकी राजांच्या थडग्यांच्या रचनेचा अभ्यास करण्यापूर्वी त्यांनी त्या कबरीची उभारणी ज्या नैसर्गिक परिस्थितीत केली ती स्थिती समजावून

**कबरींसाठी निवडलेली नैसर्गिक परिस्थितीने युक्त अशी स्थळे-**

खरे पाहिले असता इस्लामच्या कायद्याप्रमाणे कोणत्याही मुस्लिमाला मेलेल्या व्यक्तीच्या मृतदेहावर कबर उभारण्याची परवानगी दिलेली दिसत नाही. 'हादीज' या मुस्लिमांच्या पवित्र ग्रंथानेही मानवाच्या मृत देहावर विटांचे अथवा दगडांचे थडगे किंवा कबर उभारण्यास मनाई केलेली दिसून येते. एवढेच नव्हे तर कोणत्याही मुसलमान व्यक्तीला थडग्यावर प्रार्थना अथवा ओवी कोरण्याची बंदी हादीज ग्रंथाने केलेली होती. मुहम्मद पैगंबरालाही असे वाटत होते की, त्याची मूर्तिरूपाने पूजा करण्यास अनुयायांना बंदी घालावी. त्यामुळे पैगंबरानेही कोणत्याही प्रकारच्या बडगे उभारण्याच्या प्रवृत्तीला मनाई केली होती. त्याच्या मतानुसार मेलेल्या व्यक्तीचे मृत शरीर हे जमिनीत पुरून त्यावर मातीचे आवरण घालून पुरावे. त्याचा उद्देश हाच की शेकडो वर्षांनंतर असंख्य मृत देहांचे दफन एकाच जागी अथवा जमिनीत करता यावे. याचा अर्थ मेलेल्या व्यक्तींच्या मृत देहावर थडगे अथवा त्यावर इमारत बांधण्याची कृती इस्लामच्या कायद्याला मान्य नव्हती.

उदाः थाळनेर येथील फारुकी राजांच्या एका थडग्याच्या (कबरीच्या) पडक्या अबस्थेत असण्याऱ्या भिंतीची रचना पाहिल्यावर असे दिसते की, त्या भिंतींची बांधणी तीन आवरणांनी केलेली होती. भिंतीचे बाहेरील व आतील आवरण हे काहीसे गुळगुळीत असणाऱ्या चौकोनी पाषाणाचे व ठोकळ्यांचे सातपुडा अथवा विंध्य पर्वतच्या खडकांपासून तयार केलेले असावेत. भिंतीचा मधल्या आवरणाचा भाग मात्र स्थानिक चुना, दगड व रेती यांच्या मिश्रणाने बनवलेला दिसतो.

**इस्लामी कायद्यातील कबरी (थडग्या) संबंधीची कल्पना-**

**स्थापत्य कलेला पोषक अशी स्थानिक स्थिती-**

खानदेशच्या भौगोलिक परिस्थितीचा फार मोठा परिणाम फारुकीच्या स्थापत्य कलेवर झालेला दिसून येतो. थाळनेर व बुऱ्हाणपूर जवळच असलेल्या सातपुडा पहाडातील नैसर्गिक साधनसामग्रीचा (चुना, पाषाणाचे गोटे इत्यादींचा) पुरवठा मुबलक प्रमाणावर होऊ शकल्यामुळे स्थापत्य कलेला पोषक अशी स्थिती निर्माण झाली.

तसेच थाळनेर हे त्यावेळी फारुकींचे राजधानीचे ठिकाण होते. ते दिल्ली ते सुरत बुऱ्हाणपूर मार्गावरील शहर होते. या मार्गावरील टेकवाडे व थाळनेर ही दोन गावे तापी नदी पार करण्याची ठाणी होती. व्यापाऱ्यांच्या दृष्टीने हे महत्त्वाचे केंद्र होते. थाळनेर व बुऱ्हाणपूर ही शहरे राजकीय महत्त्वाबरोबर व्यापारी दृष्ट्याही महत्त्वाची केंद्रे होती, त्यामुळे दोन्ही ठिकाणी कलेचा विकास होण्यास मदत झाली.

कबरींची रचना बघितल्यावर असे दिसते की, त्यांनी तापी नदीच्या काठाजवळच त्याची उभारणी केली. तसेच बुऱ्हाणपूर येथील फारुकी राजांच्या थडग्यांचीही स्थळे व रचना पाहिल्यावर असे दिसून येईल की, त्यांची उभारणी त्यांनी नैसर्गिक वातावरणातच, तापीच्या काठाशेजारीच केलेली दिसून येते. साधारणतः पाण्याच्या जवळच अथवा नदी

काठावरच कबरीची उभारणी करण्याची आवड फारुकी राजांना होती. हिंदूंची पवित्रे मंदिरे अथवा देऊळे यांची उभारणी सुद्धा नदीच्या काठीच केलेली आपल्या लक्षात येईल. हिंदूप्रमाणे मुस्लिमांनाही नदी ही पवित्र वाटत असल्यामुळे नदीच्या काठावरच अशा प्रकारच्या कबरी उभारल्या असाव्यात असे डॉ. आर. नाथ यांचे मत आहे. फारुकींनी त्यांच्या पूर्वजांच्या पवित्र आठवणी चिरस्थायी राहाव्यात म्हणून त्यांच्या स्मरणार्थ कबरीची ठाणी पवित्र मानल्या जाणाऱ्या नदी काठावर निवडलेली दिसून येतात.

शिया अथवा सुफी संप्रदायाच्या पडलेल्या प्रभावामुळे फारुकींनी कबरी अथवा थडग्यांवरील वास्तूंची निर्मिती केली असावी.

१) फारुकी राजा मलिक अहमद याला सुफी संत शैनुद्दीन याचा आशीर्वाद मिळाल्याने त्याने खानदेशच्या स्वतंत्र राज्याची निर्मिती केली.

२) नासिरखान यांस दौलताबाद येथील सुफीसंत मैनुद्दीनकडून राज्याची मानवस्त्रे मिळाली होती आणि तो खानदेशचा राजा बनला होता. आसिर प्रदेशावर नासिरखानाने विजय मिळविल्यावर शैनुद्दीन संताने त्याचे अभिनंदन केले आणि त्याच्या विनंतीवरून नासिरखानाने तापीच्या पूर्वेकडील काठावर सैनाबाद (शैनुद्दीनच्या नावाने) वसविले आणि दौलताबाद येथील सुफीसंत बुन्हानउद्दीन शेख याच्या सन्मानार्थ तापीच्या पश्चिमेकडील किनाऱ्यावर बुहाणपूर शहराची इ. स. १४०० मध्ये स्थापना केली. यावरून फारुकी राजांवर सुफी संतांचा बराच मोठा प्रभाव पडला होता आणि त्यामुळेच वास्तू कलेचीही निर्मिती होण्यास मदत झाली. दरगा, हुजराह आणि मकबरा थडग्यांच्या समूहाला 'कबरीस्तान किंवा हुजराह किंवा एस्तानाह' म्हणत असत. काही महत्त्वाच्या व्यक्तींच्या थडग्यांना 'दरगा' असा हुद्दा दिलेला होता.

**मकबरा किंवा तखना-**

कबरीना हुजराह किंवा एस्तानाह म्हणत. हुजराहच्या मध्यभागी झरीह असून वरून त्यावर घुमुटांचे छत असते. कबरीच्या इमारतीच्या तळमजल्याची जी खोली असते तिला मुकबराह किंवा तखाना म्हणत. त्या खोलीच्या मध्यभागी कबर (थडगे) असते. त्या कबरीच्या इमारतीच्या पश्चिमेकडील भिंतीत मिहरब असते किंवा मोठ्या व भव्य इमारतीत स्वतंत्र अशी मस्जीद असते. मिहरब म्हणजे किवला. प्रार्थनेसाठी दिशा दाखविण्यासाठी भिंतीच्या मागील भागावर कमान कोरलेली असते. तिला मिहरब म्हणतात. थाळनेर किंवा बुन्हाणपूर येथे फारुकीच्या कारकीर्दीत 'हुजराह' या प्रकारच्या कबरीच्या इमारतीची रचना केलेली दिसते. त्यात मिहरबही असल्याचे दिसून येईल.

**खानदेशातील स्थापत्य कलेला उत्तेजन देणारे घटक-**

खानदेशातील इंडो-इस्लाम स्थापत्य कलेच्या विकासात अनेक घटक जबाबदार होते.

**फारुकी राजांनी कलाकारांना दिलेला राजाश्रय-**

फारुकी सुल्तानांनी त्यांच्या दरबारात अनेक विद्वानांना, कलाकारांना, कारागिरांना राजाश्रय दिलेला होता. अर्थात त्यांची नावे आज मात्र इतिहासाला माहीत नाहीत. त्यांनी उत्कृष्ट कारागीर, कवी आणि कलाकारांना निरनिराळ्या प्रदेशांतून, खानदेशात निमंत्रित केले होते. त्यांपैकी काहींना त्यांनी राजाश्रयच दिला होता. थाळनेर व बुन्हाणपूर येथील स्थापत्य कलेचा विकास राजाश्रयातून झाला. तसेच कलेविषयी फारुकी राजांना गोडी होती. व्यक्तिगत त्यांना कलेत रस वाटत होता. त्या गोडीतूनच पुढे कला विकसित झाली. फारुकी घराण्यात होऊन गेलेल्या राजांमध्ये कलेविषयी गोडी असणाऱ्या सुलतानांमध्ये मलिकराजा, मिरन, आदिलखान, मिरन मुबारकखान, आदिलखान दुसरा इत्यादींचा उल्लेख करावा लागेल. मलिकराजा अहमद याचा तर त्याच्या काळातील संस्कृतीची कला विकसित करण्यात फारच मोठा सहभाग होता. फेरिस्ता म्हणतो की, " राजा अलीखान हा बुद्धिमान राजकर्ता होता. स्वतःला युद्धात गुंतवून न ठेवता त्याची कारकीर्द त्याने हानफी पंथाची तत्त्वे समजावून घेण्यात आणि कलेच्या विकासात घालविली."

**दोन शतके स्थिरत्व लाभलेली राजवट-**

फारुकींच्या राजसत्तेची स्थिरता जवळ जवळ दोन शतके टिकून राहिली. त्यामुळे राज्याच्या संपत्तीचा उपयोग कला आणि संस्कृतीच्या विकासासाठी करून घेता आला. फारुकी राजांमध्ये मिरन आदिलखान दुसरा हा एवढा वैभवशाली आणि सामर्थ्यशाली राजा होऊन गेला की, त्याच्या कारकीर्दीत खानदेशच्या राज्याची फारच मोठी भरभराट झाली. त्यात स्थापत्य कलेचीही चांगली भरभराट झाली असल्याचे फेरिस्ता सांगतो. फारुकींच्या स्थापत्य कलेची प्रेरणा-फारुकी राजे हे विद्येचे आणि कलेचे चाहते होते. त्यामुळे स्थापत्य कलेची त्यांच्या काळात खानदेशात चांगली वाढ झाली, हे जरी खरे असले तरी, त्याबरोबर त्यांना या कलेची प्रेरणा मात्र त्याकाळात स्थापत्य कलेची केंद्रे म्हणून समजली जाणारी माळवा व गुजरात प्रदेशातील स्थापत्य कलेपासूनच मिळाली होती. माळव्यातील धार, मांडू आणि गुजरातमधील चापानेर, ढोलका, अहमदाबाद इ. कलेची केंद्रे असलेल्या ठिकाणाहून त्यांना प्रेरणा मिळाली होती. भाळवा व गुजरातशी खानदेशचे सांस्कृतिक संबंध- फारुकी राजांचे माळवा व गुजरातशी राजकीय व सांस्कृतिक संबंध होते. खानदेशच्या उत्तर सीमेला लागूनच माळव्याचे राज्य होते. तर त्याच्या पश्चिम-उत्तरेला गुजरातच्या सीमा लागून होत्या. भौगोलिक दृष्ट्या जवळ असलेल्या राज्याचा सांस्कृतिक कलात्मक प्रभाव खानदेशवर पडणे स्वाभाविकच होते. खानदेशचे राज्य राजकीय आणि भौगोलिक दृष्ट्या उत्तरेला असलेल्या माळवा व पश्चिमेस असलेल्या गुजरात, पूर्वेस असलेल्या बहमनी राज्य इत्यादी मुस्लिम राज्यांच्या अगदी मध्यभागी होते. त्यामुळे त्या मुस्लिम राज्यातील कलेचा खानदेशवर प्रभाव पडणे स्वाभाविकच होते. माळवा व गुजरात येथील स्थापत्य कलेचा आविष्कार थाळनेर व बुहाणपूर येथील स्थापत्य कलेच्या रूपाने प्रकट झालेला जाणवतो. माळवा व गुजरातच्या स्थापत्य कलेचा प्रभाव खानदेशच्या कलेवर पडण्याचे आणखी एक कारण म्हणजे गुजरात व माळव्याच्या सुलतानांचे खानदेशशी धार्मिक, सांस्कृतिक, व्यापारी व राजकीय स्वरूपाचे संबंध होते. उदा. खानदेशचा राजा आदिलखान फारुकी दुसरा याच्यावर गुजरातमधील सुफी संत 'शहाबाज' यांचा फारच मोठा प्रभाव होता. त्या सुफी संताच्या आशीर्वादाने खानदेशचा राजा आदिलखान हा मोठ्या आजारातून आणि असाध्य रोगापासून मुक्त झाला होता. त्यामुळे खानदेशच्या राजाने त्या सुफी संताचे शिष्यत्व स्वीकारले. त्याच्याबरोबर खानदेशातील अनेक लोक त्याचे अनुयायी झाले. त्यामुळे खानदेश व गुजरात राज्यांमधील देवाण-घेवाणीमुळे सांस्कृतिक संबंधात वाढ झाली. याबरोबर खानदेशच्या फारुकी राजांनी गुजरातमधील कला शैलीही आपल्या राज्यात आणली. त्या कलेचा आविष्कार थाळनेर व बुऱ्हाणपूर येथील त्यांच्या थडग्यांवरील स्थापत्यकलेच्या रूपाने प्रकट झालेला जाणवतो.

शिवाय खानदेशच्या सुलतानांचे माळवा व गुजरातच्या सुलतानांशी वैवाहिक संबंध प्रस्थापित झाले होते. उदा. सुलतान आदिलखान तिसरा याने गुजरातचा सुलतान शाह बगेदा याच्या मुलाला आपली मुलगी देऊन त्यांच्यात वैवाहिक संबंध जुळविले होते. आदिलखान फारुकी दुसरा यानेही गुजरातचा सुलतान मुझफ्फर शहा दुसरा याच्या मुलीशी विवाह केला होता. फारुकी राजांनी माळव्याच्या सुलतानाशी अशाच प्रकारचे वैवाहिक संबंध जुळविले होते. उदा. मलिकराजा याने होशंगशहा यास त्याची मुलगी दिली होती. तसेच माळव्याच्या सुलतानाच्या मुलीचा विवाह त्याचा मुलगा नासिरखान याच्याशी लावून माळव्याच्या सुलतानाची मुलगी सून म्हणून स्वीकारली होती. फारुकींच्या माळवा व गुजरातच्या सुलतानांशी जुळविलेल्या वैवाहिक संबंधामुळे त्यांना त्या राज्यातून अनेक कारागीर, स्थापत्य कलेचे तज्ज्ञ इत्यादींना खानदेशात आणता आले आणि त्यांच्या मदतीने त्यांनी बुहाणपूर व थाळनेर येथे स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमूना म्हणून मानल्या जाणाऱ्या फारुकींच्या कबरीची उभारणी केली. खानदेशचा दख्खनशी (दौलताबादशी) सांस्कृतिक संबंध-

फारुकींच्या काळात खानदेशचा दख्खनमधील अनेक शहरांशी सांस्कृतिक संबंध आला होता. ती शहरे विद्या व कलेची प्रमुख केंद्रे होती. त्यांच्यापासूनही एक प्रकारची प्रेरणा खानदेशच्या कलेला मिळाली. फारुकी राजा मलिक अहमद याने दौलताबाद येथील सुफी संत शैनुद्दीन शाह याची वारंवार भेट घेऊन त्याच्यापासून राज्य स्थापनेची प्रेरणा घेतली होती व त्या संतास गुरू मानून त्याच्या आशीर्वादाने राज्यप्राप्ती केली होती. त्याच्या सांगण्यावरून सैनाबाद शहर

बसविले. त्यामुळे खानदेश व दौलताबाद यांच्यात धार्मिक व सांस्कृतिक संबंधाची वाढ झाली. देवगिरी उर्फ दौलताबाद हे मध्ययुगीन काळात कलेचे एक प्रमुख केंद्र होते. त्यापासूनही प्रेरणा खानदेशातील कलाकारांना व फारुकी सुलतानांना मिळाली असावी. थाळनेर येथील फारुकींच्या कबरी फारुकी राजांपैकी मलिकराजा, नासिरखान, मिरन आदिलखान आणि मुबारिक खान इत्यादींच्या कबरी थाळनेर येथे आहेत. त्या कबरींचा भव्यपणा, आकार व डौलदारपणा हा कमी अधिक प्रमाणावर आहे. आज थाळनेर येथे कबरींचे जे अवशेष आहेत त्यांच्या आकारातही कमी-अधिकपणा स्पष्ट जाणवतो. त्या सर्व कबरीमध्ये मिरन मुबारकखान याची कबर आकाराने सर्वांत उंच, मोठी आणि भव्य वाटते. कबरीचा उंचपणा आणि भव्यपणा हे मिरन मुबारक खानाच्या वैभवशाली कारकीर्द आणि त्याच्या महान कर्तृत्वाचे द्योतक मानावे लागेल. त्याच्या महान कारकीर्दीचा उल्लेख त्याच्या थडग्यावरील शिलालेखात केलेला दिसतो. फारुकी राजांच्या

**कबरींची स्थापत्य-शैली दृष्ट्या वैशिष्ट्ये-**

स्थापत्य शैलीच्या क्षेत्रात फारुकींची कारकीर्द ही वैशिष्ट्यपूर्ण मानावी लागेल. अर्थात मोगल काळातील सौंदर्यपूर्ण वास्तू आणि त्या वास्तूंच्या रचनेच्या वैभवासारखी सौंदर्य व वैभवपूर्ण रचना जरी फारुकींच्या इमारतींची नसली तरी ती त्या काळातील फारुकींच्या सांस्कृतिक कलेची प्रतीके मात्र निश्चित आहेत यात शंका नाही. थाळनेर येथील फारुकींच्या कबरी हया स्थापत्यशैली दृष्ट्या मोठ्या अभ्यसनीय आहेत. त्या कबरींचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे लांब, चौरसाकृती चौथऱ्यावर, एकावर एक असेतीन चौथरे आणि तिसऱ्या चौथऱ्यावर मुख्य वास्तूची केलेली उभारणी होय. चौकोनी वास्तूच्या छतावर भव्य, उंच, परंतु पसरट असा टेकवलेला घुमट हे फारुकींच्या कवरींचे स्थापत्य शैलीदृष्ट्या दुसरे वैशिष्ट्य सांगता येईल. मांडू येथील श्रीशंगशहाच्या थडग्यावरील इमारतीप्रमाणेच ही इमारत असून स्थापत्य कलेपासून थाळनेर तेथील थडग्यांची रचना व उभारणी केली असावी. घुमटाच्या वजनाचा भार एकाच किकाणी पडू नये म्हणून वास्तूच्या आकाराएवढा पसरट घुमट बनवून तो इमारतीवरील सर्व भागावर विखुरलेला आहे. तसेच घुमटाच्या वजनाचा भार सभोवार तोलला जावा हणून इमारतीचा दर्शनी भाग अत्यंत उंच व भव्य केला आहे. इमारतीच्या आरंभीच्या भागात एक मुख्य दरवाजा आणि बाजूच्या खिडक्यांसाठी मोकळी अशी विस्तृत व अरुंद जागा हे या इमारतीचे खास वैशिष्ट्य मानावे लागेल.

इमारतीच्या वरील चारही बाजूला काढलेले सज्जे अथवा पागोळ्या हे फारुकींच्या बडग्यांचे आणखी एक वैशिष्ट्य मानावे लागेल. इमारतीचा आरंभीचा भाग आणि छताच्या बाहेर काढलेल्या पागोळ्या, (सज्जे) घुमटाचा दर्शनीय भाग इत्यादींवर असलेली वरवंडी (उहान भिंत) हे या कवरीची खास उल्लेखनीय बाब सांगता येईल.

थडग्याच्या छतावरील चारही कोपऱ्यांवर लहान लहान आकाराचे बुरुज असून ते इमारतीवरील मुख्य घुमंटाला शोभून दिसणारे आहेत. कबरीच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला मिनाराच्या आकाराप्रमाणे दोन उंच स्तंभ असून ते भिंतीलाच चिकटल्यासारखे वाटतात. त्या दोन्ही मनोऱ्यांच्या स्तंभावरच्या मध्यभागावर अरबी व पर्शियन भाषेत कोरलेला शिलालेख हे मिरन मुबरक खानाच्या थडग्याचे खास वैशिष्ट्य मानावे लागेल. थाळनेर येथील स्थापत्य कलेवर अरबी स्थापत्य शैलीचा प्रभाव पडलेला जाणवतो. कारण अरबी स्थापत्यकलेप्रमाणे राजाच्या कबरीवर शिलालेख कोरण्याची पद्धत फारुकी सुलतानांनी उचललेली दिसते. थडग्यावर अरबी भाषेत किंवा पर्शियन पंक्तीतून फारुकी राजांची गुण वैशिष्ट्ये, उदा. महान दयाळू, महान प्रेमाळू, योद्धा या सारखे त्यांचे गुणविशेष व महानपण दाखविलेले दिसून येतात. त्यात त्यांनी कोणकोणत्या उपाच्या स्वतःला लावून घेतल्या होत्या याचा अभ्यास करता येतो. वास्तूच्या प्रवेशद्वारावरील वरच्या भागावर शिलालेख कोरण्याच्या पद्धतीमागील दुसरा एक उद्देश सौंदर्यवादी दृष्टिकोणाचा होता. इमारतीचे प्रवेशद्वार हे अधिक आकर्षक दिसावे म्हणून त्यावर रेखीव, वळणदार आणि सुंदर अक्षर लेखन कलेचा अलंकाराप्रमाणे उपयोग करून त्याला सुशोभित केलेले दिसते. तसेच कबरीवरील स्थापत्यकला ही पाहणाऱ्याला अधिक सुखदायक वाटावी म्हणून त्यावर सुंदर अशा अक्षर लेखन कलेचा उपयोग केलेला आहे.

**मिहरब-**

फारुकींच्या स्थापत्य कलेचे आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणजे वास्तूच्या आतल्या भागातील भिंतीवर कोरलेली आणि इस्लामधर्माची प्रतीक म्हणून समजली जाणारी मिहरब होय. साधारणपणे कबरीच्या आतील मंडपातील पश्चिमेकडील भिर्तीवर मिहरब कोरण्याची पद्धत त्या काळात प्रचलित होती. फारुकी राजांच्या कबरीच्या इमारतींच्या अवशेषावरून असे दिसून येते की, दक्षिणेकडील कबरीच्या रांगेतील क्रमांक दोनच्या इमारतीच्या आतील पश्चिमेकडील भिंतीवर मिहरब कोरलेली होती. त्या मिहरबांचे वैशिष्ट्य म्हणजे तिला तिहेरी स्थापत्य कलेने सजवलेली आहे. तिच्या दोन्ही बाजूला सुंदर आकर्षक नक्षी कोरलेली असल्यामुळे आतील बाजूस भिंतीवर कोरलेले प्रतीक फारच आकर्षक आणि परिणामकारक वाटते. थडग्याच्या छताला लागून असलेले पाषाणांचे कोपऱ्याचे आधार (brackets) हे या स्थापत्य कलेचे नमूद करण्यासारखे वैशिष्ट्य मानावे लागेल. हे पाषाणाचे आधार छताप्रमाणे छताच्या बाहेरील भागालाही आधार देणारे आहेत. घडग्यांच्या समूहासमोरच पडिक अवस्थेत फारुकी राजांची एक अष्टकोनी इमारत असून तिच्या सर्व बाजूंनी कमानी व प्रवेशद्वारे आहेत. प्रवेशद्वारावरील नक्षीप्रमाणे त्या सभोवतालच्या भिंतीवरील नक्षीही भौमितिक स्वरूपाची कोरलेली आढळते. प्रवेशद्वार हे तिहेरी स्थापत्यकलेचे प्रतीक असून त्यावरील तोरण नक्षीकाम मोठे मनमोहक वाटते. फारुकीच्या कबरीवरील इमारतीच्या छताचा भार हा मंडपातील पाषाणांच्या उंच पाषाण
**स्तंभावरील भौमितिक नक्षीकाम-**

स्तंभावर टेकवलेला वाटतो. त्या स्तंभाचा उपयोग इमारतीचा आधार म्हणूनच केला असावा. त्या पाषाण स्तंभाचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्याचा जमिनीकडील खालचा भाग अर्धा फूट उंचीच्या पाषाणाच्या चौकोनी आसनावर टेकवलेला आहे. त्या स्तंभाचा मध्यवर्ती भाग भौमितिक नक्षी कामाने सजविलेला असून त्याचा छताकडील वरील भाग मात्र खालच्या भागापेक्षा अरुंद व निमुळता होत गेलेला आहे. हिंदु-मुस्लिम संस्कृतीच्या ऐक्याचे प्रतीक- थाळनेर व बुऱ्हाणपूर येथील फारुकी राजांच्या कबरीच्या वास्तू हया इंडो- इस्लामिक शैलीचे नमुने म्हणून जरी मानण्यात येत असल्या, तरी त्यांच्यावर हिंदू कला आणि सौंदर्याचा प्रभाव पडलेला जाणवतो. उदा. हिंदूंच्या देवळाच्या शिखरावर कोरलेल्या कमळाच्या फुलाचे प्रतीक है हिंदूंच्या कलेचे पारंपरिक प्रतीक आहे. आणि त्याचा वापर थाळनेर येथील वास्तूंच्या प्रवेशद्वारावर, भिंतीवर आणि इमारतीच्या छतावर तत्कालीन फारुकींच्या वास्तू तज्ज्ञांनी वारंवार केलेला दिसून येतो. तसेच प्रवेशद्वाराची कमान आणि त्यावर तोरणाच्या आकाराची कोरलेली नक्षीकला आणि आतील व बाहेरील भिंतीवर कमानीच्या आत कोरलेली नागमोडी आकाराची नक्षी इ. बाबतीत फारुकींच्या वास्तू शैलीवर हिंदूंच्या स्थापत्य कलेचाही प्रभाव पडलेला जाणवतो. एकंदरीत फारुकींच्या राजधानीच्या शहरी असलेल्या वास्तूंच्या शैलीवर मुस्लिम शैली व हिंदू शैली यांचा प्रभाव पडलेला असून त्या वास्तूंवरील स्थापत्य कला ही मध्ययुगीन खानदेशातील हिंदू-मुस्लिम संस्कृतीच्या मिश्रणाचे प्रतीक मानल्यास वावगे ठरणार नाही.

फारुकींच्या स्थापत्य शैलीचा दख्खनच्या स्थापत्य कलेवर पडलेला प्रभाव- डॉ. शेरवानी यांच्यामते फारुकींच्या कारकीर्दीतील खानदेशातील स्थापत्य कलेचा प्रभाव मराठे कालीन स्थापत्य कलेवर पडलेला वाटतो. ज्या प्रमाणे फारुकीच्या कलाकारांनी माळवा व गुजरात येथील कला शैली आत्मसात करून त्या शैलीची प्रतिकृती किंवा त्याचे काही कलात्मक अंश थाळनेर व बुहाणपूर येथील फारुकींच्या वास्तू कलेतून प्रकट केले, त्याप्रमाणे मराठे कालीन कलाकारांनीही फारुकींच्या स्थापत्य कलेपासून प्रेरणा घेऊन त्यांच्या शैलीचे काही अंश त्यांनी निर्माण केलेल्या वास्तूंच्या कला शैलीतून प्रकट झालेले दिसतात. कृष्णा नदीच्या काठावरील माहुली येथे बांधलेल्या समाधीची अष्टकोनात्मक रचनेची कलाकृती धाळनेर येथील फारुकींच्या बहुमुखी परंतु अष्टकोनाकृती असणाऱ्या वास्तूप्रमाणेच आहे. तसेच समाधीची प्रवेशद्वारेही फारुकी राजांच्या वास्तूंच्या तावदानाप्रमाणे सभोवार मोकळी असल्याची दिसून येतात. त्याचप्रमाणे १६ व्या शतकातील अहमदनगर येथील निझामशाही काळातील मलिक अहमद सुलतानाच्या थडग्यावरील वास्तुशैलीवरही फारुकींच्या स्थापत्य कलेचा प्रभाव पडलेला आढळतो. उदा. वास्तूची रचना, तिचा आकार, कमानी दरवाजे, भिंतीवरील कमानी, खिडक्या आणि चौकोनी आकाराच्या इमारतीच्या छतावर टेकवलेला मोठा व पसरट घुमट इ. बाबतीत फारुकी स्थापत्य कलेचा प्रभाव पडलेला वाटतो.

एकंदरीत, दख्खनमधील निझामशाही आणि मराठे कालीन स्थापत्य कलेत खानदेशातील बुन्हाणपूर व थाळनेर येथील फारुकी राजांच्या कारकीर्दीतील स्थापत्य शैलीची वैशिष्ट्ये प्रकट झालेली दिसून येतात.

**फारुकी सुलतानांचे धार्मिक धोरण-**

फारूकी सुलतान हे इस्लाम धर्माचे उपासक होते. त्यांपैकी अनेक सुलतान हे सुफी पंथाचे अनुयायी बनले होते. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी सहिष्णुता वाढीस लागण्यास मदत झाली. मलिक राजा अहमद, नासिरखान आणि इतर फारुकी सुलतान सुफी संतांचे शिष्य होते. नासिरखानाच्या कारकीर्दीत दौलताबाद येथील सुफी संत शेख शैनुद्दीन हे खानदेशात आले होते आणि त्यांच्या आदेशावरून नासिरखानाने बुन्हाणपूर शहराची स्थापना केली होती.

**सुलतानांवरील सुफी पंथाचा प्रभाव-**

फारुकी घराण्यातील मलिक राजा, नासिरखान, आदिलखान दुसरा, राजा अली इत्यादी सुलतान सुफी संताचे शिष्य तर होतेच, परंतु त्यांनी राज्यप्राप्तीसाठी सुफी संतांचा आशीर्वाद घेतला. त्यांच्या राज्याला मिळालेल्या सुफी संतांच्या पाठिंब्यामुळे खानदेशच्या राज्यास बळकटी आणि लोकांचा भरघोस पाठिंबाही मिळाला होता.

दौलताबाद येथील सुफी संत शेख शैनुद्दीन, बुरहानुद्दीन शाहबाज, सैयद कादिरी यासारख्या सुफी संतांचाा फारुकींच्या सत्तेला पूर्णतः आधार मिळाला होता. एवढेच नव्हें तर राजकीय संकटाच्या वेळी सुफी संतांनी सुलतानांना योग्य तो सल्ला देऊन त्यांच्या राज्याला शक्तिशाली बनविले होते.

उदाहरणार्थ, आदिलखानाच्या दरबारी सेवेत असलेले परंतु गंभीर स्वरूपाचा गुन्हा करणारे सैयद कमलुद्दीन आणि त्याचा भाऊ सैयद जलालुद्दीन यांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. परंतु दोन्हीही भावांनी फारुकीच्या राज्यातून तत्काळ पलायन केले आणि मांडूच्या सुलतानाच्या आश्रयाला गेले. त्या सुलतानाने त्यांना अभय देऊन त्यांचे रक्षण केले. सैयद बंधूनी मांडूच्या सुलतानाकडे फारुकी राजाविरुद्ध तक्रार करून त्याने खानदेशावर चालून जाण्याचा आग्रह धरला. मांडूच्या सुलतानाने खानदेशावर स्वारी करण्याचे ठरविले आणि त्याने खानदेशावरील मोहिमेची तयारी चालविली. या प्रसंगी मात्र, फारुकी सुलतानाने फारिद गंज या महान सुफी संताचा सल्ला घेतला आणि राज्याच्या हितासाठी सुलतानाने सुफी संताने दिलेला सल्ला स्वीकारला. यामुळे राज्यावर चालून येणारे संकट दूर होण्यास मदत झाली.

जेव्हा नासिरखानाने इस्लामचे अनुयायी नसलेल्या लोकांवर विजय संपादित केला, त्याप्रसंगी खूष होऊन शेख झेनुद्दीन या सुफी संताने त्या सुलतानाचे अभिनंदन केले आणि आनंद व्यक्त केला. काही फारुकी सुलतान सुफी संतांना आदराने वागवीत होते. त्यांच्यावर संताच्या असलेल्या प्रभावामुळे राजा आदिलखान दुसरा यासारख्या सुलतानाने त्याच्या दरबारात दोन सिंहासने तयार ठेवली होती. त्यांपैकी एका सिंहासनावर स्वतः सुलतान बसत असे आणि दुसऱ्या सिंहासनावर सुफी संत मौलाना शाह भिकारी यास मानाने स्थान दिले जाई. फारुकी सुलतानांनी सुफी संतांचा गौरव केला आणि खानकाह बांधून त्यांच्या निवासाचीही व्यवस्था केली होती. फारुकी राजे हे इस्लाम धर्माचे पुरस्कर्ते असले तरी काहींनी मात्र हिंदू स्त्रियांशी विवाह केले होते. अशा सुलतानांमध्ये महम्मदखान फारुकी (गुजरातचा सुलतान बहादूर याच्या बहिणीचा मुलगा) की ज्याने बागलाणचा बहरजी या हिंदूराजाच्या बहिणीबरोबर विवाह केला होता, त्याचा उल्लेख करता येईल. फारुकी सुलतानांचे इस्लाम धार्जिणे धोरण-

फारुकी सुलतान हे इस्लाम धर्माच्या प्रभावाखाली असणारे व इस्लामचा पुरस्कार करणारे राज्यकर्ते होते. ते स्वतःला खलिफाचे वारसदार समजत असत, परंतु भारताबाहेरील खलिफाचा मान-सन्मान मात्र करीत नव्हते. तसेच फारुकी सुलतानांचा दैवी राजसत्तेच्या सिद्धांतावर विश्वास होता. ते स्वतःला खलिफाचे व अलफारुक या धर्मप्रसारकाचे वारसदार मानत असत. त्यांच्या दृष्टिकोणातून खानदेशातील फारुकी राजसत्ता ही परमेश्वराची पृथ्वीतळावरील छाया (झिल्लुल्लाह) होती.

**उलेमा वर्गाचा राजकारणावर प्रभाव-**

मलिकराजा अहमद या फारुकी सुलतानाच्या कारकीर्दीतील प्रारंभीच्या काळात उलेमा वर्गाचे बरेच वर्चस्व असल्याचे वाटते. इ. स. १३९३-९४ या वर्षी खानदेशच्या सुलतानाने गुजरातच्या सुलतानाला मदत केली. या वर्षी गुजरातच्या सुलतानाने जाफरखानाच्या ताब्यात असलेल्या नंदूरबार व सुलतानपूर परगण्यांवर हल्ला केला. त्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी जाफरखानने सैन्याची रवानगी केली. अशावेळी खानदेशच्या सुलतानाने गुजरातच्या सुलतानाला जाफरविरुद्ध मदत करण्यासाठी त्याचा मुलगा नासिरखानास पाठविले. परंतु परिस्थितीची जाणीव ठेवून नासिरखानाने माघार घेतली. जाफरखानाशी बोलणी करण्यासाठी त्याने उलेमा वर्गाचे एक शिष्टमंडळ जाफरखानाकडे पाठविले. जाफरखानाने यावेळी उलेमा वर्गाचे स्वागत करून त्यांचा मानसन्मान केला आणि त्यांच्याशी तहाची बोलणी केली. मलिक राजाच्या कारकीर्दीत सुरुवातीच्या काळात सुलतानाने उलेमा वर्गाचे राजकारणात बरेच वर्चस्व वाढू दिले होते हे वरील घटनेवरून लक्षात येईल.

**फारुकी सुलतानांच्या असहिष्णुतावादी धोरणांची काही उदाहरणे-**

इस्लामधर्म प्रसारासाठी व इस्लामधर्म दुसऱ्यांवर लादण्यासाठी गुजरातच्या सुलतानांनी काढलेल्या मोहिमेत फारुकी सुलतानांचा सक्रिय सहभाग होता, हे खाली दिलेल्या उदाहरणांवरून स्पष्ट होते.

तबकात-इ-अकबरी या ग्रंथाचा लेखक ख्वाजा निझामुद्दीन अहमद याने गुजरातचा सुलतान महमुद याच्या जुनागढच्या हिंदू राजाविरोधी काढलेल्या मोहिमेचा सविस्तर वृत्तांत दिला आहे. त्याने दिलेल्या वृत्तांतावरून आलमखान फारुक याने त्या मोहिमेत गुजरातच्या सुलतानाला मदत केली होती हे उघड दिसते. गुजरातचा सुलतान आणि फारुकी सुलतान यांचा या मोहिमेमागील उद्देश हा प्रामुख्याने त्या प्रदेशात इस्लाम धर्माचा दर्जा उंचावणे आणि तेथील लोकांवर इस्लाम धर्म लादून त्याचा प्रसार करण्याचा होता. गुजरातच्या सुलतानाने जुनागडवर काढलेल्या मोहिमेप्रसंगी झालेल्या लढाईत अनेक हिंदू लोक, राजपूत ठार झाले. यावेळी गुजरातच्या सुलतानाने जुनागड विरुद्ध पुकारलेले युद्ध म्हणजे इस्लामधर्मासाठी पुकारलेले 'पवित्र युद्ध' (Holy War) होते. अशावेळी फारुकी राजांनी गुजरातच्या सुलतानास केलेली मदत ही त्यांच्या हिंदू विरोधी धोरणाचे द्योतक वाटते. गुजरातच्या सुलतानांनी हिंदू राजांविरुद्ध पुकारलेल्या पवित्र युद्धात फारुकी सुलतानांनी घेतलेल्या सहभागाची आणखी काही उदाहरणे आढळून येतात. त्यावरून काही फारुकी राजे हे हिंदू द्वेष्टे अथवा असहिष्णुतावादी धोरणाचे होते यात शंका नाही. गुजरातचा सुलतान महंमदशहा याने इदारच्या राजाविरुद्ध मोहीम काढून त्याच्या राज्यावर आक्रमण केले त्यावेळी महंमदशहाने तेथील हिंदू लोकांना ठार मारण्याचा आदेश जाफरखानास दिला असता, खानदेशचा सुलतान मलिकराजा अहमद याने गुजरातच्या सुलतानास मदत केली होती.

मलिक राजा अहमद याचा मुलगा नासिरखान याने आसिरगडचा राजा आसा अहिर याचा विश्वासघात करून त्याच्या कुटुंबियांची क्रूरपणे हत्या केली होती. हे त्याचे कृत्य त्याच्या ठिकाणी असलेल्या हिंदू द्वेषी धोरणाचे द्योतक समजले जाते. शिवाय, खानदेशच्या फारुकी राजाने बागलाणचा हिंदू राजा रायभानू याच्या प्रदेशावर केलेले आक्रमणही त्याच्या हिंदूविरोधी असलेल्या धोरणाचे उदाहरण सांगता येईल.

गुजरातचा सुलतान मुजफ्फरशहा दुसरा याने चितोडच्या राणाविरुद्ध आदिलखान आसेरी यास पाठविले होते. (इ. स. १५१८) त्यावेळी दोन्ही सुलतानांच्या संयुक्त सैन्याने चितोड गडावर हल्ला चढविला आणि त्या हल्यात अनेक हिंदूंची कत्तल झाली. याच वेळी शत्रूपासून स्वतःच्या पावित्र्याचे रक्षण करण्यासाठी अनेक राजपूत स्त्रियांनी जोहार केल्याचे तबकात-इ-अकबरी या ग्रंथाचा लेखक सांगतो. या मोहिमेत हिंदू लोकांची किती कत्तल करण्यात आली याबाबतत समकालीन लेखकांनी दिलेली आकडेवारी भिन्न भिन्न आढळते. मिरत-इ-अहमदी या ग्रंथाचा कर्ता लिहितो की- या हल्ल्याच्या प्रसंगी चाळीस हजार हिंदू ठार करण्यात आले होते. तर फेरिस्ताच्या मते यावेळी एकोणवीस हजार

हिंदूंची कत्तल करण्यात आली होती. हिंदूंची कत्तल करण्याच्या या मोहिमेत फारुकी राजाचा मोठा वाटा होता. त्यावरून त्यांच्या हिंदूद्वेषी धोरणावर पुरेसा प्रकाश पडतो.

इ.स. १५३३-३४ या वर्षी गुजरातचा सुलतान बहादूरशहा याने खानदेशचा सुलतान मुहम्मदशहा आसिर याच्या मदतीने चितोडच्या राणावर पुन्हा आक्रमण केले. आणि या प्रसंगी पुन्हा चितोडगडाची लूट करण्यात आली. आणि हिंदूंचीही कत्तल करण्यात आली. हिंदू लोकांच्या झालेल्या कत्तलीतही फारुकी सुलतानांचा मोठा सहभाग होता.

गुजरातच्या सुलतानाने माळव्यावर मोहीम काढली असता, राणा संग या हिंदूराजांचा बंदोबस्त करण्याची सर्वस्वी जबाबदारी आणि सुलतानाकडून घ्यावयाची परवानगी ही आदिलखान फारुकने घेतली होती. तसेच त्याने हिंदूराजा मेदिनीरॉय याच्या विरुद्धही चाल करून जाऊन त्याच्या किल्ल्यास वेढा दिला होता त्यावेळी दोन्ही पक्षांच्या सैन्यात झडलेल्या चकमकीत असंख्य हिंदू ठार झाले होते. वरील घटनांवरून हे स्पष्ट होते की, जेव्हा जेव्हा खानदेशच्या सुलतानांनी गुजरातच्या सुलतानाला हिंदू राजांविरोधी मदत केली, त्या, त्या वेळी त्या युद्धाला गुजरातचा सुलतान आणि फारुकी सुलतानांनी इस्लामधर्मासाठी पुकारलेले 'पवित्र युद्ध' (Holy War) समजून लढा दिला होता. त्यावरून काही फारुकी सुलतानांचे हिंदूद्वेषी धोरण स्पष्ट होते. फारुकी राजांनी हिंदू राजाविरोधी काढलेल्या मोहिमेत सक्रिय मदत पाठवून अथवा त्या मोहिमेत सक्रिय सहभागी होऊन त्यांच्या ठिकाणी असलेली हिंदू श्री भावना प्रकट केली हे निर्विवाद होय.

**फारुकी सुलतानांचे सहिष्णुतावादी घोरण :-**

परंतु इतर फारुकी सुलतान हे मात्र धार्मिक बाबतीत सहिष्णुवृत्तीचे होते पात शंका नाही. उदाहरणार्थ, सुलतान मुहम्मद फारुकी याचे हिंदूंच्या बाबतीतले धोरण उदारतेचे आणि शहाणपणाचे द्योतक मानता येईल. त्याचे सहिष्णुतावादी धोरण होते. त्याने 'ईद' या सणाच्या दिवशी मुस्लिमांप्रमाणे हिंदू लोकांनाही दिवाण सभागृहात एकत्रित जमण्याचे आणि तो सण साजरा करण्याचे स्वातंत्र्य दिले होते. या सणाच्या दिवशी तो सुलतान मुस्लिमांप्रमाणे हिंदू लोकांनाही 'ईद' सणाच्या दिवशी शुभेच्छा देत असे.

राजा अली आणि बहादूरशहा हे सुलतानही हिंदूंच्या बाबतीत सहिष्णुवृत्तीचे होते. त्यांच्या कारकीर्दीत रवी रॉय, गीता जीव सारख्या हिंदू सरदारांना अमीराचा दर्जा प्राप्त झाला होता. त्यांनी बारा हजार हिंदू राजपूत आणि कोळी जमातीच्या लोकांना लष्करी संघटनेत त्यांच्या गुणवत्तेनुसार व लायकीप्रमाणे स्थान दिले होते. यावरून फारुकी सुलतान है हिंदूंना सैन्यात भरती करतांना धार्मिक कारणावरून अडथळे आणीत नसत हे उघड दिसते. परकीय प्रवाशांच्या प्रवास वर्णनातून खानदेशी लोकांविषयी, त्यांच्या जीवनासंबंधीची माहिती आढळते. इब्न बतुता या परकीय प्रवाशाच्या प्रवास वृत्तांतात नंदुरबार आणि त्यापूर्वेकडील तापी काठावरील खानदेशी लोकांविषयी लिहिताना तो म्हणतो, की, ते लोक धार्मिक प्रवृत्तीचे असून त्या लोकांना सुलतानाने करांपासून सूट दिली होती. इब्न बतुता याने वरील दिलेला वृत्तांत म्हणजे फारुकी सुलतानांच्या धर्मसहिष्णुतेच्या धोरणाचा एक पुरावाच समजला पाहिजे.

तसेच, फारुकी सुलतानांनी इतर मुस्लिम सुलतानांप्रमाणे खानदेशातील जनतेचा, हिंदूंच्या मंदिरांचा अवमान केल्याचे किंवा हिंदू जनतेला सक्तीने इस्लाम धर्म स्वीकारण्यास भाग पाडण्याचे पुरावे आज उपलब्ध नाहीत. या ऐतिहासिक दाखल्यांच्या अभावामुळे फारुकी सुलतानापैकी काही सुलतान हे धर्म सहिष्णुतेच्या धोरणाचे पुरस्कर्ते होते याच विधानाला पुष्टी मिळते. खानदेशच्या फारुकी सुलतानाच्या सहिष्णुतावादी धोरणाचे दुसरे उदाहरण म्हणजे फारुकी सुलतान राजा अली अथवा आदिलखान चौथा याच्या कारकीर्दीत सुलतानाच्या उदारतावादी वृत्तीमुळे त्याच्या दरबारात संस्कृत भाषेचा झालेला वापर आणि वाढलेला प्रभाव होय. त्याने त्याच्या दरबारात अरबी भाषेप्रमाणे संस्कृत भाषेचा आदर केला. त्याच्याच कारकीर्दीत आसिरगडावरील आणि बुहाणपूर येथील जामा मज्जीदीमध्ये संस्कृत व अरबी भाषेत शिलालेख कोरून संस्कृत भाषेला आदराचे स्थान दिले. सुलतानांच्या सहिष्णुतावादी धोरणामुळे हिंदू आणि मुस्लिम जमातींमध्ये सामाजिक ऐक्य व सलोख्याचे संबंध टिकू शकले हे विसरता येणार नाही. फारुकी काळातील, बुऱ्हाणपूर

आणि थाळनेर येथील वास्तूंच्या कलाकुसरीवर हिंदू शिल्पकलेची छाप पडलेली आढळून येते. येथील कलाकृतीत हिंदू व मुस्लिम शिल्पकलेचे संमिश्र चित्रण पाहावयास मिळते. अर्थातच, अशा कलाकृतींची निर्मिती म्हणजे फारुकी सुलतानांच्या सहिष्णुवृत्तीच्या धोरणाचाच परिपाक म्हटला पाहिजे. त्यांच्या सहिष्णुतेच्या धोरणामुळे हिंदू-मुस्लिम कारागिरांना मध्ययुगीन मुस्लिम स्थापत्य कलेत हिंदू स्थापत्य शैलीचा वापर करू देण्याचे पुरेसे स्वातंत्र्य मिळाले. आणि हिंदू शिल्पकलेचा प्रभाव असलेली कलाकृती निर्माण झाली.

**फारुकी सुलतानांनी खानदेशाला दिलेली सांस्कृतिक देणे -**

खानदेशाची संस्कृती आणि इतिहासाला फारुकी सुलतानांनी दिलेली खास देण मात्र विसरता येणार नाही. खानदेशच्या शेजारी असलेल्या गुजरात, माळवा, राजस्तान, बेरार, अहमदनगर या सारख्या मुस्लिम राज्यांशी सुलतानांनी सांस्कृतिक व राजकीय संबंध स्थापन केले आणि त्यांच्यात त्यांच्यात सांस्कृतिकदृष्ट्या देवाणघेवाण झाल्यामुळे खानदेशच्या सांस्कृतिक जीवनावर त्याचा बराच प्रभाव पडला. त्यातूनच खानदेशात पुढे संमिश्र सांस्कृतिक जीवनास प्रारंभ झाला.

**सांस्कृतिक सलोख्याच्या युगाची सुरुवात-**

खानदेशात अकबराच्याही पूर्वी सामाजिक सलोखा, हिंदू-मुस्लिमांमधील सद्भाव आणि हिंदू-मुस्लिम संस्कृतीच्या समन्वयाचा प्रारंभ होण्यास मदत झाली. फारुकींच्या काळातच काही फारुकी सुलतानांच्या सहिष्णुतेच्या धोरणामुळे दोन्ही संस्कृतींची एकमेकांत देवाणघेवाण होऊन दोन्ही जमातींमध्ये सांस्कृतिकदृष्ट्या समन्वय निर्माण होण्यास अनुकूल परिस्थितीची वाढ झाली हे नाकारता येणार नाही.

**फारुकी सुलतानांनी कलेस दिलेले उत्तेजन-**

फारुकी सुलतानांनी बाहेरील प्रदेशातील अनेक विद्वान, कवी, साहित्यिक, कथाकार इ. गुणी व्यक्तींना गुजरात, राजस्थान, माळवा, दौलताबाद, अहमदनगर आणि हिंदुस्थानच्या इतर प्रदेशातून खानदेशात येण्यासाठी निमंत्रित करण्याचे उत्तेजन देण्याचे अथवा त्यांना राजाश्रय देण्याचे धोरण अंगीकारले होते. त्यामुळे त्यांच्या दरबारात अनेक विद्वान, कुशल कारागीर, कलाकार, कवी इत्यादींना राजाश्रय मिळाला. आदिलखान दुसरा याच्या दरबारात मौलाना शाह बुखारी, सैयद कमालुद्दीन, जलालुद्दीन, आसफखान यासारखे कवी व विद्वानांचा मोठा भरणा होता. राजा अलीच्या दरबारात गुणी लोकांचा मोठा वर्ग होता. त्यामुळे खानदेशात कला आणि संस्कृतीची जोपासना होण्यास मोठी मदत झाली. त्यांनी कलाकारांना दिलेला आश्रय आणि कलेविषयी त्यांना वाटणाऱ्या गोडीमुळे खानदेशातील थाळनेर आणि बुऱ्हाणपूर या शहरी स्थापत्य शैलींनी आकर्षक वाटणाऱ्या कलाकृती निर्माण होण्यास मदत झाली. मुस्लिम स्थापत्य शैलीचे आकर्षक नमूने म्हणजे या काळात खानदेशातील बुन्हाणपूर शहरी नदीकाठावर मिरन आदिलखान दुसरा याने बांधलेला भव्य असा राजवाडा आणि आसिरगडास संरक्षण मिळावे म्हणून त्याने बांधलेला भक्कम, भव्य अशा स्वरूपाचा माळीगड होय. शिवाय, बुन्हाणपूर येथील बांधलेली आणि कलाकुसरीने सजविलेली बिबिकी मज्जीद, राजा अलीने बांधलेली जामी मज्जीद, आसिरगडावरील इदगाह, इत्यादी वास्तू म्हणजे फारुकींच्या स्थापत्य शैलीचे उत्कृष्ट नमुनेच म्हणता येतील.

बहादूरशहा यानेही त्याच्या दरबारात कवी, संगीतकार, गायक, गीता जीवसारख्या दर्जेदार व उत्कृष्ट क्रीडापटू आणि खेळाडूंना दरबारात बोलावून त्यांचा मानसन्मान केला आणि त्यांच्या अंगी असलेल्या कलेबद्दल त्यांना मौल्यवान भेटी अथवा बक्षिसे दिली. त्यामुळे गुणवान व्यक्तींना, कलाकार व कलापटूंना राजदरबारात मानाचे स्थान मिळून विविध कलांचा प्रसार या प्रदेशात होण्यास मदत झाली. अक्षरे कोरण्याची कला- (Calligraphy) खानदेशातील स्थापत्य कलेशी सुंदर व आकर्षक अक्षरे कोरण्याच्या कलेचा अतूट संबंध आहे. रशिया आणि भारताच्या इतर प्रदेशांप्रमाणे खानदेशातही या कलेचा वापर केलेला दिसून येतो. फारुकी सुलतानांनाही या कलेविषयी गोडी वाटल्यामुळे खानदेशात

ही कला विकसित झाली. फारुकी सुलतानांनी या कलेच्या कलाकारांना राजदरबारात सेवेत ठेवून त्यांना आश्रय दिला होता. फारुकींच्या काळात मिरन मुबारक खान, आदिलखान चौथा यांच्या कारकीर्दीत या कलेचा बराच वापर केल्याचे दिसते. या कलेत सर्वोत्कृष्ट कलाकार म्हणून नावलौकिकाला आलेले कलाकार म्हणजे मुस्तफा वाल्द नुर मुहम्मद आणि मुहम्मद मासुम नामी यांचा उल्लेख करावा लागेल. काही कलाकारांना मात्र सिंधसारख्या प्रदेशातून निमंत्रित केले जाई. स्थापत्यकलेने सजविलेल्या वास्तूंच्या स्तंभावर अथवा प्रवेशद्वारावर हादीज किंवा कुराणातील ओवी सुंदर व आकर्षक अक्षरांमध्ये कोरून त्या वास्तूंना भव्य, आकर्षक व सौंदर्यपूर्ण बनविणे, या हेतूंसाठी या कलेचा उपयोग केला जाई. खानदेशात तुम्रा व अरबीशैलीची अक्षरे कोरण्याच्या कलेचा प्रकार वाढीस लागलेला दिसतो. याच काळात, खानदेशात उर्दू, पर्शियन भाषेतील साहित्याच्या वाढीला उत्तेजन मिळाले.

सुफी संतांच्या साहित्याचा विकास होऊन हादीज व कुराणावर भाष्य करणाऱ्या उर्दू भाषेतील ग्रंथाची निर्मिती झाली. बुऱ्हाणपूर हे पर्शियन आणि उर्दू भाषेच्या अभ्यासाचे एक प्रमुख केंद्र म्हणून नावलौकिकाला आले. फारुकी सुलतानांच्या उदारतेच्या धोरणामुळे, तसेच त्यांनी कला आणि धर्मसहिष्णुतेच्या भावनेस दिलेल्या उत्तेजनामुळे खानदेशात कला व संस्कृतीची जोपासना होऊ शकली. त्यामुळे फारुकींच्या राज्यास 'संस्कृतीचे राज्य' (a culture state) संबोधिल्यास अतिशयोक्तीचे ठरणार नाही. फारुकींची राजवट खानदेशात जवळजवळ सव्वादोनशे वर्षे टिकून होती. खानदेशात प्रदीर्घ काळापर्यंत राजकीय स्थैर्य टिकवून ठेवणाऱ्या फारुकी राजवटीने

खानदेशाला विविध स्वरूपाची दिलेली देण मात्र विसरता येणार नाही. शेतीच्या उत्पादन क्षेत्रात फारुकींनी अविस्मरणीय अशी देण दिली. फारुकी सुलतान मलिक राजा अहमद याने पिकाच्या उत्पादनासाठी दिलेल्या प्रोत्साहनामुळे, खानदेशात कापसाच्या उत्पादनात वाढ झाली. फारुकी सुलतानांनी खानदेशातील शेतकऱ्यांनी कापसाचे उत्पादन निव्वळ पावसाच्या पाण्यावर न काढता, ते उत्पादन त्यांनी विहिरीच्या व पाटबंधाऱ्यांच्या पाण्यावरही घ्यावे, यासाठी शेतकऱ्यांना उत्तेजन दिले होते. त्यामुळे खानदेश कापसाच्या उत्पादनात पुढे अग्रेसर बनला. मुघल काळात, खानदेश म्हणजे कापसापासून तयार केलेल्या कापडाचे मोठे आगरच समजले जाऊ लागले. खानदेशात तयार झालेल्या मऊ व तलम कापडाची, रंगीबेरंगी कापडाची ख्याती सर्वत्र पसरली होती. इ. स. १५८७ यावर्षी फारुकींच्या कारकीर्दीत खानदेशाला भेट देणारा इंग्रज प्रवासी राल्फ फीच म्हणतो, की, "खानदेश (१६व्या शतकात) विविध कापडाचे आगरच होते. या प्रदेशात रंगी- बेरंगी, तलम व मऊ कापड तयार होत असल्याचे तो लिहितो. फेरिस्ता म्हणतो की, "मलिक राजा अहमद या फारुकी राजाने दिल्लीचा सुलतान फिरोजशहा तुघलक यास हत्ती, उंट इत्यादी भेटवस्तूबरोबर खानदेशात तयार होणारे मऊ व तलम कापडही भेट म्हणून पाठविले होते." फारुकी सुल्तानांनी शेतीच्या कापूस उत्पादन क्षेत्रात व कापड उद्योगात खानदेशाला दिलेली ही मोठी देणच म्हटली पाहिजे.

मध्ययुगीन काळात खानदेश धान्याच्या उत्पादन क्षेत्रातही समृद्ध प्रदेश होता. सुगंधी (कुमुद) तांदळाची पैदास करणारा प्रदेश म्हणून खानदेशचा नावलौकिक वाढला होता. कापूस व धान्य उत्पादनात खानदेशाने नावलौकिक तर वाढविलाच, परंतु त्याबरोबर खानदेशच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचा चांगला परिणाम घडून आला. व खानदेश प्रदेशाची अर्थव्यवस्था सुदृढ होण्यास मदत झाली.

फारुकी सुलतान नासिरखान याने बुऱ्हानउद्दीन व सैनुद्दीन या संतांच्या आदरासाठी बुऱ्हाणपूर व शैनाबाद या शहरांची स्थापना करून खानदेशच्या वैभवात भर घातली होती. पुढील काळात बुहाणपूर शहर खानदेशच्या राजधानीचे, दक्षिणेतील व्यापाराचे व सांस्कृतिक जीवनाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून नावलौकिकाला आले.

फारुकी सुलतानांच्या काळात हिंदू साधूसंतांच्या व खानदेशातील सुफी संतांच्या शिकवणीमुळे हिंदू व मुस्लिम या भिन्न जमातींमध्ये सामाजिक सलोख्याची आदरभावाची भावना वाढीस लागली. मुघल बादशहा अकबराची राजवट खानदेशावर लागू होण्यापूर्वी यापप्रदेशातील समाजात हिंदू व मुस्लिम जमातीत सामाजिक सद्भाव व दोन भिन्न संस्कृतीतील एकोपा निर्माण झाल्याची बरीच उदाहरणे आढळून येतात. हिंदू व मुस्लिम या जमातींमधील आपापसांतील

सद्भाव हा मुस्लिमांचा उरुस, ईद यांसारख्या उत्सव व सणाप्रसंगी, व हिंदूंच्या दिवाळी, होळी या सणांच्यावेळी, त्यांच्या सुखदुःखाच्या प्रसंगी, आणि हिंदू मुसलमानांनी एकमेकांविषयी दाखविलेल्या आदरभावपूर्ण वागणुकीतून प्रगट झालेला दिसतो.

फारुकींच्या काळात, हिंदू-मुस्लिम संस्कृतीच्या समन्वयाच्या प्रतीकाचे दुसरे उदाहरण म्हणजे फारुकींच्या दरबारात पर्शियन भाषेबरोबर संस्कृत भाषेला मिळालेले स्थान होय. राजधानीच्या शहरी मुस्लिमांच्या मज्जीदींमधून कोरण्यात आलेल्या संस्कृत व अरबी शिलालेखांची भाषा केवळ अरबी न राहता फारशी भाषेइतकाच संस्कृत भाषेचाही आदर होत असल्याचे यावरून स्पष्ट होते.

काही फारुकी सुलतानांनी सहिष्णुतेच्या धोरणाचा स्वीकार केल्यामुळे त्यांच्या काळात खानदेशात हिंदू-मुस्लिम संस्कृतीच्या समन्वयास मोठे उत्तेजन मिळाले. दोन्ही संस्कृतींच्या समन्वयाचे उत्तम उदाहरण म्हणजे फारुकीकालीन खानदेशातील शिल्पकलेवर हिंदू शिल्पकलेचा पडलेला प्रभाव होय. हिंदू शिल्पकलेचा खानदेशातील मुस्लिम शिल्पकलेवर पडलेल्या प्रभावाचे उदाहरण हे हिंदु-मुस्लिम संस्कृतीच्या समन्वयाचे द्योतक म्हटले पाहिजे. खानदेशात दोन्ही संस्कृतीत व भिन्न जमातींमध्ये सहिष्णुतेची भावना वाढविण्यासाठी प्रयत्न करणारे व हिंदू-मुस्लिम समाजात सामाजिक एकोपा व सद्भाव निर्माण करणारे फारुकी सुलतान हे अकबर बादशहाच्याही पूर्वी खानदेशातील समाजजीवनात धार्मिक सहिष्णुतेची भावना वाढीस लावणारे मुस्लिम राज्यकर्ते होते, हे ऐतिहासिक सत्य नाकारता येत नाही.